
# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

e paper www.janmadhyam.com

■ अमरावती, ■ सोमवार १३ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०

# सम्राट अशोकाच्या शिलालेखात मानवतेची शिकवण : डॉ. संजय पाईकराव

## -डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात सम्राट अशोकांची जयंती साजरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** महामानवांच्या विचाराचा वारसा पुढे जावा या उद्देशाने श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तक्षशिला महाविद्यालय, अमरावती, तक्षशिला महाविद्यालय, अमरावती, तक्षशिला महाविद्यालय, दारापूर अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र, पाली विभाग, बुद्धिस्ट स्टडी सेंटर आणि रा.से.यो. यांच्या संयुक्त विद्यमाने 'महामानव पर्व' २०२६ चे दि. १० एप्रिल ते १४ एप्रिल, २०२६ दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या पर्वात विविध महामानवांच्या विचारांचा जागर करण्यात येतो. दि. १२ एप्रिल हा या पर्वाचा तिसरा दिवस होता. यामध्ये देवानंपिय चक्रवती सम्राट अशोकांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. भारतीय समाजात सम्राट अशोक यांची खरी प्रतिमा रुजावी या उद्देशाने या कार्यक्रमात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर पायस हे होते. तर प्रमुख वक्ता म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील इतिहास आणि प्राचीन बौद्ध संस्कृतीचे गाढे अभ्यासक डॉ. संजय पाईकराव यांची उपस्थिती होती. या सोबतच विचार मंचावर संस्थेच्या अध्यक्षा कीर्तीताई अर्जुन यांची प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच तक्षशिला महाविद्यालय, दारापूरचे प्राचार्य डॉ. मल्लू पडवाल, संस्थेचे कार्यकारी अधिकारी प्रा. पी. आर. एस. राव, तक्षशिला महाविद्यालय अमरावतीच्या प्राचार्य डॉ. माधुरी फुले, उपप्राचार्य प्रीतेश पाटील, रामकृष्ण शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य कृष्णा माकोडे, अमरावती विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. आर. वाघमारे आदी विचार मंचावर उपस्थित होते.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर संस्था गीत गाऊन मान्यवरांचे वृक्ष आणि पुस्तके भेट देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रवीण वानखेडे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकेमध्ये त्यांनी कार्यक्रमाचे महत्त्व आणि गरज विशद केली.

सदर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ता डॉ. संजय पाईकराव आपल्या व्याख्यानात म्हणाले की, 'आपल्या महामानवांची फक्त जयंती आणि स्मृतिदिनानिमित्तच आठवण न होता प्रत्यक्ष जीवनात महामानवांच्या विचारांचा जागर व्हावा. बुद्धीचा विकास होण्यासाठी महामानव पर्वासारखे उपक्रम राबवणे गरजेचे आहे. आज आपण चक्रवर्ती सम्राट




अशोकांची २३३० वी जयंती साजरी करत आहोत. या जयंतीनिमित्त इंग्रज काळातील आर्कालॉजिस्ट विभागाचे मी आभार मानतो कारण त्यांनी अशोकाची धम्मलिपी वाचली आणि सम्राट अशोकाचा खरा इतिहास जगासमोर आणला. सम्राट अशोकाचे चरित्र हे आशियाई खंडातील अनेक भाषातून दिसून येते. यासोबतच या भाषेत अनेक बौद्ध ग्रंथांचे भाषांतर झाल्याचेही दिसते. आजच्या आधुनिक काळात वाचन संस्कृती कमी होत असली तरी ऑनलाईन वाचन वाढले आहे. त्यामुळे सम्राट अशोकाच्या कार्य आणि जीवनावर प्रकाश टाकण्यासाठी आपण ऑनलाईन माध्यमाचा उपयोग करावा. अशोकाच्या चरित्राचा अभ्यास केल्यावर त्यांचे दोन पैलू आपल्यासमोर दिसतात. एक जगज्जेता आणि दुसरा बौद्ध धम्म आणि संस्कृतीचा प्रचार करणारा धम्मदूत. अशोकाने खरोष्टी, ग्रीक आणि इतर भाषेत लिहिलेल्या शिलालेखात मानवतेची शिकवण दिसून येते. बौद्ध संस्कृती जगाला सांगण्याचे काम इंग्रजांनी केले. अशोकाने तिसरी बौद्ध संगीती पाटलीपुत्र येथे घडवून आणली. त्यांनी नैतिकतेचे शिक्षण दिले. तसेच जगाला अहिंसेचा धम्म आणि बौद्ध तत्त्वज्ञान सांगितले. सम्राट अशोक हे लोक कल्याणकारी राजा होते. त्यांचा इतिहास नव्याने शोधण्याची गरज आहे.' यानंतर माजी परीक्षा नियंत्रक बी.आर. वाघमारे यांनी सम्राट अशोकाच्या कार्याची महती सांगितली. तसेच विखूरलेले बौद्ध तत्त्वज्ञान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एकाच ग्रंथात समाविष्ट केल्याचीही मांडणी केली. यानंतर अध्यक्षीय भाषणात डॉ. कमलाकर पायास म्हणाले की, 'पाली प्राकृत सर्व भाषांची जननी आहे. त्यामुळे इतिहासाचे पुनर्लेखन होणे गरजेचे ठरते. सम्राट अशोक हे जगातील सगळ्यात जास्त लोकसंख्येवर राज्य करणारे महानायक होते. पुष्यमित्र शुंगाने कपटाने बौद्ध संस्कृती नष्ट केली. त्यामुळे बौद्ध भिक्खूंनी इतर आशियाई देशांमध्ये पलायन करून बौद्ध संस्कृतीची पाळेमुळे रोवली. सध्याच्या पाकिस्तानातील तक्षशिला विद्यापीठ जगातले पहिले विद्यापीठ होते. चिनी प्रवाशांनी भारतातील बौद्ध संस्कृती आणि ज्ञान जगामध्ये पसरविले. बुद्धाचा सिद्धांत असल्यामुळे कोणतेही साम्राज्य कधी ना कधी नष्ट होते याची जाणीव आपण सगळ्यांनी ठेवली पाहिजेत. सम्राट अशोक यासोबतच मौर्यांचा काळ हाच खरा भारताचा सुवर्णकाळ होता. बाबासाहेबांनी अशोकाचा स्वीकार करून बौद्ध धम्म आणि संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार केला. वारकरी संप्रदाय, अवधूत पंथ ह्या बौद्ध धम्माच्याच शाखा आहेत. जगातील पहिला मीडिया गौतम बुद्धाने सुरू केला आणि त्यानंतर हा वारसा सम्राट अशोकाने चालविला. यानंतर संत कबीर आणि दोहे संत तुकारामांनी अभंग आणि आपल्या सर्व महामानवांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून मानवतेचा संदेश जगाला दिला.' यासोबतच त्यांनी अनेक महत्त्वाच्या विषयांवर प्रकाश टाकला. आजच्या महामानव पर्वाच्या प्रमुख उपस्थितीत संस्थेच्या अध्यक्षा कीर्तीताई अर्जुन यांनी सदर कार्यक्रमाला शुभेच्छा देऊन बुद्धाने कसे जगायला शिकविले यावर प्रकाश टाकला. तसेच सम्राट अशोकांच्या लेणी आणि स्तूपाचे महत्त्व अधोरेखित करून सभागृहाला अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले.

महामानव पर्वाच्या तिसऱ्या पुष्पाचे संपूर्ण सूत्रसंचालन प्रा. डॉ. रजनी गेडाम यांनी पाली भाषेतून अत्यंत मनमोहक आणि भावनाशीलपणे केले. तसेच सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रशांत खेडकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे पदाधिकारी, डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय अमरावती, तक्षशिला महाविद्यालय अमरावती, तक्षशिला महाविद्यालय दारापूर आणि रामकृष्ण शिक्षणशास्त्र महाविद्यालय अमरावतीचे प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि परिसरातील नागरिक हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा फुलेंची जयंती साजरी, स्मारकाची मागणी

**अचलपूर/प्रतिनिधीः-** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त बहुजन समाज पार्टी अचलपूर विधानसभा क्षेत्रातील परतवाडा व अचलपूर शाखेच्या वतीने अत्यंत श्रद्धाभावाने अभिवादन करण्यात आले. यावेळी महात्मा फुलेंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला बहुजन समाज पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा महासचिव संजय मोहने यांच्या हस्ते महात्मा फुलेंच्या प्रतिमेला हार अर्पण करण्यात आला. त्यानंतर आपल्या मनोगतात त्यांनी अचलपूर–परतवाडा या जुळ्या शहराच्या सामाजिक जाणीवांवर भाष्य करत खंत व्यक्त केली.

'इतक्या मोठ्या लोकसंख्येचे आणि नगरपालिकेच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले हे जुळे शहर पुरोगामी विचारांचे आहे. येथे फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांना मानणारा मोठा वर्ग आहे. मात्र, महात्मा फुलेंची जयंती साजरी करताना त्यांच्या नावाचा पुतळा किंवा स्मारक नसल्यामुळे चौकात फोटो ठेवून अभिवादन करावे लागते, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे,' असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.




यावेळी नगरपालिकेने तातडीने लक्ष घालून महात्मा फुले स्मारकासाठी जागा उपलब्ध करून द्यावी व शहरात भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी ठाम मागणी करण्यात आली. उपस्थित कार्यकर्त्यांनीही या मागणीला जोरदार पाठिंबा दिला. या कार्यक्रमाला जि. एस. खांडेकर (इन्चार्ज, अचलपूर विधानसभा), भैयासाहेब कांबळे (महासचिव), बाबाराव वानखडे (शहर अध्यक्ष), माजी मुख्याध्यापक बाळासाहेब देऊळकर, सुनिल इंगळे, राहुल देवळेकर, राजू गायकवाड, अरुण वानखडे, वनदेवराव गवई, चंदन वानखडे, भाऊसाहेब अवसरमोल, गजानन लबडे, दादाराव इंगोले यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.कार्यक्रमातून महात्मा फुलेंच्या सामाजिक समतेच्या विचारांची उजळणी करत त्यांच्या स्मारकाच्या उभारणीसाठी एकमुखी मागणी करण्यात आली.




## प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांचे निधनावर प्रतिक्रिया

### आशा ताईंचा आवाज चिरंतन, अमर आहे -खासदार डॉ.अनिल बोंडे

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय संगीतविश्वातील एक अजरामर आवाज हरपल्याची भावना व्यक्त करताना मन अत्यंत व्यथित झाले आहे. आशा भोसले यांनी आपल्या बहुरंगी, भावपूर्ण आणि जादुई गायनाने अनेक पिढ्यांच्या हृदयात स्थान मिळवले. त्यांचे योगदान केवळ हिंदीच नव्हे तर विविध भारतीय भाषांमधील संगीताला समृद्ध करणारे ठरले आहे. त्यांच्या जाण्याने संगीतविश्वात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांची गाणी, त्यांची शैली आणि त्यांची ऊर्जा सदैव आपल्या सोबत राहील, अशा शब्दात ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनाबद्दल राज्यसभेचे सदस्य तथा जेष्ठ भाजप नेते डॉ. अनिल बोंडे यांनी शोक संवेदना व्यक्त केला आहे. ते म्हणाले, भारतीय संगीतसृष्टीतील एक अनमोल रत्न आज आपल्यातून निघून गेले. स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांच्या निधनाने केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण भारत शोकसागरात बुडाला आहे. त्यांचा सुरेल आवाज हा पिढ्यांपिढ्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. दुःखात, आनंदात, प्रेमात-जीवनाच्या प्रत्येक क्षणी त्यांची गाणी आपल्या सोबत होती.



१२ हजारांहून अधिक गाणी गाऊन त्यांनी भारतीय संगीताला जागतिक उंचीवर नेले. वयाच्या ९२ व्या वर्षीही त्यांची कलासाधना अखंड सुरू होती, हेच त्यांच्या संगीतावरील निस्सीम प्रेमाचे प्रतीक आहे. आशा ताईंचा आवाज कधीही थांबणार नाही, तो चिरंतन आहे, अमर आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याचे बळ देवो.

**-डॉ.अनिल बोंडे,** राज्यसभा सदस्य, तथा माजी कृषिमंत्री, महाराष्ट्र

### त्यांनी गायलेले प्रत्येक गाणे अजरामर

प्रसिद्ध गायिका आशाताई भोसले यांचे निधन म्हणजे केवळ एका कलाकाराचाच नव्हे, तर एका युगाचा अंत आहे. त्यांच्या आवाजाने पिढ्यानपिढ्यांची हृदये भावपूर्णतेने भरून टाकली आणि त्यांनी गायलेले प्रत्येक गाणे अजरामर केले.



आम्ही परमेश्वराकडे प्रार्थना करतो की, त्यांच्या दिवंगत आत्म्यास शांती लाभो आणि त्यांच्या प्रियजनांना हे अथांग दुःख सहन करण्याची शक्ती मिळो. आशा ताईना भावपूर्ण श्रद्धांजली.

**- खा बळवंत वानखडे** खासदार अमरावती लोकसभा

### आशाताईंच्या निधनाने देशाची मोठी हानी- आ.सुलभा खोडके

गेली सात दशके आपल्या जादुई स्वरांनी चाहत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या आणि असंख्य संगीत प्रेमींच्या हृदय सिंहासनावर अधिराज्य गाजवणाऱ्या जेष्ठ अष्टपैलू गायिका, मेलडी क्वीन आशा भोसले यांचे रविवार दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वावरच नाही तर संपूर्ण देशावर शोककळा पसरली आहे. आशाताईंच्या निधनाने केवळ संगीत विश्वाचीच नाही तर देशाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या निधनाने संगीत विश्वाला वाहून घेतलेला आणि आपल्या जादुई स्वरांनी संपूर्ण संगीत विश्वावर अधिराज्य गाजवणारा शेवटचा तारा निखळल असल्याची शोकमय संवेदना आ. सुलभा खोडके यांनी व्यक्त केली आहे



## १ व १० वरिल उर्वरित

### कपिलवस्तु नगरात तरुणाचा खून

काढला. आरडाओरडा ऐकून स्थानिक नागरिक आणि संतोषचा भाऊ धावून आले. मात्र तोपर्यंत हल्लेखोर पसार झाले होते. घटनास्थळी आरोपींचे एक वाहन सोडून दिल्याने पोलिसांना तपासात महत्त्वाचा धागा मिळाला. जखमी अवस्थेत संतोषला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यात आले, परंतु डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. त्याच्या शरीरावर तीन ते चार खोल जखमा असल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. पोलिस उपायुक्त गणेश शिंदे यांनीही रुग्णालयात भेट देत तपासाला गती देण्याचे निर्देश दिले. पोलिसांनी जलद कारवाई करत पाच जणांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे शहरात वाढत्या गुन्हेगारीबाबत पुन्हा चिंता व्यक्त केली जात आहे. किरकोळ वादातून थेट जीवघेण्या हल्ल्यापर्यंत पोहोचणारी प्रवृत्ती धोकादायक ठरत असून, पोलिसांसमोर अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

### पंक्चर दुरुस्तीच्या दुकानात

व मोसीम पठाण हे दुकानात आले. जुन्या वादाच्या कारणावरून त्यांनी फिर्यादीशी वाद घालून त्याला मारहाण केली.

यावेळी फिर्यादीच्या डोक्यावर व हातावर मारहाण करण्यात आली. तसेच फिर्यादीला वाचवण्यासाठी आलेल्या अजहर अशफाक अली सय्यद यांच्यावरही हल्ला करण्यात आला. त्यांना गंभीर दुखापत झाल्याने सेवाग्राम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

या घटनेनंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०९(१), ११५(२), ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

### ३८ वर्षांपूर्वी आशा भोसले यांना

भोसले यांना डी.लिट देऊन त्यांचा सन्मान करण्याचा प्रस्ताव डॅडी देशमुख यांनी मांडला होता. त्याला सर्वच सदस्यांनी पाठिंबा दिला होता. आशा भोसले यांना ही उपाधी अमरावती विद्यापीठाच्या तिसऱ्या दीक्षांत सोहळ्यात अमरावती विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. के.जी. देशमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली होती, अशी माहिती अमरावती विद्यापीठाचे माजी जनसंपर्क अधिकारी डॉ. किशोर फुले यांनी दिली.

सन्मान स्वीकारण्यासाठी आशा भोसले या अमरावतीला आल्या होत्या. विदर्भ महाविद्यालयाच्या प्रांगणातच दीक्षांत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी आशा भोसले म्हणाल्या होत्या, वऱ्हाड आणि अमरावतीने मंगेशकर कुटुंबीयांना नेहमीच साथ दिली आहे. माझे वडील दीनानाथ मंगेशकर यांचे अनेक कार्यक्रम अमरावती शहरात होत होते. अमरावतीकर प्रेक्षकांनी सातत्याने मदत केली, असे माझी आई नेहमीच सांगत होती. मी जास्त शिकलेली नसतानाही अमरावती विद्यापीठाने माझा सन्मान केला, सर्वांची मी ऋणी आहे. डॉ. किशोर फुले यांनी या कार्यक्रमातील आठवणींना उजाळा दिला.

कविवर्य सुरेश भट हे मूळचे अमरावतीचे. त्यांच्या अनेक गीतांना आशा भोसले यांनी स्वरसाज चढवला. 'तरूण आहे रात्र अजुनी, राजसा निजलास का रे' हे गीत तर अत्यंत गाजलेले. हे गीत पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी संगीतबद्ध केलेले. भावगीत प्रकारातील हे गाणे अत्यंत लोकप्रिय ठरले. आशा भोसले यांच्या कर्णमधुर आवाजात ते ऐकणे हा विलक्षण अनुभव ठरतो.

### कारची ट्रकला धडक;

धडक दिली. या अपघातात सरोज मल्हा यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर बसंतलाल मल्हा (वय ८१) गंभीर जखमी झाले असून, लक्ष्मीनारायण मल्हा (वय ४५) यांना किरकोळ दुखापत झाली आहे. प्राथमिक अंदाजानुसार, कारचे एअरबॅग न उघडल्यामुळे जखमींना अधिक मार लागल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलिस निरीक्षक विशाल पोलकर, पोलिस उपनिरीक्षक इकबाल शेख, पोलिस कर्मचारी वीरेंद्र तराळे, मंगेश खंडारे तसेच एमएसएफचे जवान स्नेहल तायडे आणि कुणाल सूर्यवंशी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. जखमींना तसेच मृतदेहाला तातडीने रुग्णवाहिकेद्वारे धामणगाव रेल्वे येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. अपघातग्रस्त वाहन क्रेनच्या सहाय्याने टोल नाक्यावरून हटविण्यात आले. या घटनेची माहिती दत्तापूर पोलिस ठाण्याला देण्यात आली असून, अपघातानंतर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. मात्र प्रशासनाच्या तत्परतेमुळे लवकरच वाहतूक सुरळीत करण्यात आली. पुढील तपास दत्तापूर पोलिसांकडून सुरू आहे.

### पोलिस' बनून लाखोंची लूट

त्यांनी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली. तपासात ही फसवणूक १ मे २०२५ ते १६ जुलै २०२५ दरम्यान झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी अमरावतीतील एका ४५ वर्षीय महिलेसह दोन अज्ञात महिला मोबाईलधारकांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस सध्या या टोळीचा सखोल तपास करत असून, इतर साथीदारांचा शोध घेतला जात आहे. अशा प्रकारच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांनी स्वतःला पोलिस सांगणाऱ्या अनोळखी व्यक्तींवर त्वरित विश्वास ठेवू नये, तसेच शंका असल्यास जवळच्या पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

### नाफेड केंद्रावरील बारदाना संपणे

मारोटकर यांनी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे दिला. या निवेदनाची प्रत जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना सुद्धा देण्यात आली . २९ मार्चपासून नांदगाव केंद्रावरील नाफेडची तुर व चना खरेदी बारदाना अभावी बंद आहे. एक ते दीड महिन्याच्या कालावधीतच खरेदीमध्येच बारदाना संपतो हे प्रशासकीय यंत्रणेचे ढिसाळ नियोजन असून शासनाचे अपयश म्हणावे लागेल. खरेदी केंद्र बंद असल्याचा फायदा व्यापारी घेत आहे. शेतकऱ्याला आपला माल मातीमोल भावाने विकण्याची वेळ आली आहे. निसर्गाच्या लहरीपणाने शेतकरी आधीच होरपळला. पंधरा दिवसापासून बारदाण्याअभावी खरेदी बंद असणे हा व्यापाऱ्यांसोबत साठे लोटे असल्याचा प्रकार तर नाही ना? शेतकरी आपला शेतमाल कवडीमोल भावाने व्यापाराला विकत आहे. तरी शासन व प्रशासकीय यंत्रणा मूग गिळून का बसली असा आरोप निवेदना मधून करण्यात आला असून तीन दिवसात बारदाना उपलब्ध करून तुर व चना खरेदी सुरू करा अन्यथा शेतकऱ्यासह तहसील कार्यालयातच ठिय्या आंदोलन करू असा इशारा प्रकाश मारोटकर यांनी प्रशासनाला देण्यात आला. निवेदन देतेवेळी शिवसेना विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर, बाळासाहेब राणे ,न प सभापती वासुदेव लोखंडे, निलेश इखार, लीलाधर चौधरी, नंदू राणे ,शुभम रावेकर, अक्षय हिवराळे ,पवन शिरभाते यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

### १५ वर्षांवरील वाहनांवर 'ग्रीन

मानक : ४,०००

पेट्रोलवर चालणारी इतर वाहने (दुचाकी वगळून) :

बीएस-६ व त्यावरील : ३,०००

बीएस-४ व त्याखालील : ६,०००

डिझेलवर चालणारी इतर वाहने (दुचाकी वगळून) :

बीएस-६ व त्यावरील : ३,५००

बीएस-४ व त्याखालील : ७,०००

तसेच, क्रेनसाठी आकारण्यात येणारा कर कमाल ३० लाखांच्या मर्यादेत राहील, असेही अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे जुन्या वाहनांमुळे होणारे वायूप्रदूषण कमी होण्यास मदत होईल,असे प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी कळविले आहे.

### हावडा-कुर्ला एक्स्प्रेसमधून २३ किलो

या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथक रवाना करण्यात आले आहे. लवकरच आरोपीला अटक केली जाईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

ही कारवाई लोहमार्ग नागपूरचे पोलीस अधीक्षक मंगेश शिंदे, अपर पोलीस अधीक्षक दत्ताराम राठोड आणि डीवायएसपी पांडुरंग सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यापूर्वीही रेल्वे मार्गावरून अमली पदार्थांची वाहतूक उघडकीस आणण्यात आली असली, तरी यंदाच्या वर्षातील ही सर्वात मोठी कारवाई ठरली आहे.

# सैनिकांचे कार्य आम्हाला प्रेरणादायी- तुषार भारतीय



**अमरावती/प्रतिनिधीः-** सैनिकांनी आपलं तरुणपण देशसेवेसाठी खर्ची घातले. आपल्या देशासाठी, मातृभूमी साठी आपलं योगदान त्यांनी दिलं, त्यांच्या पाठीशी त्यांचे कुटुंब त्याच भावनेने त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. त्यांच्या या भावनेला आम्ही सैल्यूट केला पाहिजे. त्यांच्या समस्या त्यांच्या अडचणी समाजाच्या असल्या पाहिजे. शासकीय अधिकारी,राज्यकर्ते यांनी त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घ्यायला पाहिजे. त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी शासन दरबारी मांडण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे भाजपा नेते तुषार भारतीय यांनी सांगीतले.

या प्रसंगी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तुषार भारतीय यांचे पुष्पगुच्छ आणि कार्यवृत्तांत देऊन स्वागत केले, या कार्यक्रमाला माजी सैनिकांचे कुटुंबातील सदस्य सहभागी झाल्याने या कार्यक्रमाला परिवाराचे स्वरूप आले होते. आपल्या सर्वांचे दर्शन झाल्याने मला आनंद होत असल्याचे प्रतिपादन तुषार भारतीय यांनी केले.

हा महत्वपूर्ण मेळावा तीन सत्रात संपन्न झाला. पुणे, मुंबई,संभाजी नगर,अकोला, वाशीम, बुलढाणा,वर्धा,नागपूर चंद्रपूर, अमरावती भंडारा, गडचिरोली या ठिकाणाहून प्रतिनिधी उपस्थित होते. या वेळी भीमरावजी गायकवाड , नामदेवराव मेटांगे, विलास दवणे , देवीदास साबळे, भीमरावजी आरेकर, पांडुरंग खराबे आणि अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

जनमाध्यम
paper - www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठीत सवय
▪ सोमवार १३ एप्रिल २०२६

मंगेशकर कुटुंबातील दुसरा तारा निखळला

# आशा भोसले यांचे निधन

आज सायंकाळी 4 वाजता अंत्यसंस्कार



मुंबई/प्रतिनिधी- आपल्या मंत्रमुग्ध करणा-या स्वरांनी सात दशकांहून अधिक काळ रसिक प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणा-या ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांचे आज मुंबईत निधन झाले. शनिवारी रात्री त्यांना हृदयविकाराचा झटका आणि छातीत संसर्ग झाल्यामुळे दक्षिण मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्रकृती अधिकच खालावली आणि आज दुपारी त्यांची प्राणज्योत मालवली. शनिवारी संध्याकाळी आशाताईंना श्वास घेण्यास त्रास आणि अशक्तपणा जाणवू लागल्याने रुग्णालयात हलवण्यात आले होते. ड?क्टरांच्या विशेष पथकाद्वारे त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू होते. मिळालेल्या माहितीनुसार, आज सायंकाळी ४ वाजता दादर येथील शिवाजी पार्क स्मशानभूमीत त्यांच्यावर शासकीय इतमामात अन्त्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

एका अष्टपैलू कारकीर्दीचा प्रवास- आशा भोसले यांनी केवळ मराठी आणि हिंदीच नव्हे, तर २० पेक्षा जास्त भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये १०,००० हून अधिक गाणी गायली आहेत. त्यांच्या कारकीर्दीत त्यांनी रोमँटिक गाणी, गझल, शास्त्रीय संगीत आणि दम मारो दम सारखी पॉप गाणी गाउन आपले अष्टपैलूत्व सिद्ध केले होते.

■ बालपण आणि सुरुवातीचा संघर्ष (१९३३-१९४८)-आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगलीत झाला. वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्याकडून त्यांना गाण्याचा वारसा मिळाला. अवघ्या ९ व्या वर्षी वडिलांचे छत्र हरपले, ज्यामुळे कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर आणि लता दीदींवर आली. १९४३ मध्ये माझा बाळ या मराठी चित्रपटातील चला चला नव बाळा हे त्यांचे पहिले गाणे होते. १९४८ मध्ये चुनरिया चित्रपटातील सावन आया या गाण्याने त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत पाउल ठेवले.

■ संघर्षातून यशाकडे (१९५०-१९६०)

सुरुवातीच्या काळात मोठ्या गायिकांकडे (उदा. लता मंगेशकर, गीता दत्त) उरलेली गाणी किंवा बी ग्रेड चित्रपटांतील गाणी आशा ताईंच्या वाट्याला येत असत. ओ. पी. नय्यर यांनी आशा ताईंच्या आवाजातील वेगळेपण ओळखले. नया दौर (१९५७) मधील मांग के साथ तुम्हारा आणि उडे जब जब जुल्फें तेरी या गाण्यांनी त्यांना मोठी लोकप्रियता मिळवून दिली. त्या काळात त्यांनी शास्त्रीय संगीत, कव्वाली आणि रोमँटिक गाण्यांमध्ये आपला ठसा उमटवला.

■ सुवर्णकाळ : आर. डी. बर्मन आणि पंचम पर्व (१९७०-१९८०)-आर. डी. बर्मन (पंचमदा) आणि आशा भोसले यांच्या जोडीने भारतीय संगीतात क्रांती घडवली. पाश्चात्य संगीताचा प्रभाव : दम मारो दम (हरे रामा हरे कृष्णा), पिया तू अब तो आजा (कारवाँ) यांसारख्या गाण्यांमुळे त्यांना पॉप क्वीन ही नवी ओळख मिळाली. उमराव जान (१९८१) मधील गझल गाउन त्यांनी सिद्ध केले की, त्या केवळ पापच नाही तर अत्यंत गंभीर आणि शास्त्रीय ढंगाची गाणीही लीलया गाउ शकतात. या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.

■ प्रयोगशीलता आणि नवीन पिढीशी जुळवून घेणे (१९९०-आजतागायत)

वयाच्या साठीनंतरही आशा ताईंनी आपला आवाज तरुण ठेवला. रंगीला रे : १९९५ मध्ये ए. आर. रहमान यांच्या रंगीला चित्रपटातील तनहा तनहा आणि याई रे गाण्यांनी त्यांनी नव्या पिढीलाही वेड लावले.इंडिपोप आणि जागतिक सहयोग : त्यांनी जानम समझा करो सारखे पॉप अल्बम्स काढले आणि ब्रिटिश बँड कार्ड रेड तसेच बॉब जार्ज यांसारख्या आंतरराष्ट्रीय कलाकारांसोबत काम केले.

## वानखेडे स्टेडियमवर दोन मिनिटांचे मौन पाळण्यात आले

आशा भोसले यांच्या निधनाबद्दल आदरांजली वाहण्यासाठी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर दोन मिनिटांचे मौन पाळण्यात आले. मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळूर यांच्यातील आयपीएल २०२६ च्या मोठ्या सामन्यापूर्वी ही आदरांजली वाहण्यात आली. सामन्यादरम्यान, दोन्ही संघांतील खेळाडूंनी केवळ मौन पाळले नाही, तर त्या महान गायिकेच्या स्मरणार्थ हातावर काळ्या पट्ट्याही बांधल्या. मैदानावर आशा भोसले यांची गाणीही वाजवण्यात आली.



## देवेंद्र फडणवीस यांनी आशा भोसले यांना त्यांच्या निवासस्थानी आदरांजली वाहिली

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पद्मविभूषण आणि महाराष्ट्र भूषण आशा भोसले यांना अखेरचा निरोप देण्यासाठी आणि भावपूर्ण आदरांजली वाहण्यासाठी मुंबईतील त्यांच्या निवासस्थानी भेट दिली.



2011 • सर्वाधिक गाण्यांसाठी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये नोंद.



2008 • राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी त्यांना पद्मविभूषण पुरस्कार प्रदान केला.



2000 • दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



1997 • ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळवणारी पहिली भारतीय गायिका

## 12 हजारांहून अधिक गाणी, 7 वेळा फिल्मफेअर

*मुंबई :गेल्या काही दिवसांपासून आशा भोसले यांना प्रकृतीच्या तक्रारी जाणवत होत्या. त्यांना प्रचंड थकवा आणि छातीत संसर्गाचा त्रास होत होता. प्रकृती खालावल्यामुळे ११ एप्रिल २०२६ रोजी संध्याकाळी त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले होते. यानंतर रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला. यानंतर आता ड?क्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्व अवयव निकामी (मल्टी ऑर्गन फेल्युअर)मुळे आशा भोसले यांचे निधन झाले. त्यांचे सुपुत्र आनंद भोसले यांनी ही दुर्दैवी बातमी दिली. माझी आई आशा भोसले यांचे निधन झाले आहे. उद्या दुपारी ४ वाजता दादर येथील शिवाजी पार्कात त्यांच्यावर शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात येतील. त्यापूर्वी त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी लोअर परळ येथील त्यांच्या निवासस्थानी ठेवण्यात येणार आहे, असे आनंद भोसले यांनी सांगितले. त्यांच्या असामान्य कार्याची दखल घेत त्यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक असलेला पद्मविभूषण पुरस्काराने २००८ मध्ये त्यांना गौरवण्यात आले. त्यानसोबतच चित्रपटसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल २००० मध्ये त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कार देण्यात आला. यासोबतच महाराष्ट्राचा सर्वोच्च सन्मान असलेला महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२१ मध्ये त्यांना सन्मानित करण्यात आले. तब्बल ७ वेळा त्यांना फिल्मफेअर सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका पुरस्कार देण्यात आला. आशा भोसले यांचा प्रवास हा केवळ एका गायिकेचा प्रवास नसून तो भारतीय चित्रपट संगीतासाठी सुवर्ण इतिहास मानला जातो. त्यांचा आवाज वयाच्या ९० व्या वर्षीही तितकाच तरुण आणि प्रेरणादायी वाटायचा. आशा भोसले यांच्या निधनाने भारतीय संगीताची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. त्यांच्या जाण्याने एका सुवर्णकाळाचा अंत झाला आहे, अशा शब्दांत हळहळ व्यक्त केली जात आहे. प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांना १९८७ मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या तिस-या दीक्षांत सोहळयात 'डी.लिट' पदवी देउन सन्मानित करण्यात आले होते इ्र१, १०ट. तत्कालीन कुलगुरू डॉ. के. जी. देशमुख यांच्या हस्ते हा गौरव करण्यात आला होता, ज्याचे पुढाकार प्रा. डॉ. डॅडी देशमुख यांनी घेतला होता. या सन्मानाबद्दल त्यांनी अमरावतीकरांचे आभार मानले होते .*

# शालेय बसचे भाडे आता सरकार ठरवणार

**मुंबई/प्रतिनिधी-** महाराष्ट्रात स्कूल बसच्या भाडे नियंत्रणासंदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. यात नवीन नियमांनुसार शालेय बसचे भाडे आता प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून निश्चित केले जाणार आहे. परिणामी, विद्यार्थ्यांकडून फक्त मासिक भाडेच आकारले जाईल. तर आगाउ रक्कम घेण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे पालकांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. शालेय वाहतूक अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि उत्तरदायी करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.



शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत महाराष्ट्र शासनाने शालेय बस व वाहतूक व्यवस्थेबाबत कडक आणि सर्वसमावेशक नियमावली जाहीर करण्याची तयारी सुरू केली आहे. गृह विभागाने प्रसिद्ध केलेल्या मसुदा अधिसूचनेनुसार, महाराष्ट्र मोटार वाहन (शालेय बस नियमन) (प्रथम सुधारणा) नियम, २०२६ लागू करण्याचा प्रस्ताव असून, यात सुरक्षितता, पारदर्शकता आणि जबाबदारी यावर विशेष भर देण्यात आला आहे. या बाबतीत अधिसूचना जाहीर झालेल्या दिनांकापासून पंधरा दिवस या विहित वेळेत संबंधित संकेतस्थळावर सर्वसामान्य जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या असून त्याला सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

**पालकांच्या तक्रारींवर त्वरित तोडगा-** दरम्यान, प्रत्येक शाळेत स्कूल ट्रान्सपोर्ट कमिटी कार्यरत राहणार असून, ती भाडे, सुरक्षितता आणि सेवा यासंबंधी पालकांच्या तक्रारींचे निवारण करेल. तसेच तिमाही अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**डिजिटल मानिटरिंग प्रणाली लागू-** विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक वाहनात डिजिटल सेफ्टी मानिटरिंग सिस्टम बसवणे आवश्यक असेल. या प्रणालीद्वारे वाहनाचे लाईव्ह ट्रॅकिंग, डिजिटल उपस्थिती नोंद, स्वयंचलित अलर्ट आणि पालकांना थेट माहिती मिळणार आहे. राज्यस्तरीय प्लॅटफ?र्मशी या प्रणालीचे एकत्रीकरणही करण्यात येणार आहे.

**विद्यार्थ्यांच्या देखरेखीवर विशेष भर-** प्रत्येक विद्यार्थ्याची चढ-उतार वेळेसह दैनिक उपस्थिती नोंदवणे बंधनकारक असेल. विशेषतः पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिक (इयत्ता पाचवीपर्यंत) विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक प्रवासात महिला परिचारिका किंवा नियुक्त कर्मचारी असणे आवश्यक राहील.

**अपंग व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुविधा-** विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षित कर्मचारी, सुलभ प्रवेश व्यवस्था आणि आवश्यक तेव्हा पालक/शिक्षक उपस्थितीची तरतूद करण्यात आली आहे.

**कर्मचा-यांची काटेकोर पडताळणी-** बस चालक, वाहक व इतर कर्मचा-यांची पार्श्वभूमी तपासणी, वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र आणि अधिकृत नियुक्तीपत्र अनिवार्य करण्यात आले आहे. सर्व नोंदी तपासणीसाठी उपलब्ध ठेवणे बंधनकारक असेल.

**नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई-** नवीन नियम लागू झाल्यानंतर तीन महिन्यांत सर्व शालेय वाहने नियमांनुसार सुसज्ज करणे आवश्यक राहील. अन्यथा संबंधित वाहनांचे परवाने निलंबित किंवा रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

शालेय वाहतुकीची नियमित तपासणी शिक्षण व परिवहन विभाग संयुक्तपणे करणार असून, त्याचे अहवाल जिल्हा पातळीवरील समितीकडे सादर केले जातील. या सुधारित नियमांमुळे शालेय वाहतूक अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि तंत्रज्ञानाधारित होणार असून, पालक आणि विद्यार्थ्यांचा विश्वास अधिक दृढ होणार असल्याची भावना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली आहे.

## विहिरीत पडून वाघाचा मृत्यू

**गोंदिया :** पाणी आणि शिकारीच्या शोधात तोंडी नसलेल्या विहिरीत पडून वाघाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी तिरोडा तालुक्यातील सर्रा माल्ही येथे उघडकीस आली. दरम्यान या वाघाचा मृत्यू चार दिवसांपूर्वी झाला असा अंदाज वाघाच्या मृतदेहावरून वर्तविला जात आहे. तिरोडा तालुक्याला नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प लागून आहे. त्यामुळे या परिसरात नेहमीच वन्यप्राण्यांचा वावर असतो. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू असून वन्यप्राणी पाण्याच्या शोधात गावाकडे धाव घेत असल्याचे चित्र आहे. रविवारी तालुक्यातील सर्रा माल्ही येथे गावालगत असलेल्या एका विना तोंडीच्या विहिरीत वाघ मृतावस्थेत पडून असल्याचे गावक-यांना आढळला. गावक-यांनी लगेच याची माहिती वन विभागाच्या अधिका-यांना दिली. माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. यानंतर पंचनामा करून मृत वाघाला विहिरीबाहेर काढण्यात आले. वाघाच्या मृतदेहावरून हा वाघ चार दिवसांपूर्वी या विहिरीत पडला असावा, असा अंदाज वन विभागानं व्यक्त केला आहे.




## आशा भोसलेंच्या संगीत प्रवासाने सांस्कृतिक वारशाला समृद्ध केले

### पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून श्रद्धांजली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतातील सर्वात ख्यातनाम आणि अष्टपैलू आवाजांपैकी एक असलेल्या आशा भोसले जी यांच्या निधनाने अतिशय दुःख झाले. त्यांच्या अनेक दशकांच्या अद्वितीय संगीत प्रवासाने आपल्या सांस्कृतिक वारशाला समृद्ध केले आणि जगभरातील असंख्य लोकांच्या मनाला स्पर्श केला. भावपूर्ण गीतांपासून ते जोशपूर्ण संगीत रचनांपर्यंत, त्यांच्या आवाजात कालातीत तेज होते. त्यांच्याशी झालेल्या संवादांच्या आठवणी मी सदैव जपून ठेवेन त्यांच्या कुटुंबीयांना, चाहत्यांना आणि संगीतप्रेमींना माझ्या भावपूर्ण संवेदना. त्या पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहतील आणि त्यांची गाणी सदैव लोकांच्या आयुष्यात गुंजत राहतील.

## इराण-अमेरिका संघर्ष पेटला! डोनाल्ड ट्रम्प यांची होर्मुज सामुद्रधुनीला नाकेबंदी; जागतिक तेल पुरवठा धोक्यात

**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था-** मध्यपूर्वेतील तणाव आता एका अत्यंत धोकादायक वळणावर पोहोचला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी होर्मुजच्या सामुद्रधुनीची पूर्णपणे नाकेबंदी करण्याची घोषणा केली आहे. आता इथून कोणत्याही जहाजाला येण्या-जाण्याची परवानगी दिली जाणार नाही,अशा कडक शब्दांत ट्रम्प यांनी इराणला इशारा दिला आहे. पाकिस्तानमध्ये अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेली उच्चस्तरीय शांतता चर्चा कोणत्याही कराराशिवाय संपुष्टात आली. अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे.डी. व्हॅन्स हे इराणशी तोडगा काढण्यात अपयशी ठरल्यानंतर ट्रम्प यांनी तातडीने नाकेबंदीचा निर्णय जाहीर केला. इराणने आपल्या अण्वस्त्र कार्यक्रमाबाबत माघार घेण्यास नकार दिल्यामुळे ही बोलणी फिस्कटल्याचे समजते. ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रुथ सोशल प्लॅटफार्मवर म्हटले की आजपासून अमेरिकन नौदल होर्मुज सामुद्रधुनीतून जाणा-या सर्व जहाजांची नाकेबंदी करेल. जगातील सर्वात शक्तिशाली नौदल आता या मार्गावर नियंत्रण ठेवेल. जर कोणत्याही इराणी जहाजाने किंवा सैन्याने आमच्यावर हल्ला केला, तर त्यांना थेट नरकात धाडले जाईल बेकायदेशीर कर इराण या सागरी मार्गावरून जाणा-या जहाजांकडून मोठ्या प्रमाणात शुल्क वसूल करत होता. ट्रम्प यांनी हे शुल्क बेकायदेशीर असल्याचे सांगत इराणला पैसे देणा-या जहाजांनाही अमेरिकन नौदल अडवणार असल्याचे स्पष्ट केले आहे. जगातील एकूण तेल व्यापारापैकी सुमारे २०% व्यापार याच मार्गाने होतो. या नाकेबंदीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जगातील एकूण तेल व्यापारापैकी सुमारे २०% व्यापार याच मार्गाने होतो. या नाकेबंदीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सध्या अमेरिकन विनाशिका होर्मुजमध्ये दाखल झाल्या असून, तिथे मोठ्या प्रमाणावर लष्करी हालचाली सुरू आहेत. इराणनेही याला प्रत्युत्तर देण्याची धमकी दिल्याने संपूर्ण जगाचे लक्ष आता या युद्धाच्या छायेवर आहे.ट्रम्प यांच्या मते, चीन, जपान, जर्मनी आणि दक्षिण कोरिया सारख्या देशांना मदत करण्यासाठी अमेरिका हे पाउल उचलत आहे, कारण हे देश स्वत? काहीही धाडस दाखवू शकले नाहीत. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेसाठी मोठ्या प्रमाणावर आखाती देशांवर अवलंबून आहे. होर्मुज सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे भारताचा तेल पुरवठा विस्कळीत होउ शकतो आणि परिणामी देशात पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## आता 25 दिवसांत गॅस सिलिंडर बुक करता येणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** एलपीजी गॅस सिलिंडरबद्दल अजूनही सर्वसामान्यांमध्ये चिंता असल्याचे दिसत आहे. परंतु भारत सरकारने स्पष्ट केले आहे की देशात एलपीजीची कोणतीही कमतरता नाही. त्यामुळे साठेबाजी करू नका आणि घाबरून बुकिंग करण्याची घाई करू नका, असा आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे. एलपीजी सिलिंडर बुकिंगसंदर्भातले नवे नियम पुन्हा एकदा स्पष्ट करण्यात आले आहेत. आता शहरी भागात २५ दिवसांच्या आत सिलिंडर बुक करता येणार आहे. पण गॅस सिलिंडर बुक केल्यानंतर तो तुम्हाला किती दिवसांत मिळेल, हे माहीत आहे का? पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी सांगितले की, एलपीजी सिलिंडर वितरणाला पूर्वीपेक्षा थोडा जास्त वेळ लागत आहे. पूर्वीच्या तुलनेत सिलिंडर वितरणात थोडा विलंब होत आहे. पूर्वी सिलिंडर दोन ते तीन दिवसांत मिळायचं, पण आता नागरिक घाबरून अधिक प्रमाणात बुकिंग करत आहेत. त्यामुळे डिलिव्हरीला चार ते पाच दिवस किंवा काही ठिकाणी त्याहीपेक्षा जास्त काळ लागू शकतो, असे त्या म्हणाल्या. ही परिस्थिती लवकरच पूर्ववत होईल अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली. पश्चिम आशियातील सध्याच्या संकटामुळे देशभरात एलपीजी सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाला. एलपीजीच्या पुरवठ्याबाबत दबाव वाढत असून त्या पार्श्वभूमीवर आता सरकारने ग्राहकांना घाबरून खरेदी न करण्याचा आणि अनावश्यक एलपीजी बुकिंग न करण्याचा इशारा दिला आहे. एलपीजी सिलिंडरसाठी अनेक नागरिक थेट वितरकांकडे जाउन रांगा लावताना दिसत आहेत. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने नागरिकांना डिजिटल बुकिंग माध्यमांचा वापर करण्याचं आवाहन केलं आहे. जेणेकरून वितरण सुव्यवस्थित होईल आणि पुरवठ्यातील व्यत्यय टाळता येईल. त्यातही अधिक पारदर्शकता आणण्यासाठी आणि गैरवापर रोखण्यासाठी डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोड अनिवार्य करण्यात आला आहे.



# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा
| सोमवार, १३ एप्रिल २०२६ |

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


# गाव तिथे काँग्रेस, वार्ड तिथे काँग्रेस : अकोल्यातून संघटन सृजन अभियानाची दमदार सुरुवात

## » तळागाळातील कार्यकर्त्यांना प्राधान्य; डिजिटल डेटाबेसद्वारे पक्ष बळकट करण्याचा निर्धार




• अकोला | प्रतिनिधी •

काँग्रेस पक्षाचे संघटन अधिक सक्षम, सशक्त व परिणामकारक करण्यासाठी "गाव तिथे काँग्रेस, वार्ड तिथे काँग्रेस" ही व्यापक संघटन मोहीम अकोल्यातून सुरू करण्यात आली. तळागाळातील कार्यकर्त्यांना केंद्रस्थानी ठेवून पक्षाची पुनर्बांधणी करण्याचा निर्धार काँग्रेस नेत्यांनी व्यक्त केला. स्वराज्य भवन येथे आंध्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा अकोला जिल्हाध्यक्ष निवडीसाठी नियुक्त निरीक्षक रुद्र राजू यांच्या उपस्थितीत "संघटन सृजन अभियान"चा प्रारंभ झाला. या वेळी आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी पक्षाच्या आगामी संघटनात्मक निवडणुका, कार्यपद्धती व नियोजन याबाबत सविस्तर माहिती दिली.

राजू म्हणाले की, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि नेते राहुल गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष आधुनिकतेकडे वाटचाल करत आहे. पारंपरिक चौकटीत बदल करून आता कार्यकर्त्यांची संपूर्ण माहिती डिजिटल स्वरूपात संकलित केली जात आहे. प्रत्येक कार्यकर्त्याचा डेटा तयार करून त्याच्या कार्याचा आढावा घेता येणार असून यामुळे संघटन अधिक पारदर्शक व गतिमान होईल.

जिल्हा अध्यक्ष, ब्लॉक अध्यक्ष, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, सेवा दल तसेच विविध आघाड्यांच्या कार्यकारिण्या लोकशाही पद्धतीने निवडण्यात येणार आहेत. या प्रक्रियेत निष्ठावान, प्रामाणिक, सक्रिय आणि तडफदार कार्यकर्त्यांना संधी दिली जाईल. गटबाजीला आळा घालत सर्वांना समान संधी देण्यावर भर राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी माजी पालकमंत्री तथा निवडणूक निरीक्षक नितीन राऊत यांनी काँग्रेसच्या संघटन मोहिमेचा रोडमॅप स्पष्ट केला. ते म्हणाले की, "गाव तिथे काँग्रेस, वार्ड तिथे काँग्रेस" ही मोहीम केवळ घोषणा नसून ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी पक्षाने कृती आराखडा तयार केला आहे. प्रत्येक मतदार केंद्रावर बूथ स्तर मजबूत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. बूथ कमिटी सक्रिय करून निवडणुकांमध्ये प्रभावी उपस्थिती निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे.

राऊत यांनी पुढे सांगितले की, वंचित, शोषित, अल्पसंख्याक आणि मागास घटकांना संघटनात स्थान देऊन त्यांना नेतृत्वाच्या संधी दिल्या जातील. काँग्रेसची विचारधारा ही सर्व धर्म, सर्व समाजघटकांचा सन्मान करत समान संधी देण्याची आहे. लोकशाही मूल्ये जपणे आणि संविधानाची ताकद वाढवणे हेच काँग्रेसचे ध्येय असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

पक्षातील तळागाळातील कार्यकर्त्यांच्या तक्रारी, सूचना आणि अपेक्षा थेट हायकमांडपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष यंत्रणा तयार केली जाणार आहे. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता येईल आणि कार्यकर्त्यांचा विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डिजिटल युगाशी सुसंगत राहण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांना तंत्रज्ञानाशी जोडण्यावरही भर दिला जाणार आहे. सोशल मीडिया, डेटा मॅनेजमेंट आणि संवाद प्रणाली यांचा प्रभावी वापर करून संघटन अधिक गतिमान करण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेला आमदार साजिद खान पठाण, प्रदेश सरचिटणीस दिलीप सरनाईक, संदेश सिंगलकर, जिल्हाध्यक्ष अशोक अमानकर, महानगर अध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांना अभिवादन करून करण्यात आली. या वेळी जिल्हा व महानगर काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, सेवादल तसेच विविध आघाड्यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संघटन बळकट करून आगामी निवडणुकांमध्ये काँग्रेसला नवसंजीवनी देण्याचा निर्धार यावेळी सर्वांनी व्यक्त केला.

# अखेर तो धोका टळला!

# अपघातानंतरच प्रशासनाला आली जाग

• जनमाध्यमच्या पाठपुराव्याला यश
• नागरिकांकडून आभार, पण संतापही कायम

• तेल्हारा | प्रतिनिधी •

तेल्हारा–माळेगाव बाजार रोडवरील रस्त्याच्या मधोमध अनेक दिवसांपासून पडून असलेला गौणखनिजाचा धोकादायक ढीग अखेर हटवण्यात आला असून संभाव्य मोठा अपघात टळला आहे. मात्र, ही कारवाई प्रत्यक्ष अपघात घडल्यानंतरच करण्यात आल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.


तेल्हारा–माळेगाव मार्गावर प्रशासनाचा निष्काळजीपणा
इशाऱ्यानंतरही दुर्लक्ष, गौणखनिजाच्या ढिगामुळे अपघात

तेल्हारा–माळेगाव बाजार रोडवर गौणखनिजाचा ढीग
अपघाताचा धोका वाढला, जबाबदारीवर प्रश्नचिन्ह

गेल्या अनेक दिवसांपासून रस्त्याच्या मध्यभागी हा ढीग धोकादायक स्थितीत पडून होता. याबाबत स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्या होत्या. तसेच 'दै. जनमाध्यम'नेही यावर ठळकपणे प्रकाश टाकत संभाव्य अपघाताचा इशारा दिला होता. तरीही संबंधित यंत्रणेकडून कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. अखेर भीती खरी ठरली आणि अपघात घडल्यानंतरच प्रशासनाने धावपळ सुरू केली. अपघातानंतर तातडीने यंत्रणा हलली आणि रस्त्यावरील गौणखनिज हटवण्यात आले. त्यामुळे पुढील धोका टळला असला, तरी "अपघात झाल्यावरच प्रशासन का जागं होतं?" असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दररोज या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांनी प्रतिक्रिया देताना स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त केली. "आम्ही आधीपासूनच इशारा देत होतो.

'जनमाध्यम'नेही यावर आवाज उठवला होता. त्यांनी व्यक्त केलेली भीती खरी ठरली. अपघात झाल्यावर लगेच काम झाले, मग आधी का नाही? नागरिकांच्या जीवाची किंमत नाही का?" असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

या प्रकारामुळे प्रशासनाच्या निष्क्रियतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांच्या सुरक्षेबाबत अधिक संवेदनशीलता दाखवण्याची गरज अधोरेखित झाली असून, भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी जबाबदारी निश्चित करण्याची मागणी जोर धरत आहे.

# सहाशे विद्यार्थ्यांनी दिली 'नीट' परीक्षेची मॉक टेस्ट

## • आ. साजिद खान पठाण यांचा उपक्रम • माजी मंत्री नितीन राऊत यांची भेट





• अकोला | प्रतिनिधी •

वैद्यकीय प्रवेशासाठी होणाऱ्या 'नीट' परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षेचा अनुभव देण्यासाठी आयोजित करण्यात आलेली मॉक टेस्ट रविवारी (१२ एप्रिल) शहरातील माउंट कार्मेल स्कूल येथे यशस्वीरीत्या पार पडली. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला असून तब्बल ६०० विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला.

पश्चिम अकोला मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांच्या पुढाकारातून ही मॉक टेस्ट आयोजित करण्यात आली होती. परीक्षेपूर्वी पत्रकार परिषदेत त्यांनी या उपक्रमामागील उद्देश स्पष्ट करताना सांगितले होते की, स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी केवळ अभ्यास नव्हे, तर परीक्षेच्या स्वरूपाची सवय आणि वेळेचे व्यवस्थापनही अत्यंत महत्त्वाचे असते. त्याच धर्तीवर 'नीट' परीक्षेसारखे वातावरण निर्माण करून विद्यार्थ्यांना सरावाची संधी देण्यात आली.


मॉक टेस्टदरम्यान प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, वेळेची मर्यादा आणि परीक्षा पद्धती या सर्व बाबी 'नीट'च्या धर्तीवर ठेवण्यात आल्या होत्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या तयारीचे वास्तव मूल्यमापन करता आले. कोणत्या विषयात अधिक मेहनत घेण्याची गरज आहे, याची स्पष्ट जाणीव या परीक्षेमुळे झाल्याचे अनेक विद्यार्थ्यांनी सांगितले. या उपक्रमासाठी स्थानिक पोलिस प्रशासन तसेच माउंट कार्मेल शाळा व्यवस्थापनाचे, एनएसयूआय पदाधिकारी, शिक्षक वर्ग आणि साजिद खान मित्र मंडळाचे मोलाचे सहकार्य लाभले. आयोजक आ. पठाण यांनी या सहकार्याबद्दल सर्वांचे विशेष आभार मानले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना आगामी 'नीट' परीक्षेसाठी शुभेच्छा देत अशाच शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन पुढेही करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, या मॉक टेस्टला काँग्रेसचे माजी मंत्री तथा आमदार नितीन राऊत यांनीही भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी सातत्य, आत्मविश्वास आणि योग्य मार्गदर्शनाची गरज अधोरेखित केली. शैक्षणिक तज्ज्ञांच्या मते, अशा सराव परीक्षांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, प्रश्न सोडवण्याची गती आणि अचूकता सुधारते, तसेच परीक्षेतील तणाव कमी करण्यास मदत होते. त्यामुळे अंतिम परीक्षेपूर्वीची ही मॉक टेस्ट विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरल्याचे चित्र दिसून आले.

# चान्नीतील महावितरणचा बेजबाबदारपणा उघड!

• लोंबकळता विद्युत तार वाहनावर कोसळला
• कर्मचाऱ्याकडून पैशासाठी दमदाटी करीत ५०० रुपयांची वसुली केल्याचा आरोप






• खेट्री | प्रतिनिधी •

पातूर तालुक्यातील सस्ती वीज उपकेंद्र अंतर्गत चान्नी पोलीस स्टेशनसमोर महावितरणचा गंभीर बेजबाबदारपणा उघड झाला आहे. रस्त्याच्या मध्यभागी धोकादायक अवस्थेत लोंबकळत असलेला विद्युत तार थेट एका चालत्या वाहनावर कोसळल्याची धक्कादायक घटना शनिवार, ११ एप्रिल रोजी दुपारी घडली. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली असली तरी या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

घटनास्थळ चान्नी पोलीस स्टेशनसमोरील मुख्य मार्ग असून, येथे दररोज एसटी बससह शेकडो वाहनांची वर्दळ असते. अशा गजबजलेल्या मार्गावर विद्युत तार इतक्या धोकादायक स्थितीत लोंबकळत राहणे हे महावितरणच्या निष्काळजी कारभाराचे जिवंत उदाहरण असल्याची टीका ग्रामस्थांकडून होत आहे. दरम्यान, संबंधित वाहनाला तार लागून तो तुटल्याचे कारण पुढे करत महावितरण विभागातील एका कर्मचाऱ्याने वाहनचालकाला पोलीस ठाण्यात वाहन जमा करण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याचवेळी तब्बल १२०० रुपयांची मागणी करण्यात आली. अखेर तडजोडीअंती संबंधित कर्मचाऱ्याने एका खाजगी व्यक्तीच्या फोनपेवर ५०० रुपये स्वीकारल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे महावितरणच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नियमाप्रमाणे, जर वाहनामुळे विद्युत ताराचे नुकसान झाले असेल, तर महावितरण अधिनियमानुसार अधिकृत कारवाई करून नुकसानभरपाई वसूल करण्याची स्पष्ट तरतूद आहे. मात्र, कायदेशीर प्रक्रिया धाब्यावर बसवून थेट खाजगी पातळीवर पैसे उकळण्याचा प्रकार हा भ्रष्टाचाराचा उघड नमुना असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या घटनेमुळे "जनतेच्या जीवाशी खेळ आणि वरून खाजगी वसुली" असा दुहेरी अन्याय होत असल्याची संतप्त प्रतिक्रिया परिसरातून उमटत आहे. संबंधित कर्मचाऱ्यावर तात्काळ निलंबनासह कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

### व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल!

चान्नी पोलीस स्टेशनसमोरील या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये संबंधित विद्युत तार जमिनीपासून पुरेशा उंचीवर नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. वाहन जात असताना तार खाली असल्यामुळेच तो वाहनावर कोसळल्याचे दृश्य समोर आले आहे. तरीही महावितरण कर्मचाऱ्यांनी उलट वाहनचालकावर दबाव टाकत पैसे उकळल्याचा आरोप अधिकच गंभीर ठरत आहे.

एकीकडे महावितरणचा निष्काळजीपणा नागरिकांच्या जीवावर बेततो, तर दुसरीकडे त्याच घटनेतून खाजगी वसुलीचा आरोप समोर येतो—ही बाब अत्यंत गंभीर आहे. आता प्रशासन या प्रकरणात ठोस कारवाई करते का, की पुन्हा एकदा 'सर्व काही सुरळीत' म्हणून प्रकरण दडपले जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> "वाहन चालकाकडून अशाप्रकारे पैसे घेणे चुकीचे आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल. दोषी आढळणाऱ्या कर्मचाऱ्यावर नियमानुसार कारवाई केली जाईल."
>
> — **गौरव निकुंबे**, कनिष्ठ अभियंता, वीज उपकेंद्र सस्ती

# शिरला ग्रामपंचायत घोटाळा

## सचिव निलंबित ; पण 'मोठे मासे' अजूनही बाहेरच?

• पातूर | प्रतिनिधी •

शिरला ग्रामपंचायतीतील आशा स्वयंसेविका व ग्रामरोजगार सेवक भरती प्रक्रियेत उघडकीस आलेल्या गंभीर अनियमिततेमुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. ग्रामपंचायत सचिव दिलीप वाहोकार यांच्या निलंबनानंतर प्रशासनाने कारवाईची गाडी पुढे नेल्याचे भासवले असले, तरी या प्रकरणातील 'मोठे मासे' अद्यापही हाताबाहेर असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

माहितीनुसार, ग्रामपंचायतीमध्ये आधीच तीन ग्रामरोजगार सेवक कार्यरत असताना नियमांना हरताळ फासून आणखी सात जणांची भरती करण्यात आली. याशिवाय आशा स्वयंसेविका निवड प्रक्रियेतही शासकीय निकषांना डावलून मनमानी पद्धतीने नियुक्त्या केल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे ही भरती प्रक्रिया केवळ कागदोपत्री न राहता 'ठरवून केलेला खेळ' असल्याचा आरोप होत आहे.

महत्त्वाचे म्हणजे, ग्रामपंचायतीतील कोणताही ठराव हा केवळ सचिवाच्या अखत्यारित येत नाही. सरपंच आणि सदस्यांच्या मंजुरीशिवाय कोणताही निर्णय शक्य नसतो. त्यामुळे या सर्व नियुक्त्यांना कोणाचा 'राजकीय आशीर्वाद' होता, हा प्रश्न आता केंद्रस्थानी आला आहे. सचिवावर कारवाई करून प्रकरणाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न तर होत नाही ना, असा संशय ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. या संपूर्ण प्रकरणात स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रभावशाली नेत्यांचा दबाव असल्याची कुजबूजही सुरू आहे. "प्रशासनाने फक्त सचिवावर कारवाई करून इतरांना पाठीशी घातले आहे," असा थेट आरोप गावकऱ्यांकडून होत आहे. या प्रकरणावर सामाजिक कार्यकर्ते प्रवीण इंगळे यांनीही जोरदार टीका करत गंभीर प्रश्न उपस्थित केले. "कारवाईचा बडगा केवळ एका विशिष्ट समाजातील अधिकारी-कर्मचाऱ्यांवरच का? ही कारवाई सूडबुद्धीने केली जात असल्याचे दिसते," असा आरोप त्यांनी केला. ग्रामस्थांच्या मते, ही कारवाई केवळ 'बळीचा बकरा' शोधण्यापुरती मर्यादित राहू नये. संपूर्ण प्रकरणाची सखोल, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी होऊन खऱ्या सूत्रधारांवर कारवाई झाली, तरच न्याय मिळाल्याची भावना निर्माण होईल.

• भरतीतील अनियमिततेवरून राजकीय हस्तक्षेपाचा संशय

### मोठे मासे कधी जाळ्यात?

शिरला ग्रामपंचायत घोटाळ्यातील कारवाई सध्या 'लहान माशां'पुरतीच मर्यादित राहिल्याची भावना आहे. जोपर्यंत निर्णय प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्व स्तरांवरील जबाबदारांवर कारवाई होत नाही, तोपर्यंत ही कारवाई केवळ दिखाऊ ठरणार, अशी तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे.


## जाहिर नोटीस

प्रोसेस नं: १३८४/२०२६ तारीख: ०६/०४/२०२६

**विद्यमान जिल्हा न्यायाधीश- २ तथा अति सत्र न्यायाधीश, अकोला यांचे न्यायालय**

गैरअर्जदार/गैरअपिलार्थी यांनी अपीलमध्ये चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठीची जाहीर नोटीस

**Guardian Ward No. 193/2026** **Fix for: 07/05/2026**

1) प्रसाद अशोकराव बोळे, 2) अशोकराव महादेवराव बोळे,
रा. रिधोरा, ता. बाळापुर, जि. अकोला

-- Vrs --

निल

ज्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी **"जिल्हा न्यायाधीश - २ तथा अति. सत्र न्यायाधीश, अकोला"** या न्यायालयामध्ये "प्रसाद अशोकराव मोळे यांचे नावाने मौजे रिधोरा, ता. बाळापुर, जि. अकोला येथील प्लॉट क्र. १६-अ हा विकण्याची परवानगी मिळणेबाबत अर्ज." दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी **तारीख ०७/०५/२०२६** ठेवलेली आहे.

त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वतः किंवा आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजु मांडणारा व्यक्ती **चौकशी तारखेला ०७/०५/२०२६** जिल्हा न्यायालयात सकाळी **११:०० वाजता** हजर व्हावे, जर आपणापैकी कोणीही हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येईल. आज दिनांक **०६ माहे एप्रिल सन २०२६ रोजी** माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**अधिक्षक**
**न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला**


# पद्मतीर्थ मोक्षधामच्या विकासासाठी निधी मंजूर करण्याची मागणी



• वाशिम | प्रतिनिधी •

शहरातील पद्मतीर्थ मोक्षधाम येथे अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. मात्र, या ठिकाणी पुरेशा सुविधा नसल्याने जनतेला अनेक गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या विषयावर समितीच्या सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. सभेत ठरल्या नुसार 'पद्मतीर्थ मोक्षधाम विकास समिती'ने स्थानिक नगर परिषदेचे अध्यक्ष श्री अनिल केंदळे, मुख्याधिकारी श्री नीलेश गायकवाड आणि नगरसेवक नूर भाई यांना विविध विकासकामांसाठी निधी मंजूर करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. निवेदनात नमूद केल्यानुसार, मोक्षधामाकडे जाणारा रस्ता आणि पूल अत्यंत अरुंद व नादुरुस्त आहे. तसेच रात्रीच्या वेळी पुरेशी प्रकाश व्यवस्था नसल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी नगर पालिकेने प्रशासकीय मंजुरी मिळवून कामे त्वरित मार्गी लावण्याची विनंती केली आहे.

# नालंदा नगर येथे क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले जयंती उत्साहात



• वाशीम | प्रतिनिधी •

नालंदा नगर येथील त्रिरत्न बुद्ध विहार येथे क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांची जयंती अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. म. जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास नालंदा नगरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी 9 वाजता पंचशील ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर भंते प्रज्ञापाल जी महाथेरो यांच्या हस्ते त्रिशरण व पंचशील ग्रहण करण्यात आले. या प्रसंगी उपस्थितांना बौद्ध धम्माचे मूल्य व आचरण याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रसंगी समितीचे अध्यक्ष सहदेव चंद्रशेखर, उपाध्यक्ष सिद्धार्थ गायकवाड यांच्यासह रमेश गवई, गजानन आठवले, सुनीता कांबळे, ॲड. नारायण पडघान आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यानंतर राम श्रृंगारे व अनिल इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले यांच्या 'अखंडा'चे सामूहिक वाचन करण्यात आले. उपस्थितांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत महात्मा फुले यांच्या विचारांना अभिवादन केले.

कार्यक्रमात सोनगव्हाण येथील ज्येष्ठ कलावंत ज्ञानबा श्रावण जाधव यांनी महात्मा फुले यांच्या कार्यावर आधारित गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर अभ्यासपूर्ण व प्रभावी भाष्य केले. यानंतर आरतीताई ठोके यांच्या नेतृत्वात "सोहळा भीम कन्येचा- उत्सव नालंदा नगराचा" हा महिलाचा 'संगीत नृत्य' हा कार्यक्रम संपन्न झाला. त्यामध्ये नालंदा नगरातील महिलांनी सहभाग घेऊन महापुरुषांच्या गीतांवर तसेच लेझीम पथकाच्या माध्यमातून नृत्य सादर केले. या कार्यक्रमाला उत्सव समितीचे सचिव तथा नगरसेवक अनिल ताजने, नागसेनपट्टेबहादूर, ॲड. पि. पि. अंभोरे, एकनाथ धवसे, भिमराव सावळे, डॉ. संजय पडघान, प्रकाश हिवराळे, गणेश हनुमंते, प्रमोद खिल्लारे, राज बलखंडे, मेजर प्रल्हाद सरकटे, गजानन आठवले, लोककवी विलास भालेराव, शाहीर देविदास तायडे, प्रदीप वाकोडे, भगवान ठोके, मधुकर खरात, संजय वानखडे, दिगंबर गुडदे, मेजर काशिनाथ भिसे, अमन अवचार, विशाल नितनवरे, राजू भुसारी, डॉ. मुरलीधर ताजने, काशिनाथ अंभोरे, मेजर वैद्य, भारत पडघान, गुणवंत मुळे, बाळाजी ढोले, धम्मानंद भगत, दौलत कांबळे, भारत खडसे, दत्ता भगत, प्रफुल्ल खिल्लारे, सौरभ गायकवाड, गजानन गवई, बंडू टापरे, प्रदीप चतुर, नायकर खोडके, राजकुमार वाघमारे, बाळू कांबळे, गणेश शेलार, संगीताताई आठवले, आशाताई गायकवाड, उज्वलाताई ढोले, संगीताताई गायकवाड, मंदाताई हनुमंते, इरावतीताई अंभोरे, अनिताताई चंद्रशेखर, सुवर्णाताई राऊत, आम्रपालीताई ताजने आदींची उपस्थिती लाभली.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १३६ ■ सोमवार, १३ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## आदिवासी विकास विभागाच्या योजना जनसामान्यांपर्यंत पोहचवा- पालकमंत्री डॉ.भोयर

### योजनांचा लाभ देण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित करा

#### आदिवासी विकास विभागाची कार्यशाळा

वर्धा जनमाध्यम : शासकीय कार्यालयाच्या इमारतीतून जनसामान्यांची कामे झाली पाहिजेत. विशेषतः आदिवासी बांधवांसाठी असलेल्या योजनांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यात प्रशासनाने कसूर करू नये. आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तरुण पिढीनेही आता चिकित्सक बनून शासन निर्णयांचा अभ्यास करावा आणि शासनाच्या योजना जनसामान्यांपर्यंत पोहचवाव्यात, असे आवाहन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आदिवासी समाजातील नागरिकांना योजनांची माहिती व लाभ मिळवून देण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकारी वान्मथी सी, प्रकल्प अधिकारी गितांजली निकम, नगरसेवक विजय उईके, मोहिनी आडे, सालोडचे सरपंच अमोल कन्नाके आदी उपस्थित होते.



शासन आदिवासी समाजासाठी शेकडो योजना राबविते. आदिवासी विकास विभागाच्या सर्व योजनांची सुटसुटीत माहिती देणारी पुस्तिका तयार करून ती दुर्गम भागात वाटा. केवळ ऑनलाइन अर्जाची वाट न पाहता, तालुका निहाय कॅम्प लावून लोकांकडून अर्ज भरून घेण्याची व्यवस्था करा. जिल्ह्याला मिळालेले उद्दिष्ट केवळ अर्जाअभावी परत जाणे हे चुकीचे आहे. जास्तीत जास्त अर्ज भरून घेण्यासाठी सामाजिक संस्थांची मदत घ्या आणि वर्कशॉप आयोजित करा, अशा सूचना पालकमंत्री डॉ. भोयर यांनी आदिवासी विकास विभागाला दिल्या.

जुनी पिढी कष्टात गेली, मात्र आताची नवीन पिढी सुशिक्षित आहे. शासनाच्या अनेक योजना ऑनलाइन आहेत. ग्रामीण भागातील आदिवासी बांधवांना तंत्रज्ञानाची अडचण येऊ शकते, पण अशा वेळी सुशिक्षित तरुणांनी पुढाकार घेऊन त्यांना अर्ज करण्यास मदत केली पाहिजे. योजनांचे स्वरूप, अर्जाची पद्धत आणि लाभ यावर तरुणांनी बारीक लक्ष ठेवणे गरजेचे आहे, असे पालकमंत्र्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी वान्मथी सी म्हणाल्या, आदिवासी समाजात शिक्षण व शिष्यवृत्ती याबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. उत्पन्न वाढीसाठी गाव व तालुकानिहाय योजनांची शिबिरे आयोजित करा. योजनांचे अर्ज ग्रामपंचायतस्तरावर भरुन घेतले पाहिजे, असे त्या म्हणाल्या. सुरूवातीला प्रकल्प अधिकारी गितांजली निकम यांनी आदिवासी विभागाच्या योजनांचे सादरीकरण केले.

#### शुभमच्या जिद्दीचे पालकमंत्र्यांकडून कौतुक

कार्यक्रमाच्या शेवटी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आकोली येथील एका शेतकऱ्याचा मुलगा शुभम मुरले याचा सत्कार केला. शुभमच्या जिद्दीचे कौतुक केले. शुभमने स्वतः 'ड्रोन' तयार केले असून, त्याच्या या प्रयोगाबद्दलची माहिती उपस्थित सर्वांनी घ्यावी आणि अशा नाविन्यपूर्ण गोष्टींना पाठबळ द्यावे, असे आवाहनही पालकमंत्र्यांनी केले. यावेळी पालकमंत्र्यांनी उपस्थित विद्यार्थी व नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. विद्यार्थ्यांनी अभ्यासिका, होस्टलबाबत केलेल्या मागण्या पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या.

## वर्ध्यात आंबेडकर जयंतीनिमित्त वाहतूक नियोजन; प्रमुख मार्गांवर बंदी

**वर्धा जनमाध्यम :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरात मोठ्या उत्साहात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विविध ठिकाणी मिरवणुका, रॅली व सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी अपेक्षित असल्याने वाहतूक पोलिसांनी विशेष नियोजन केले आहे.



पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील प्रमुख चौकांवर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. जुनापाणी चौक, धुनिवाले मठ, उड्डाणपूल व आरती चौक येथे सायंकाळी ४ ते रात्री १२ वाजेपर्यंत अवजड वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. १४ एप्रिल रोजी सकाळी ५ ते रात्री १२ वाजेपर्यंत शहरात अवजड वाहतुकीवर पूर्ण बंदी राहणार आहे.

मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर बजाज चौक ते पोस्ट ऑफिस चौक, गांधी पुतळा चौक ते आंबेडकर चौक, बापूराव देशमुख पुतळा ते आंबेडकर चौक तसेच आदित्य मेडिकल चौक ते पोस्ट ऑफिस चौक हे मार्ग वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहेत. पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गर्दीच्या पार्श्वभूमीवर चौकाचौकात बॅरिकेड्स उभारून वाहतूक नियंत्रण केले जात असून, नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे, मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी तसेच आपत्कालीन परिस्थितीत 'डायल ११२' वर संपर्क साधावा, असे आवाहन वाहतूक विभागाने केले आहे.

## सिंदी (रेल्वे) येथे मारहाणीची घटना; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम** - येथील हनुमान मंदिराजवळ असलेल्या पंक्चर दुरुस्तीच्या दुकानात किरकोळ वादातून मारहाणीची गंभीर घटना घडली आहे. या प्रकरणी सिंदी (रेल्वे) पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मोहम्मद सहजाद अन्सारी (वय २३) हे पंक्चर दुरुस्तीचे काम करतात. दिनांक ११ एप्रिल रोजी दुपारी सुमारास आरोपी अमोल बंजारी, प्रफुल्ल धोबे व मोसीम पठाण हे दुकानात आले. जुन्या वादाच्या कारणावरून त्यांनी फिर्यादीशी वाद घालून त्याला मारहाण केली.

यावेळी फिर्यादीच्या डोक्यावर व हातावर मारहाण करण्यात आली. तसेच फिर्यादीला वाचवण्यासाठी आलेल्या अजहर अशफाक अली सय्यद यांच्यावरही हल्ला करण्यात आला. त्यांना गंभीर दुखापत झाल्याने सेवाग्राम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

या घटनेनंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (ँ=ए) कलम १०९(१), ११५(२), ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

## हिंदी विश्वविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या तयारीला वेग

### १४ एप्रिलला डॉ.जाधव यांच्या व्याख्यानाचे आयोजन

**वर्धा जनमाध्यम :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रमाच्या तयारीने अंतिम टप्पा गाठला आहे. या गौरवशाली प्रसंगी देशातील प्रख्यात अर्थतज्ज्ञ, लेखक आणि राज्यसभेचे माजी खासदार डॉ. नरेंद्र जाधव यांच्या आगमनाबद्दल विद्यापीठ परिसरात तसेच शैक्षणिक क्षेत्रात मोठा उत्साह दिसून येत आहे.



मंगळवार, १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता गालिब समाभृहात त्यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असून ते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा राहतील.

डॉ. नरेंद्र जाधव हे केवळ अर्थतज्ज्ञ नसून, डॉ. आंबेडकर यांच्या जीवनप्रवासाला आणि त्यांच्या संघर्षाला जागतिक पातळीवर पोहोचवणारे एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व आहेत.

## पालकमंत्र्यांनी जाणून घेतल्या सावंगी ग्रामपंचायत परिसरातील नागरिकांच्या समस्या

### -समस्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या सूचना

**वर्धा जनमाध्यम :** पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आज सावंगी मेघे ग्रामपंचायत परिसराला भेट देऊन नागरिकांच्या विविध समस्या व अडचणी जाणून घेतल्या. समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी उपविभागीय अधिकारी दिपक कारंडे, तहसीलदार संदीप पुंडेकर, गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे, माजी सरपंच विलास दोड, माजी उपसरपंच सविता दोड आदी उपस्थित होते.



मुलांना खेळण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी सावंगी मेघे येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानाची पाहणी करून आवश्यक सोयी-सुविधा निर्माण करण्याबाबत गटविकास अधिकारी व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण अधिकाऱ्यांनी संयुक्त नियोजन करावे, अशा सूचना डॉ. भोयर यांनी दिल्या. तसेच गावातील अतिक्रमित जागांबाबत पात्र नागरिकांना पट्टे देण्यासाठी तहसीलदारांनी कार्यवाही करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सावंगी ग्रामपंचायत इमारतीच्या नूतनीकरणासाठी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून सुरू असलेल्या कामांची त्यांनी पाहणी केली. उर्वरित कामे तात्काळ पूर्ण करून १ मे रोजी ग्रामपंचायत इमारतीचे लोकार्पण करावे, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच उपआरोग्य केंद्र अत्याधुनिक करण्याच्या सूचनाही पालकमंत्री डॉ. भोयर यांनी यावेळी केल्या.

माजी खासदार स्व. दत्ता मेघे यांच्या समाजकार्याच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाने गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) निधीतून भव्य स्मारक उभारण्यात येणार असल्याची माहिती डॉ. भोयर यांनी दिली. स्मारकासाठी जागेची पाहणी सुरू असून जागा उपलब्ध झाल्यानंतर त्या परिसरात ज्येष्ठ नागरिकांसाठी सुविधा, अभ्यासिका, मुलांसाठी खेळाच्या सोयी व उद्यान विकसित करण्यात येणार असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.

## बुधवारी ना. पंकजा मुंडे वर्ध्यात भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन

**वर्धा जनमाध्यम:** राज्याच्या पर्यावरण, वातावरण बदल व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे बुधवार दिनांक १५ एप्रिल रोजी वर्धा जिल्ह्याच्या दौ-यावर येत आहे. त्यांच्या दौरानिमित्त भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



पंकजा मुंडे बुधवारी सकाळी ८,३० वाजता मुंबई येथून प्रयाण करतील. सकाळी ११,४० वाजता नागपूर विनातळ येथे आगमन. दुपारी १२ वाजता केळझर येथील सिद्धीविनायक गणपती मंदिर महाआरती ला उपस्थित राहतील. यानंतर सेलू तालुक्याच्या महाराजस्व अभियानाचे उद्घाटन करतील. तसेच सेलडोह येथील पशुसंवर्धन दवाखाना चे उद्घाटन करतील. तसेच सेलू येथील पशुसंवर्धन चिकित्सालय इमारतीचे भूमीपूजन करतील. दुपारी १,१५ वाजता वर्धा येथील हरिराम टॉवर येथे भाजपा युवा मोर्चाच्या संपर्क अभियानाचे उद्घाटन करतील. दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे विविध विभागांचा आढावा घेतील. सायंकाळी ५ वाजता आमदार दत्तक ग्राम सालोड हिरापूर येथील विविध विकास कामांचे भूमीपूजन व महिला शेतकरी वर्षानिमित्त महिला शेतकरी सन्मान सोहळयास उपस्थित राहतील.यावेळी जिल्हयाचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर देखील उपस्थित राहणार आहे.

## वर्धेत डॉ.प्रवीण तोगडिया यांचा भव्य नागरी सत्कार उद्या; दोन दिवसीय दौऱ्याची रंगत

**वर्धा जनमाध्यम :** आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद व राष्ट्रीय बजरंग दलाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रवीण तोगडिया यांचा वर्धा जिल्ह्यातील दोन दिवसीय दौरा उद्यापासून (दि. १३ एप्रिल) सुरू होत असून, मंगळवारी (दि. १४ एप्रिल) सायंकाळी त्यांचा भव्य नागरी सत्कार आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने वर्धा शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

देशभर हिंदू राष्ट्राची मागणी, गोहत्या बंदी कायदा, समान नागरी संहिता लागू करणे, तसेच बांगलादेशी घुसखोरांविरोधात कारवाई यांसारख्या मुद्द्यांवर ठाम भूमिका मांडत डॉ. प्रवीण तोगडिया सध्या देशव्यापी दौऱ्यावर आहेत. त्याच पार्श्वभूमीवर त्यांचा वर्धा दौरा महत्त्वाचा मानला जात आहे.



प्रयागराज येथे झालेल्या कुंभमेळा दरम्यान त्यांनी केलेल्या सेवाकार्याची दखल घेत, वर्धेकरांच्या वतीने हा नागरी सत्कार आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम मंगळवारी सायंकाळी ४ ते ७ या वेळेत अनेकान्त स्वाध्याय मंदिर येथे पार पडणार आहे.

यावेळी डॉ. प्रवीण तोगडिया वर्धा शहरातील नागरिकांशी विविध सामाजिक, धार्मिक व राष्ट्रीय विषयांवर मुक्त संवाद साधणार असून, त्यांच्या विचारांचे प्रत्यक्ष श्रवण करण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे.

या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रीय बजरंग दलाचे विदर्भ प्रांत अध्यक्ष अनूप जैस्वाल यांच्यासह राजेश सराफ, मिलन गांधी, शार्दुल वंदळे, तरुण शर्मा, शालिग्राम टिबडीवाल, गिरीश उपाध्याय, ब्रजकिशोर पंड्या, कमल कुलधरिया, मुरली केला, आशिष तिवारी, कन्हैया मुरली, प्रमोद चैनानी, विनय जयस्वाल आदींनी केले आहे.

## टीमवर्कच्या बळावर समाजकार्यास नवी दिशा : भूतडा

**वर्धा जनमाध्यम :** सामाजिक संस्था या केवळ कार्यक्रमांचे आयोजन करणाऱ्या नसून समाजाला एकत्र आणून त्याच्या समस्या समजून घेणे आणि त्यावर ठोस उपाययोजना करणे हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट असते, असे प्रतिपादन नंदकिशोर भूतडा यांनी केले. माहेश्वरी मंडळ वर्धा यांच्या नव्या कार्यकारिणीच्या पदग्रहण सोहळ्यात ते बोलत होते.



भूतडा यांनी सांगितले की, आजच्या काळात समाजात निस्वार्थीपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची गरज अधिक आहे. केवळ स्वतःच्या नावासाठी नव्हे, तर समाजहितासाठी पुढे येणाऱ्या कार्यकर्त्यांमुळेच संघटना अधिक मजबूत होते. टीमवर्कच्या माध्यमातूनच मोठी उद्दिष्टे साध्य होऊ शकतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी माजी अध्यक्ष विजय राठी यांनी गतवर्षातील उपक्रमांचा आढावा घेतला. संघभावना आणि परस्पर सहकार्यामुळे प्रत्येक कार्यक्रम यशस्वी झाला, असे ते म्हणाले. माजी सचिव डॉ. धर्मेंद्र मूंदडा यांनी वार्षिक अहवाल सादर करत विविध प्रकल्पांमध्ये कार्यकर्त्यांनी दिलेल्या योगदानाचे कौतुक केले.

प्रा. डॉ. ललित राठी यांनी नवीन उपक्रमांची रूपरेषा मांडली. समन्वयक राजकुमार जाजू यांनी टीमवर्कचे महत्त्व अधोरेखित करत, संवाद, विश्वास आणि जबाबदारी या गुणांमुळे संघटनात्मक कार्य अधिक प्रभावी बनते, असे नमूद केले. नवीन कार्यकारिणीत अध्यक्षपदी नंदकिशोर भूतडा, उपाध्यक्ष श्याम राठी, सचिव हरीश गांधी, सहसचिव पंकज सोमानी, कोषाध्यक्ष सुशील भूतडा, समन्वयक राजकुमार जाजू यांची निवड करण्यात आली.

याशिवाय महिला मंडळाच्या अध्यक्षपदी सुनिता विजय राठी तर सचिव पदी सौ छाया गणेश पसारी, नवयुवक क्लबच्या अध्यक्षपदी ऋषभ चंद्रप्रकाश जाजू तर सचिवपदी अमित लध्दड, तसेच नव युवती क्लबच्या अध्यक्षपदी कुमारी साक्षी चितलांगे व सचिवपदी सौ. विशाखा कुंदन टावरी यांच्या पदाधिकाऱ्यांचीही निवड जाहीर करण्यात आली. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून, समाजकार्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## नियोजित वेळेत गुणवत्तापूर्ण कामे करण्याची दक्षता घ्या- मुख्यमंत्री

### -मुख्यमंत्र्यांनी घेतला नागपूर शहरातील विविध विकास प्रकल्पांचा आढावा

#### -केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती

नागपूर जनमाध्यम : शहरातील विविध विकास प्रकल्प नियोजित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. नागपूरमधील मुख्यमंत्री सचिवालयात (हैदराबाद हाऊस) झालेल्या बैठकीत त्यांनी शहरातील प्रलंबित व सुरू असलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेतला.

या बैठकीला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महानगरपालिका, एमएसआयडीसी, मिहान, म्हाडा तसेच क्रीडा व वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती यावेळी सादर करण्यात आली.



शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर झोननिहाय भाजी बाजार, मटन-मच्छी मार्केट, फूड मॉल आणि हॉकर झोन उभारण्यावर बैठकीत चर्चा झाली. या सुविधा विकसित करताना पार्किंगची योग्य व्यवस्था करण्यावर भर देत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा सल्ला नितीन गडकरी यांनी दिला.

शहरातील शाळा-महाविद्यालय परिसरातील अवैध टपऱ्या, पानमसाला विक्री केंद्रे आणि मुख्य रस्त्यालगतची अतिक्रमणे तातडीने हटविण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. महामार्गालगत सुरू असलेले बेकायदेशीर व्यवसाय बंद करण्याचेही निर्देश देण्यात आले.

सिमेंट रस्त्यांच्या पाचव्या टप्प्यात ९ झोनमध्ये ८९ किमी लांबीचे १३५ रस्ते प्रस्तावित असून, कामे पूर्ण करताना समस्या आधी ओळखून त्यावर उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला. पाणी गळती रोखण्यासाठी कठोर पावले उचलण्याबरोबरच कचरा व्यवस्थापनासाठी इतर शहरांच्या आदर्श पद्धतींचा अभ्यास करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

संत्रा मार्केट, कॉटन मार्केट, नेताजी मार्केट यांच्या पुनर्विकासासोबत दाभा येथील इंटरनॅशनल कन्वेंशन सेंटर, क्रीडा संकुलातील सौर ऊर्जा वापर, सीसीटीव्ही बसविणे याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. वैद्यकीय महाविद्यालयांतील वसतिगृह, प्रशासकीय इमारती व क्रीडांगण उभारणीसंदर्भातही चर्चा झाली.

याशिवाय यशवंत स्टेडियम पुनर्विकास, नाग व पोहरा नदी प्रकल्प, भुयारी गटार योजना, सांडपाणी व्यवस्थापन आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांवरही सविस्तर चर्चा करत निधी उपलब्धतेबाबत उपाययोजना सुचविण्यात आल्या. नागपूर शहराचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्यासाठी समन्वयातून काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## २००२ च्या मतदार यादीशी मॅपिंग सक्तीचे; नागरिकांना प्रशासनाचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा विधानसभा मतदारसंघातील मतदारांसाठी प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय जाहीर केला असून एँ- २०२६ मोहिमेअंतर्गत मतदार नोंदी अद्ययावत करण्यासाठी २००२ च्या मतदार यादीशी मॅपिंग करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या निर्णयामुळे मतदार यादीतील अचूकता आणि पारदर्शकता वाढविण्याचा उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

सध्या २०२४-२५ च्या मतदार यादीत नाव असलेल्या मात्र २००२ च्या यादीत नोंद नसलेल्या मतदारांसाठी विशेष मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. अशा मतदारांनी आपल्या कुटुंबातील वडील, आई, आजी किंवा आजोबा यांपैकी कोणाचेही नाव २००२ च्या मतदार यादीत असल्यास त्याची माहिती सादर करणे बंधनकारक राहणार आहे.



यासाठी संबंधित मतदारांनी त्या व्यक्तीचे नाव, मतदाराशी असलेले नाते, त्या वेळचा विधानसभा क्रमांक व नाव, मतदार यादीचा भाग क्रमांक, अनुक्रमांक आणि स्वतःचा मोबाईल क्रमांक अशी सविस्तर माहिती तयार ठेवावी लागणार आहे. ही माहिती संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (ँ६), पर्यवेक्षक किंवा स्थानिक नगरसेवक यांच्याकडे लवकरात लवकर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, ही प्रक्रिया वेळेत पूर्ण न केल्यास पुढील टप्प्यांत अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे नागरिकांनी या मोहिमेला सहकार्य करत आपली माहिती तातडीने अद्ययावत करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## ‘आशा’ मावळली

आपल्या हटके स्टाईलने गाणे म्हणणाऱ्या आणि प्रेक्षकांच्या हृदयावर आजही राज्य करणाऱ्या गायिका म्हणजे आशा भोसले. मात्र हाच आवाज आज काळाच्या पडद्याआड गेला आहे. मुंबईतल्या ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांचे निधन झाले. वयाच्या दहाव्या वर्षापासून गाणे म्हणण्यास सुरुवात केलेल्या आशाताईंचे आयुष्य हे संघर्षमयी आणि वादळी राहिले आहे. पण नावाप्रमाणेच त्यांनी कुठल्याही प्रसंगात आशा सोडली नाही. कुठल्याही प्रसंगात त्या डगमगून गेल्या नाहीत.गेली सात दशके आपल्या जादुई स्वरांनी चाहत्यांना मंत्रमुग्ध केले.वयाची नव्वदी ओलांडली असली तरी आशाताईंचा उत्साह आजही तरुणांना लाजवणारा होता. २०२३ मध्ये आपल्या ९० व्या वाढदिवसाला त्यांनी दुबईत तीन तासांचा लाईव्ह कॉन्सर्ट केला होता. त्या वेळी त्यांनी म्हटले होते की, ‘संगीत हाच माझा श्वास आहे. संगीतामुळेच मी कठीण प्रसंगांवर मात करू शकले.’ वयाच्या ९२ व्या वर्षीही त्यांच्यात गाण्याची, स्वर उंचावण्याची क्षमता एवढी होती की त्यांच्या आसपास कोणतीही गायिका फिरू शकत नाही. आपल्या सात दशकांच्या संगीत कारकिर्दीत त्यांना भारतरत्न सोडता सर्वच पुरस्कार मिळाले. तीन वर्षापूर्वी २४ मार्च २०२३ रोजी आशाताईंना प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने महाराष्ट्र सरकारतर्फे गौरविण्यात आले होते तेव्हा संगीत प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मुंबईतील ‘गेट वे ऑफ इंडिया’ येथे झालेल्या एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला होता.आशा भोसले यांना त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल दोन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, २००० मध्ये ‘दादासाहेब फाळके पुरस्कार’ आणि २००८ मध्ये ‘पद्मविभूषण’ देऊन सन्मानित करण्यात आले होते.आशा भोसले यांचे संगीत क्षेत्रात खूप मोठे योगदान आहे. आशा भोसले यांनी गेली सत्तर वर्ष संगीत कलेची जी सेवा केली आहे त्याचीच पोचपावती म्हणजे त्यांना मिळालेले अनेक पुरस्कार. ८ सप्टेंबर १९३३ रोजी जन्मलेल्या आशाताईंना संगीताचे बाळकडू त्यांच्या घरातच मिळाले. १९४३ साली ‘माझा बाळ’ या चित्रपटात दत्ता डावजेकर यांनी संगीतबद्ध केलेल्या चला चला नव बाळा... या गाण्याने आशाताईंनी चित्रपट गायनाला प्रारंभ केला. वयाच्या पंधराव्या वर्षीच म्हणजे १९४८ साली हंसराज बहल यांच्या ‘चुनरिया’ या चित्रपटात ‘सावन आया’ हे गाणे गाऊन त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. १९५३ साली बिमल रॉय यांनी त्यांना ‘परिणिता’ या चित्रपटातील गाणी गाण्याची संधी दिली. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५४ साली राज कपूर यांनी ‘बूट पॉलिश’ या चित्रपटात मोहम्मद रफी यांच्यासोबत ‘नन्हे मुन्ने बच्चे तेरे मुठ्ठी मे क्या है’ हे गाणे गायला दिले. १९५६ साली ‘सीआयडी’ हा चित्रपट आला या चित्रपटातील त्यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. १९५७ साली आलेल्या ‘नया दौर’ या चित्रपटातील गाणी तर खूपच लोकप्रिय झाली आणि सर्वत्र आशाताईंचे नाव झाले. आशाताई हिंदी चित्रपट सृष्टीतील आघाडीची गायिका म्हणून नावारूपास आल्या. त्या काळातील सर्वच संगीतकारांची गाणी त्यांनी गायली. मागील सत्तर वर्षात असा एकही संगीतकार नसेल ज्यांनी आशाताईंना आपल्यासाठी गाण्याची विनंती केली नसेल. १९४८ पासून सुरू झालेला आशाताईंच्या संगीत कलेचा प्रवास आज थांबला. आशा भोसले यांनी मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तामिळ, मल्याळम, इंग्रजी, रशियन अशा विविध भाषेत सोळा हजारांहून अधिक गाणी गायली आहेत. त्यांनी एक हजारांहून अधिक चित्रपटासाठी गायन केले. हिंदी चित्रपटसृष्टीतील गायनासाठी त्यांना सात वेळा फिल्मफेअर पुरस्कार तर दोनवेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. २००० साली त्यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्काराने तर २००८ साली मानाच्या पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. २०११ साली सर्वाधिक गाणी गाण्याचा विश्वविक्रम त्यांनी केला. त्यांच्या या विश्वविक्रमाची नोंद ‘गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’मध्ये घेण्यात आली. आशा भोसले यांनी सर्वप्रकारची गाणी गायली आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीवर सुरवातीच्या काळात लता मंगेशकर यांचा वरचष्मा होता. तेंव्हा दुसऱ्या गायिकांना संधी मिळणे अवघड होते हे ओळखून त्यांनी वेगळा मार्ग पत्करला. ज्या प्रकारची गाणी लता मंगेशकर गायच्या त्या प्रकारची गाणी सोडून अन्य प्रकारची गाणी त्यांनी गायला सुरुवात केली. यात पॉप तसेच पाश्चिमात्य सुरावट असलेल्या गाण्यांचा समावेश होता. त्या गाण्यांनी युवकांवर मोहिनी घातली. त्यांनी गायलेले गझल, मुजरे आणि भजनेही लोकप्रिय झाली. संगीतातला कुठलाही प्रकार त्यांनी गायचा सोडला नाही. आशा भोसले यांनी अनेक भाषेत गाणी गायली असली तरी त्यांनी मराठीत सर्वाधिक गाणी गायली आहेत ते स्वाभाविकही आहे त्यांचे बंधू हृदयनाथ मंगेशकर यांच्यासाठी त्यांनी अनेक गाणी गायली आहेत. ‘मलमली तारुण्य माझे’, ‘तरुण आहे रात्र अजूनी’, ‘मी मज हरपून बसले ग’ ही त्यांची गाणी इतकी लोकप्रिय आहेत की अजूनही ती स्मरणात आहे. आशा भोसले यांना गायनाइतकीच स्वयंपाकाची आणि नवनवीन पदार्थांची प्रचंड आवड होती. त्यांच्या या आवडीचे रूपांतर पुढे एका यशस्वी व्यवसायात झाले. त्यांनी जगभरातील विविध १० देशांमध्ये ‘आशाज’ या नावाने भारतीय खाद्यपदार्थांची रेस्टॉरंट्स सुरू केली. या रेस्टॉरंट्सच्या माध्यमातून त्यांनी भारतीय चवीला सातासमुद्रापार पोहोचवले. दुबई, लंडन आणि मँचेस्टरमध्ये त्यांचे प्रत्येकी एक रेस्टॉरंट आहे,तर बर्मिंगहॅममध्ये दोन आणि कुवैतमध्ये तब्बल पाच रेस्टॉरंट्स कार्यरत आहेत. याशिवाय दोहा, कतर, बहरीन आणि अबू धाबी यांसारख्या मध्यपूर्वेतील देशांमध्येही त्यांच्या रेस्टॉरंट्सनी खवय्यांच्या मनात स्थान मिळवले आहे.८ दशकांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी सर्वाधिक गाणी गाण्याचा विश्वविक्रम आपल्या नावे केला. खासगी आयुष्यात अनेक चढ-उतार सोसूनही त्यांनी खचून न जाता आपल्या तीन मुलांचा सांभाळ केला. संगीताचा वारसा जोपासतानाच त्यांनी खाद्य संस्कृतीच्या माध्यमातून भारतीय अस्मिता जागतिक स्तरावर तेवत ठेवली. त्यांच्या निधनाने संगीत आणि उद्योग क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.

# इराण-अमेरिका युद्धविराम आणि आपण

**चीनच्या विरुद्ध भारत सरकार कधी वाईट बोलत नसूनही मध्यस्थी साठी चीनला सुद्धा भारतापेक्षा पाकिस्तान अधिक भरवशाचा वाटला. परिणामी युद्ध विरामानंतर लगेच पाकिस्तानचा शेअर बाजार आठ टक्क्यांनी वधारला, पण भारताचा मात्र फक्त चार टक्क्यांनी! आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीत पाकिस्तान आमच्यापेक्षा वरचढ ठरला.**



अखेरीस दोन आठवड्यांसाठी का होईना, अमेरिका आणि इराण यांनी युद्धविराम घोषित केला आणि इस्लामाबाद मध्ये एकमेकांशी चर्चेची तयारी दर्शविली. त्यामुळे जगाने एक मोकळा श्वास सोडला. ट्रम्प यांनी संपूर्ण इराण एका रात्रीत बेचिराख करण्याची धमकी दिल्यानंतर सुमारे दीड कोटी इराणी नागरिकांनी त्या संभावित भयंकर हल्ल्याच्या वेळी इराणमध्ये जागोजाग मानवी साखळी करून उभे राहण्याची तयारी दर्शविली होती. हे युद्ध इस्त्राइल व अमेरिकेने विनाकारण इराणवर लादले असल्याचे सर्व जगाच्या लक्षात आले होते. दररोज होत असलेल्या भीषण हवाई हल्ल्यांमुळे होत असलेली जीवित हानी व इमारतींचा विध्वंस सोसूनही इराण नमला नाही व स्वतःच्या अटींवर त्याने युद्धविराम घडवून आणला. त्यामुळे इराण विषयी सर्वत्र सामान्य लोकांमध्ये आदराची भावना निर्माण झाली आहे.

युद्ध विराम घडवून आणण्यात पाकिस्तानने मध्यस्थी करून महत्वाची कामगिरी बजावली असल्याचे इराण व अमेरिका या दोन्ही देशातील सरकारांनी अधिकृतपणे म्हटले आहे. इतरही अनेक देशांनी पाकिस्तानचे त्यासाठी आभार मानले आहेत. परंतु पाकिस्तानचे कौतुक याबाबतीत करण्याची भारत सरकारची मात्र इच्छा दिसत नाही. पाकिस्तानचे मध्यस्थीचे प्रयत्न सुरु असताना आमचे परराष्ट्रमंत्री ‘आम्ही दलाल देश नाही’ असेही तुच्छतेने बोलले होते.

कोणतेही दोन देश एकमेकांचे कायमचे शत्रु असू शकत नाहीत. प्रत्येक देशातले सरकार अधूनमधून बदलत असते आणि नव्या सरकारने आपल्या देशाचे हित विचारात घेऊन परराष्ट्रांशी संबंध ठेवणे अपेक्षित असते. विशेषतः कोणत्याही देशातले सामान्य नागरिक हे दुसऱ्या देशातल्या सामान्य नागरिकांचे शत्रु नसतात. उदाहरणार्थ, ट्रम्प यांच्या विषयी आपल्या मनात कितीही राग असला तरी सर्वसामान्य अमेरिकन नागरिकांविषयी मात्र आपली तशी भावना नसते. अटल बिहारी वाजपेयी जेव्हा पंतप्रधान झाले तेव्हा त्यांनी सर्वप्रथम अनेक वर्षांपासून बंद असलेले भारत-पाकिस्तान क्रिकेट सामने सुरु केले.‘आधीच्या सरकारांनी एकमेकांवर बॉम्ब टाकले, पणआम्ही आता (क्रिकेटचे) चेंडू टाकू, असे त्यावेळी वाजपेयी म्हणाले. वाजपेयी हे भारतीय जनता पक्षाचे नेते होते. त्यावेळी क्रिकेटपटूंच्या सोबत अनेक भारतीय पत्रकार व क्रीडाप्रेमी नागरिक देखील मोठ्या प्रमाणात पाकिस्तानला गेले होते. त्यापैकी अनेकांनी जे अनुभव लिहिले त्यात सर्वसामान्य पाकिस्तानी नागरिकांकडून त्यांना मिळालेल्या आदरातिथ्याचे भरभरून कौतुक केले होते. वाजपेयींनी केवळ भारत-पाक सामनेच पुनर्जीवित केले नाहीत तर अमृतसर ते लाहोर बससेवा देखील सुरु केली व त्या बसच्या पहिल्या फेरीत ते स्वतः अनेक प्रतिष्ठित भारतीय नागरिकांना घेऊन लाहोरला गेले. भारत व पाकिस्तानचे संबंध स्वातंत्र्यानंतर असेच पेंडुलमसारखे हेलकावे खात आहेत.

‘धुरंधर’ या चित्रपटाची खुद्द मोदींनी भलामण केल्यामुळे भारताचे गुप्तहेर देखील पाकिस्तानात बंडखोरांना मदत करतात आणि राजवटी बदलण्याचे प्रयत्न करतात, या पाकिस्तानच्या आरोपावर एक प्रकारे शिक्कामोर्तब झाले. म्हणजे एकटा पाकिस्तानच अश्या उलाढाली करत नाही असे म्हणावे लागेल. भारत, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ व भूतान या दक्षिण आशियातील शेजारी देशांनी एकत्र येऊन सामुदायिक विकास घडवून आणावा या उद्देशाने काही दशकांपूर्वी ‘सार्क’ ही संघटना वरील सर्व देशांच्या सरकारप्रमुखांनी मिळून निर्माण केली. आता ती संघटना पूर्णतः निष्क्रिय झाली आहे. सार्क चे सदस्य असलेल्या देशांमधील जनतेचेही परस्परांशी संबंध निर्माण व्हावे या उद्देशाने देखील काही गैरसरकारी स्तरावर भक्कम प्रयत्न झाले होते.

भारतीय जनता पक्षाचेच दुसरे आदरणीय नेते लालकृष्ण अडवाणी असे म्हणायचे की, सर्व मुसलमान दहशतवादी नसतात, परंतु सर्व दहशतवादी मुसलमान असतात. म्हणजे सर्वसामान्य मुसलमान दहशतवादी नसतात असेच त्यांना म्हणायचे असावे. अडवाणींच्या नंतर हिंदुत्ववादाचा प्रवास हा ‘सर्व मुसलमान संशयित दहशतवादी असतात व नसल्याचे त्यांनी सिद्ध करावे’ या दिशेने सुरु आहे. परंतु ज्यांना खरोखर असे वाटते, त्यांची एकातरी मुस्लीम कुटुंबाशी जवळून ओळख आहे का?की केवळ ऐकीव माहितीवर आणि अलीकडील चित्रपटांमुळे त्यांना तसे वाटते?

१९९९ च्या अखेरीस वाजपेयी पंतप्रधान असताना व भाजपचेच जसवंत सिंह परराष्ट्रमंत्री असताना एका भारतीय विमानाचे अपहरण झाले आणि त्यातील प्रवाश्यांच्या नातलगांनी खूप दबाव टाकल्यामुळे मसूद अजहर सह काही अन्य दहशतवाद्यांची सुटका करून भारत सरकारने त्या प्रवाश्यांना कंदहार मधून सोडवून आणले. तसे करण्यासाठी सरकारवर भारतीय जनतेचा नव्हे तर प्रवाश्यांच्या नातलगांचाच दबाव होता. बंधक ठेवलेला माझा आप्त मरण पावला तरी चालेल, पण आतंकवाद्यांना सोडू नका असे कोणीही म्हटले नाही. समजा भविष्यात कोणत्याही अन्य देशाने भारतावर परमाणु बॉम्ब टाकण्याची धमकी दिली, तर त्यावेळी इराण सारखी मानवी साखळी करून रस्त्यावर उभे राहण्याची तयारी किती राष्ट्रभक्त भारतीयांमध्ये असेल?

पहलगामच्या आतंकवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने जे ऑपरेशन सिंदूर केले, त्यास जगातील अन्य देशांनी पाठिंबा दिला नाही. तसा पाठिंबा मिळावा म्हणून सर्व पक्षीय खासदारांचे शिष्टमंडळ अनेक देशांमध्ये पाठविण्यात आले. परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही. आपल्या पहिल्या पाच वर्षीय कारकिर्दीत स्वतः मोदींनी अनेकानेक विदेशी दौरे करून भारताचा ठसा उमटविण्याचा प्रयत्न केला होता. तो प्रयत्न सफल होत आहे असा भास होऊन मोदींना आपण ’विश्वगुरु’ मानू लागलो. परंतु आता जागतिक राजकारणात भारत महत्वहीन झाल्याचे का जाणवते? युद्ध सुरु होण्याच्या दोन दिवस आधी इस्त्राइलला जाऊन पूर्वी अस्तित्वात नसलेले मेडल स्वीकारताना नेतन्याहू यांच्याशी दाखविलेली फाजील सलगी भोवली असेल का ? दोन वर्षे गाझापट्टी मध्ये इस्त्राइलने जो नरसंहार चालविला होता, त्याची एकदाही निंदा भारत सरकारने केली नाही. उलट इस्त्राइलच्या संसदेत मोदी म्हणाले की इस्त्राईल च्या वेदना त्यांना जाणवतात (गाझा पट्टीतील पॅलेस्टिनी जनतेच्या नव्हे) भारत सदैव इस्त्राईल सोबत होता, आहे व पुढे ही राहील अशी हमी मोदींनी त्यावेळी दिली. सगळे जग इस्त्राईल ची निंदा करत असताना भारत मात्र अमेरिका

इस्त्राईल सोबत उभा असल्याचे चित्र जगाला दिसले. इराणमध्ये झालेल्या तेथील नेतृत्वाच्या हत्येविषयी शोकसंदेश सहा दिवसांनी परराष्ट्र सचिवामार्फत दिला गेला. अश्या अनेक मुद्द्यांमुळे भारताची मध्यस्थी इराणला मान्य नसावी. ट्रम्प आणि मोदी यांच्यातली जुनी दोस्ती अलीकडे का पातळ झाली, हे एक रहस्यच आहे. चीनच्या विरुद्ध भारत सरकार कधी वाईट बोलत नसूनही मध्यस्थी साठी चीनला सुद्धा भारतापेक्षा पाकिस्तान अधिक भरवशाचा वाटला. परिणामी युद्ध विरामानंतर लगेच पाकिस्तानचा शेअर बाजार आठ टक्क्यांनी वधारला, पण भारताचा मात्र फक्त चार टक्क्यांनी! आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीत पाकिस्तान आमच्यापेक्षा वरचढ ठरला.

**किशोर देशपांडे**

## बारामतीतून काँग्रेसची माघार धक्का देणारी

बारामती विधानसभेचे विद्यमान आमदार अजित पवार व अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी मतदार संघाचे आमदार शिवाजी कर्डिले यांचे निधन झाल्याने रिक्त जागेवर २३ एप्रिल रोजी मतदान होते आहे. बारामतीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार तर राहुरी येथून कर्डिले यांचे सुपुत्र अक्षय कर्डिले हे निवडणूक लढवत आहेत. बारामती विधानसभेसाठी सुनेत्रा पवार यांच्या विरोधात आकाश मोरे यांनी काँग्रेस पक्षाकडून अर्ज दाखल केला होता. पण, अखेरच्या क्षणी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांमुळे या निवडणुकीतून माघार घ्यावी लागली आहे. त्यामुळे आता ही जागा वनसाईड विजयाच्या बाजूने घोडदौड सुरू आहे असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही. राहुरीचीही तीच परिस्थिती आहे दोन्हीं मतदार संघात निवडणूक होणार आहे. पण, राष्ट्रवादी आणि भाजपा उमेदवारांना पाठींबा मिळाल्यामुळे हे उमेदवार सहज निवडून येणारे आहेत मात्र बारामतीतून काँग्रेसने माघारी घायला नको होते. कारण महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव ॲड. आकाश मोरे यांनी अर्ज दाखल केला होता तो निश्चितच स्वागतार्ह म्हणावा लागेल कारण आकाश मोरे यांनी अजीत पवारांच्या अपघाताच्या तपासाचा मुद्दा असून या मुद्द्याला वाचा फोडण्यासाठी आम्ही बारामतीच्या मैदानात उतरल्याचे म्हटले होते.त्यामुळे सरकारला त्यांची जागा दाखवून देण्यासाठी ही लढाई महत्वाची मानली जात होता.

मात्र, पक्षाच्या आणि महाआघाडी मित्र पक्षामुळे ऐनवेळी मोरेंना अर्थातच काँग्रेसला माघारी घ्यावी लागली हा निर्णय कार्यकर्त्यांना धक्का देणारा आहे.हे सर्वकाही ठरवूनच होते आहे. त्यामुळे या सर्वात दादांचा विषय बेदखल होताना दिसून येतो. त्यामुळे आगामी काळात या निवडणुकीतून काय निष्कर्ष निघतो ते पहाणे मोठे रंजक ठरणार आहे.

**राजू जाधव**

## नियमांचा धाक हवाच

रस्ते अपघातात दुचाकीस्वारांचे प्रमाण सुमारे ५७ टक्के असल्याचे समोर आले. ही बाब गंभीर तर आहेच. वर्षभरात सुमारे पाच लाख जणांवर कारवाई करण्यात येऊनही परिस्थितीत बदल नाही याचाच अर्थ निष्काळजीपणा, कायद्याचे न राहिलेला धाक दिसून येतो. व नियम भंग करणाऱ्यांवर अधिकाधिक कठोर कारवाई होणे आवश्यक असून जेणेकरून पुन्हा ते नियम भंग करण्यास धजावणार नाहीत असा नियम हवा.जेव्हा पोलिसांच्या सिट्टीचा धाक आणि कायद्याचा वचक प्रस्थापित होईल तेव्हा आपोआपच हे प्रमाण कमी होईल.

**विश्वनाथ पंडित**

# आता चिंता पर्जन्याची



**आखाती युद्धाने निर्माण झालेले ऊर्जा संकट, वाढलेली महागाई, अर्थव्यवस्थेला बसलेले हादरे, अवकाळी पावसामुळे झालेले नुकसान, रोजगारातील असुरक्षितता या सर्वांचा सामना निकराने सुरू असतानाच ‘स्कायमेट’ या खासगी हवामान अभ्यास संस्थेने यंदाच्या वर्षीच्या पाऊसमानाचे अंदाज व्यक्त केले आहेत. त्यानुसार यावर्षी ‘अल निनो’च्या प्रभावामुळे देशात सरासरीपेक्षा ६ ते ७ टक्के कमी पाऊस होण्याची शक्यता आहे. जुलै ते सप्टेंबर या तीन महिन्यांमध्ये पावसाची तूट अधिक असू शकते, असे अनुमानकर्त्या अभ्यासकांचे म्हणणे आहे.**

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य संघर्षामुळे ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आलेला असताना आणि सामान्य जनता गॅसटंचाई, महागाईने त्रस्त झालेली असताना या चिंतेत ‘स्कायमेट’ या खासगी हवामान संस्थेने यंदाच्या मान्सूनबाबत व्यक्त केलेल्या अंदाजांमुळे भर पडली आहे. पॅसिफिक महासागरातील ‘एल निनो’चा वाढता प्रभाव आणि ‘ला निना’चा काढता पाय, या भौगोलिक घडामोडींचा थेट फटका भारताच्या पर्जन्यमानाला बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या आकडेवारीनुसार, जूनमध्ये पावसाची सुरुवात आश्वासक वाटत असली, तर जुलै ते सप्टेंबर या मुख्य कालखंडात पावसाची ओढ कृषी क्षेत्रासाठी धोक्याची घंटा ठरू शकते.

भारताच्या जीडीपीमध्ये कृषी क्षेत्राचे योगदान १५-२० टक्के आहे. सिंचन सुविधांचा विस्तार होऊनही आपल्या देशातील बहुतांश शेती मान्सूनवर अवलंबून आहे. पाऊस कमी किंवा उशिरा झाला, तर शेती उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. तसेच विकासावर परिणाम होऊन महागाई वाढू शकते. २०१५ व २०१७ही दोन वर्षे महाराष्ट्रात भीषण दुष्काळी स्थिती होती तेव्हा कृषी क्षेत्राचा विकास दर दीड ते दोन टक्क्यांनी घसरला होता. दुष्काळी स्थितीमुळे कृषी व संलग्न क्षेत्रांत दोन वर्षे मंदी दिसून आली होती. कृषी सामग्रीसह अन्य अनेक क्षेत्रांमध्ये मागणी आक्रसल्याचे दिसले होते. त्यातून रोजगारावरही प्रतिकूल परिणाम झाला होता. देशात मान्सूच्या काळात सरासरी ८९ सेंटिमीटर पाऊस पडतो. गेल्या ५० वर्षांतील नोंदीनुसार मान्सूच्या सरासरीच्या ९६ ते १०४ टक्के एवढा पाऊस नोंदण्यात आला आहे. चांगल्या पावसाचा परिणाम खरीप पिकांच्या उत्पादनावर होतो आणि त्यामुळे काही विशेष खाद्यान्नाचे भाव कमी होऊ शकतात. तांदूळ, बाजरी, कापूस, मका, सोयाबीन आदी खरीप पिके असून त्यांचे उत्पादन बहुतांशवेळा चांगल्या पावसावर अवलंबून असते. त्यांची पेरणी जून-जुलैपासून सुरू हेते. अशावेळी पाऊस चांगला राहिला, तर त्यांचे उत्पादन वाढेल आणि महागाईवर काही प्रमाणात नियंत्रण मिळवता येणे शक्य आहे. महागाई कमी झाली, तर अर्थव्यवस्थेला फायदा मिळेल. रिझर्व्ह बँकेने पुढील वर्षासाठीचा महागाईचा अंदाज वाढवण्यामागे पर्जन्यतुटीची शक्यता हे एक प्रमुख कारण असल्याचे दिसत आहे.

विशेषतः ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात पावसाचे प्रमाण ८९ ते ९२ टक्के राहण्याचा अंदाज आहे. हे दोन महिने खरीप हंगामातील पिकांच्या वाढीसाठी आणि दाणे भरण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात. पंजाब, हरियाणा आणि राजस्थान यांसारख्या राज्यांमध्ये पावसाची घट झाल्यास अन्नधान्याच्या उत्पादनावर थेट परिणाम होईल. मध्य भारतात सोयाबीन आणि कापसाच्या पिकाला या पावसाच्या तुटीचा मोठा फटका बसू शकतो. पावसाची सरासरी कमी होणे म्हणजे केवळ पिकांचे नुकसान नव्हे, तर धरणांमधील पाणीसाठा कमी होणे आणि पर्यायाने पुढील वर्षाच्या उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचे तसेच सिंचनाचे संकट ओढवणे होय. मान्सूनची साथ लाभल्याखेरीज देशाच्या आर्थिक विकासाची चाके गतिमानतेने फिरत नाहीत. हवामान विभागाकडून मान्सूनची सरासरी कमी असल्याचा अंदाज वर्तवला गेल्यास शेअर बाजारातही त्याचे टोकाचे नकारात्मक पडसाद उमटतात, हे आपण पाहिले आहे. कारण, यामुळे शेतीवर आधारित अर्थव्यवस्था बाधित होऊन ग्रामीण मागणी आक्रसण्याची शक्यता निर्माण होते.

मान्सूनच्या सरासरीबरोबरच त्याचे वितरणही समाधानकारक होणे आवश्यक आहे. अलीकडील काळात पर्जन्यवितरणातील विषमता वाढत आहे. पावसाचे दिवस कमी होत आहेत. कमी कालावधीत जास्त पाऊस पडण्याच्या घटना वाढत आहेत. पूर्वी जवळपास ७० ते ८० दिवस पाऊस पडत होता. आता पावसाचे दिवस घसरत घसरत ३० पर्यंत खाली आले आहेत. म्हणजेच ३० दिवसांत पडणारा पाऊस आपल्याला ३६५ दिवस सांभाळून ठेवायचा आहे, तरच आपल्याला वर्षभर पाणी मिळू शकेल. एका अंदाजानुसार, दरवर्षी भारतात पुढील दोन वर्षे पुरेल इतका पाऊस दरवर्षी पडतो; पण आपण त्याचे संकलनच करत नाही. पूर्ण भारतामध्ये केवळ १० टक्के पाण्याचे संकलन होते. ही स्थिती बदलण्याची प्रतीक्षा आजही कायम असणे हे आपल्या व्यवस्थेचे अपयश आहे. सिंचनाच्या मुद्द्यावरून राजकारण रंगते, आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडतात, प्रचंड निधी खर्च होतो; पण तरीही एखाद्या वर्षी पावसाने दडी मारली, मान्सूनचे आगमन लांबले, कमी वर्षा झाली, तर सबंध कृषी क्षेत्राचे अर्थकारण कोलमडते. याचे कारण पडणारा पाऊस अडवण्यासाठी, जमिनीत मुरवण्यासाठी, धरणांमध्ये साठवण्यासाठी आणि त्याचे वितरण निर्दोष करण्यासाठी काटेकोर नियोजनच कधी केले गेले नाही. दरवर्षी मोठमोठाल्या घोषणांचे फुगे हवेत सोडून जनतेची दिशाभूल करत राहण्यात आपल्या शासनकर्त्यांनी समाधान मानले; पण त्यामुळे पाणी प्रश्न तसाच कायम राहिला.

चालू महिन्याच्या अखेरीस भारतीय हवामान खात्याचा अंदाज जाहीर होईल, तेव्हा यंदाच्या पावसाचे चित्र अधिक स्पष्ट होऊ शकेल; पण स्कायमेटच्या अंदाजातून धडा घेत शासनाने आतापासूनच ‘दुष्काळ व्यवस्थापन’ या विषयावर गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

जेव्हा पाऊस कमी असतो, तेव्हा उपलब्ध पाण्याचे सूक्ष्म नियोजन (मायक्रो प्लॅनिंग) करणे अनिवार्य ठरते. पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरण्यासाठी ठिबक सिंचन आणि तुषार सिंचनाचा जास्तीत जास्त वापर व्हावा लागेल. तसेच, ज्या पिकांना कमी पाणी लागते, अशा पिकांकडे वळण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. उदाहरणादाखल, धानासारख्या जास्त पाणी लागणाऱ्या पिकांऐवजी बाजरी, नाचणी किंवा कडधान्यांची लागवड करणे हा एक चांगला पर्याय ठरू शकतो. दुसरीकडे, प्रशासनाने आत्तापासूनच चारा छावण्यांचे नियोजन, नरेगाच्या माध्यमातून जलसंधारणाची कामे आणि पिण्याच्या पाण्याचे टँकर व्यवस्थापन यावर भर दिला पाहिजे. हवामानाचे अंदाज आता अधिक अचूक होत आहेत, त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांपर्यंत वेळेत माहिती पोहोचवणे हा या लढाईतील महत्त्वाचा भाग आहे. केवळ आपत्ती आल्यावर उपाययोजना करण्यापेक्षा, संभाव्य टंचाई लक्षात घेऊन आत्ताच धोरणात्मक निर्णय घेणे हे शहाणपणाचे लक्षण ठरेल.

विशेषतः गेल्या काही वर्षांत शहरांजवळ उदयास आलेली उपनगरे ही भूजलावरच वाढत आहेत. तेथे जमिनीत पाणी मुरवण्यासाठी आतापासूनच प्रयत्न केले नाहीत तर भविष्यात गंभीर स्थिती उद्भवू शकते. त्यामुळे वर्षाजल संचय अर्थात रेनवॉटर हार्वेस्टिंगबाबत कठोर नियम करुन त्यांची अमलबजावणी व्हायला हवी. तसेच तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पाण्याचा पुनर्वापर करता येणे शक्य होत असूनही त्याबाबत शासकीय स्तरावर भरीव प्रयत्न होताना दिसत नाहीत. यासंदर्भात सिंगापूर, इस्त्राईलसारखी उदाहरणे समोर असूनही आपण जर त्यामध्ये मागे राहात असू तर विकसित भारत, हर घर नल यांसारख्या योजनांना अर्थच उरणार नाही. ‘एल निनो’चा प्रभाव असेल किंवा नसेल, बदलत्या हवामानानुसार आपल्या शेती पद्धतीत आणि जल व्यवस्थापनात आमूलाग्र बदल केल्याशिवाय आपल्याला शाश्वत विकास गाठता येणार नाही. निसर्गाच्या लहरीपणावर आपले नियंत्रण नसले तरी, त्यातून होणारे नुकसान कमी करणे निश्चितच आपल्या हातात आहे.

**राजीव मुळ्ये**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# २४ तासांत दुचाकी चोरीचा गुन्हा उघड ; आरोपी अटकेत



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : पाटण पोलिस स्टेशन पाटण येथे दाखल अप क्र. 70/2026, कलम 303 (2) BNS अंतर्गत मोटरसायकल चोरीचा गुन्हा पोलिसांनी अवघ्या २४ तासांत उघडकीस आणत आरोपीला अटक केली आहे.

फिर्यादीने दिनांक 09 एप्रिल 2026 रोजी तक्रार दिली होती की, त्यांच्या शेतातून MH 29 BX 3191 क्रमांकाची होंडा शाईन (अंदाजे किंमत ५० हजार रुपये) अज्ञात इसमाने चोरी करून नेली. या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला होता. मिलिंद सरकटे (ठाणेदार, पाटण) यांच्या नेतृत्वाखाली, तसेच कुमार चिंता (पोलीस अधीक्षक), अशोक थोरात (अप्पर पोलीस अधिकारी) व बन्सल (उपविभागीय पोलीस अधिकारी) यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक तयार करण्यात आले. या पथकाने तपास करून आरोपी गोविंद लालु आत्राम (वय ४०, रा. कमलवेल्ली, ता. झरी) यास ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने मोटरसायकल चोरीची कबुली दिली असून त्याच्याकडून चोरीस गेलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे. तसेच सखोल चौकशीत आरोपीने अप. क्र. 55/2026, कलम 331(4), 305 BNS (घरफोडी) या गुन्ह्याचीही कबुली दिली. या प्रकरणात चोरी केलेले ४ तोळे चांदी व ५,००० रुपये रोख रक्कमही पोलिसांनी जप्त केली आहे. या कारवाईत PSI नागोराव जाधव, पोह रतीश वानखेडे, पोह अमित पोयाम, पो.कॉ. सचिन बोंडे, पो.कॉ. प्रशांत तलांडे व पो.कॉ. हेमंत कामटवार यांनी सहभाग घेतला. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोह रतीश वानखेडे करीत आहेत.

# “डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना नाचून नाही तर वाचून डोक्यात घ्या”: डॉ. नीरज वाघमारे

## यवतमाळात भव्य स्पर्धा परीक्षा उत्साहात संपन्न

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - डॉ.नीरज वाघमारे (गटनेता तथा नगरसेवक,यवतमाळ) यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य स्पर्धा परीक्षा आज दिनांक १२ एप्रिल (रविवार) रोजी छत्रपती शिवाजी महाराज ग्राउंड,यवतमाळ येथे उत्साहात पार पडली.या परीक्षेत जवळपास हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असल्याची माहिती आयोजकांनी दिली.



या स्पर्धा परीक्षेत मुला-मुलींसाठी प्रत्येकी १०० गुणांचा सराव पेपर घेण्यात आला होता.

तसेच विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आकर्षक बक्षिसांचीही व्यवस्था करण्यात आली होती. संपूर्ण आयोजन शिस्तबद्ध व उत्साही वातावरणात पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.नीरज वाघमारे म्हणाले की, “डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नाचून नाही तर वाचून डोक्यात घेतलं पाहिजे. आणि ते आपण प्रत्यक्षात करत आहोत याचा मला नितांत आनंद आहे.” ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन असो किंवा आंबेडकर जयंतीनिमित्त असे उपक्रम असो, हे सातत्याने राबवले जात आहेत.

या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वंकष विकास होऊन त्यांना योग्य दिशा व प्रोत्साहन मिळते. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोहित सावंत,मनीष बुटले अक्कलवार सर,माकोडे सर,आडे सर, माळोदे सर, सतीश नगराळे, स्वप्निल टिपले, सुबोध थुल, यश डबले, निखिल नगराळे, रोहित चव्हाण, रिनल सावंत, अश्विनी कर्वे, संजना कर्वे, राजकमल कांबळे, सलम तिरपुडे, कुंदन आडे तसेच इतर कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

दरम्यान यावेळी वंचित बहुजन आघाडी जिल्हा उपाध्यक्ष सचिन राऊत संतोष राउत उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांबाबत जागरूकता निर्माण झाली असून भविष्यातही असे उपक्रम सुरू ठेवण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.

# प्रबोधनपर्व समितीच्या वतीने राष्ट्रपिता ज्योतिबा फुले जयंती उत्साहात !

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती प्रबोधनपर्व 2026 यांच्यावतीने आज दिनांक 11 एप्रिल 2026 रोजी ज्योतिबा फुले यांची 199 वी जयंती समितीचे कार्यालय वसंतराव नाईक चौक येथे मोठ्या उत्साहात व आनंदात साजरी करण्यात आली आहे. सर्वप्रथम राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला म.ज्योतिबा फुले जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशांत गवळी व प्रबोधनपर्व समितीचे अध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जय जयकाराच्या घोषणा सुद्धा देण्यात आल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांना आपले गुरु मानून त्यांच्या कार्याचा वसा घेत आपले कार्य सुरू केले. असे त्यांच्या गुरु व शिष्यांच्या कार्याचा व आठवणीचा उजाळा यावेळी उपस्थित मान्यवर यांनी



आपले मत व्यक्त करतांना उपस्थितांना मार्गदर्शन केले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी अठराव्या शतकात व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी एकोणिसाव्या शतकात या दोन्ही महामानवांनी समाजासाठी आपले आयुष्य खर्च करून समता,स्वातंत्र्य व बंधुता मिळून देण्यासाठी व्यवस्थेशी लढत अस्पृश्य समाजासाठी काम करत त्यांचे हक्क प्रदान करून दिले तसेच स्त्री शिक्षणासाठी पहिली शाळा सुरू करून त्यांना शिक्षणाचा अधिकार प्राप्त करून दिला असे भारताचे राष्ट्रपिता ज्योतिराव फुले यांनी या देशात परिवर्तन घडवून आणले व स्त्रीसह अस्पृश्यांना सुद्धा शिक्षणाचा अधिकार मिळाला असे महान कार्य करणारे महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशतक जयंतीमध्ये पदार्पण होत आहे असे प्रबोधनपर्व समितीचे अध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांनी आपले विचार मांडले. यावेळी विठ्ठल खडसे सर शिक्षण सभापती न.प.पुसद, प्रा.कल्याण साखरकर, जिल्हा को-ऑपरेटिव बँकेतील माजी सेवानिवृत्त कांबळे, विजय निखाते, ओंकार सोनटक्के, ओम गवळी इत्यादी समाज बांधव उपस्थित होते.

## • वेचक



### अरुणोदय विद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा फुले जयंती उत्साहा साजरी

दिग्रस - तालुक्यातील लाख रा.येथील अरुणोदय विद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. आशिष वासुदेराव महल्ले उपस्थित होते. तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. सुधीर काळबोंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी विद्यार्थ्यांनी फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे, आणि सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्रमुख पाहुणे आपल्या भाषणात फुले यांच्या समाजसुधारणा कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी सांगितले की, फुले यांचे विचार आजही समाजासाठी मार्गदर्शक आहेत. मुख्याध्यापक श्री. सुधीर काळबोंडे यांनी विद्यार्थ्यांना समता, शिक्षण आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व समजावून सांगितले व फुले यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विद्यालयातील शिक्षकांनी केले. या कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

महागाव - औद्योगिक प्रशिक्षण संस्था आय. टी. आय यवतमाळ येथील प्रथम वर्षातील विजतंत्री इलेक्ट्रशियनच्या एकूण १९ विद्यार्थीना ऑन जॉब ट्रेनिंग अंतर्गत 150 तास इलेक्ट्रिशयचे ट्रेनिंग तुमसरे इलेक्ट्रिकल वडगांव रोड यांनी दिले. तसेच द्वितीय वर्षातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑन जॉब ट्रेनिंग अंतर्गत एकुण 35 (पसत्तीस) विद्यार्थ्यांना दि. 09/03/2026 ते 07/04/2026 पर्यंत 150 तास प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांना आपल्या पायावर उभे राहण्याची संधी यामुळे मिळणार आहे. सामाजिक क्षेत्रात अग्रगण्य राहणारे तुमसरे इलेक्ट्रिकलचे,व संकल्प फाउंडेशनचे शहर प्रसिद्धी प्रमुख सागर महादेवराव तुमसरे या विद्यार्थ्यांचे ट्रेनिंग योग्य प्रकारे व्हावे यासाठी प्रयत्नशील आहे.तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्राचार्य श्री.व्ही. जे.नागोरे सर व शिल्पनिदेशक श्री. सौरभ देऊळकर, श्री. जी. पी. ठोबंरे , व कु.ए. बी. मुन यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम चालू असून प्रशिक्षणार्थीना प्रमाणपत्र सुध्दा देण्यात येणार आहे.तुमसरे इलेक्ट्रिकल च्या पाठपुराव्यामुळे हे प्रशिक्षण देणे शक्य होत आहे,अशी प्रतिक्रिया तुमसरे इलेक्ट्रिकचे सागर महादेवराव तुमसरे यांनी दिली यावेळी विशाल अतकरी, पंडीत बाबळे, शांतुनु धोटे इत्यादी उपस्थित होते आणि प्रशिक्षणासाठी आलेले एकुण पसत्तीस विद्यार्थी यावेळी प्रशिक्षण घेत होते.

# धर्म माणसाला जोडतो, विभाजन करत नाही” : प्रा. जावेद पाशा कुरेशी !

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले जयंतीनिमित्त पुसद येथे आयोजित प्रबोधनपर व्याख्यानात नागपूर येथील प्रा. जावेद पाशा कुरेशी यांनी सामाजिक समता, धर्म, शिक्षण आणि राजकीय जागरूकतेवर प्रभावी व अभ्यासपूर्ण भाष्य केले. महात्मा फुले जयंती उत्सव समिती, पुसद यांच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम शुक्रवारी दि.१० एप्रिल २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

प्रा. कुरेशी यांनी आपल्या भाषणात ठामपणे सांगितले की, “धर्म माणसाला जोडण्यासाठी असतो, विभाजनासाठी नाही” आणि “सांस्कृतिक संघर्ष हा मानवतेच्या मानगुटीवर बसलेला राक्षस आहे”. त्यांनी स्पष्ट केले की, धर्माचा मूळ उद्देश मानवतेची जपणूक असला तरी आज धर्माच्या नावाने समाजात तणाव निर्माण केला जात आहे. “हजारांमध्ये फारच कमी लोकांना धर्म समजतो, बाकी समाजजीवन जगतात,” असे सांगत त्यांनी धर्माच्या




नावाने होणाऱ्या दिशाभूल करणाऱ्या प्रवृत्तीवर टीका केली. ते पुढे म्हणाले की, “शिक्षण हाच खरा धर्म आहे, अन्यथा धर्म टिकू शकत नाही” हा महात्मा ज्योतिराव फुले यांचा मूलभूत विचार आजही तितकाच लागू आहे. फुले यांनी ‘सत्यशोधक’ विचार मांडत समाजात समता आणि बंधुतेचा मार्ग दिला. “सत्यशोधक विचार समाजात समता आणि बंधुता निर्माण करणारा मार्ग आहे,” असे त्यांनी अधोरेखित केले.प्रा. कुरेशी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचा उल्लेख करत सांगितले की, “सावित्रीबाईंच्या नैतिक पाठबळामुळेच ज्योतिबांची क्रांती यशस्वी झाली”. त्यांनी फातिमा शेख यांचाही उल्लेख करत स्त्रीशिक्षणाच्या चळवळीतील त्यांच्या भूमिकेचे महत्त्व पटवून दिले. “स्त्रीशिक्षणामुळे समाजात मोठा बदल घडला, आजही त्याची गरज आहे,” असे ते म्हणाले.

राजकारणाच्या संदर्भात त्यांनी स्पष्ट शब्दांत मांडणी केली की, “राजकारण तुमच्या आयुष्याच्या प्रत्येक गोष्टीची किंमत ठरवणारी मोठी संस्था आहे”. त्यामुळे नागरिकांनी राजकीयदृष्ट्या सजग राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाचा उल्लेख करत सांगितले की, “शिवरायांचा इतिहास जनतेपर्यंत पोहोचवणारे महात्मा ज्योतिराव फुले होते”. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फुले यांच्या विचारांना पुढे नेत संविधानाच्या माध्यमातून सामाजिक न्यायाची दिशा दिली.

# ‘महामानवाला अनोखी अभिवादन’

## राळेगावात ‘किमान ३ तास अभ्यास’ अभियानाचे आयोजन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

राळेगाव - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राळेगाव येथील कला, वाणिज्य महाविद्यालयाच्या इतिहास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना (NSS), राष्ट्रीय युवा संगठन व माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने ‘किमान ३ तास अभ्यास’ अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. १४ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या या उपक्रमाद्वारे महामानवाला अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात येणार आहे.

या अभियानाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची सवय दृढ करणे तसेच समाजात शैक्षणिक जागरूकता निर्माण करणे हा आहे. राळेगाव तालुक्यातील विविध संस्कार केंद्रांमध्ये सामूहिक अभ्यासाचे आयोजन करण्यात येणार असून, इच्छुक विद्यार्थी व नागरिकांना वैयक्तिक स्तरावरही या अभियानात सहभागी होता येणार आहे. अभ्यासासाठी सकाळी ६ ते सायंकाळी ९ या कालावधीत कोणतीही सलग ३ तासांची वेळ निवडता येणार आहे. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याने किमान ३ तास अभ्यास करणे बंधनकारक असून, प्रत्येक तासानंतर १० मिनिटांची विश्रांती देण्यात येणार आहे. १० ते २० वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. सामूहिक अभ्यासाच्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा पूजन करून प्रार्थनेने उपक्रमाची सुरुवात केली जाणार आहे. अभ्यासानंतर त्यांच्या विचारांवर चर्चा किंवा वाचन सत्र आयोजित करून राष्ट्रगीताने समारोप केला जाणार आहे. वैयक्तिक स्तरावर सहभागी होणाऱ्यांनीही प्रतिमा पूजन करून निर्धारित वेळेत अभ्यास करायचा आहे. या अभियानात सहभागी होण्यासाठी नागरिकांनी दिलेल्या गूगल फॉर्मद्वारे नोंदणी करणे आवश्यक आहे. सर्वाधिक विद्यार्थी सहभाग, शिस्तपालन व नोंदी व्यवस्थित ठेवणाऱ्या उत्कृष्ट संस्कार केंद्रास रु. १५०० चे पारितोषिक व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. अभियान यशस्वी करण्यासाठी केंद्रप्रमुखांनी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची नोंद ठेवणे, योग्य वातावरण निर्माण करणे तसेच अभियानानंतर फोटो व अहवाल NSS विभागास सादर करणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी आवश्यक साहित्य स्वतः आणावे तसेच मोबाईलचा वापर टाळावा, असेही आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. भास्कर सावरकर यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून, समन्वयक म्हणून डॉ. विशाल दौलतकर व विनोद देवतळे कार्यरत आहेत. विविध सहसमन्वयक व संस्कार केंद्र संचालक या अभियानासाठी परिश्रम घेत आहेत. महामानवाच्या जयंतीनिमित्त शिक्षणातून अभिवादन करण्याचा हा उपक्रम निश्चितच विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त यवतमाळ शहरात वाहतूक मार्गात बदल

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल २०२६ रोजी यवतमाळ शहरात मोठ्या प्रमाणात मोटारसायकल रॅली, शोभायात्रा तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संविधान चौकात अभिवादना साठी मोठ्या संख्येने अनुयायी एकत्र येणार असल्याने शहरातील वाहतुकीवर ताण येण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी व अपघात टाळण्यासाठी पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी मोटार वाहन अधिनियम १९८८ अंतर्गत विशेष वाहतूक अधिसूचना जारी केली आहे.या आदेशानुसार १४ एप्रिल रोजी सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत शहरात जड वाहने, ट्रॅव्हल्स, बसेस व चारचाकी वाहनांना मुख्य मार्गाने प्रवेश बंद राहील. आर्णी रोडवरून नागपूर व चंद्रपूर कडे जाणारी



वाहने वनवासी मारोती येथून वळविण्यात येतील, तर अमरावती कडे जाणारी वाहने भोयर बायपास मार्गे लोहारा चौकातून मार्गस्थ होतील. शहरात येणाऱ्या बसेससाठीही विशेष मार्ग निश्चित करण्यात आला असून, आर्णी रोड, दारव्हा रोड व धामणगाव बायपासमार्गे बसस्थानकात प्रवेश देण्यात येईल. घाटंजी व आर्णी मार्गावरील बसेस वनवासी मारोतीमार्गे शहरात येतील. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन अधिनियम कलम ११९ नुसार कारवाई करण्यात येणार आहे. ही अधिसूचना प्रसारमाध्यमे, सोशल मिडिया, ई-मेल व ध्वनिक्षेपकाद्वारे जाहीर करण्यात येणार असून, संबंधित ठिकाणी सूचना फलक लावण्यात येतील. तसेच सर्व शासकीय कार्यालये व सार्वजनिक ठिकाणी अधिसूचनेच्या प्रती लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# कळंब बसस्थानक परिसरात वाहतुकीची कोंडी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

कळंब - येथील बसस्थानकचे नवीन इमारत बांधकाम गेल्या वर्षे भरापासून सुरु असून आता बांधकाम हे पूर्ण होण्याच्या मार्गावर दिसत आहे. बस स्थानकचे काम सुरू असल्याने बसस्थानक समोर असलेल्या मुख्य रस्त्यावर बस थांबतात. तसेच याच मुख्य मार्गाने खासगी वाहनाची मोठ्या प्रमाणात वाहतूक असल्याने या बसस्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी निर्माण होत आहे. याकडे पोलिसांचे दुर्लक्ष होत आहे.

कळंब शहरातील मुख्य मार्गाने होत असलेल्या कोंडीमुळे पादचाऱ्यांसह दुचाकी वाहनचालकांना या वाहतूक कोंडीतुन मार्ग काढत निघावे लागते. एवढेच नाही तर या बस स्थानक परिसरात काही वाहनधारक लगबगीने वाहन काढत असताना अनेकदा दुचाकीस्वार तसेच या मार्गाने ये-जा करणाऱ्यांना किरकोळ अपघाताला सामोरे जावे लागत आहे. दर दोन दिवसांआड या वाहतूक कोंडीमुळे या बसस्थानक परिसरात किरकोळ अपघात होत आहे. या परिसरातून जाताना शहरातील नागरिकांना व विद्यार्थ्यांना जिवमुठीत घेऊन जावे लागते, अशी स्थिती या परिसरात झाली आहे. वाहनांची तारांबळ व कोंडी होत असल्याने या ठिकाणी वाहतूक पोलीस असल्याने ही होणारी वाहतूक कोंडी यावर नियंत्रण होईल व अपघात होण्याची शक्यता पण होणार नाही. शहरातील बसस्थानक परिसराचा मुख्य भाग असून या ठिकाणी वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असते व गर्दी पण मोठ्या प्रमाणात असल्याने अनेक अडथळे या परिसरात होतात. विशेषतः पोलीस या ठिकाणी पूर्ण वेळ कधीच दिसत नाही. एखादा पोलीस या बसस्थानक परिसरात असला तरी काही वेळ इकडून तिकडे सिट्टी वाजवून पोलीस असल्याचे दाखवून लगेच पोबारा करीत गुल होतात.

या बस स्थानक परिसरातून अनेकदा मंत्री यांच्या वाहनासह सोबत असलेल्या पोलीस ताफ्याचीही कोंडी होत असल्याने तसेच या परिसरात वाहतूक पोलीस नसल्याने नागरिकांना होत असलेल्या त्रासाला अनेकदा नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. शहरातील नागरिकांनी पण याठिकाणी होत असलेल्या वाहतूक कोंडीला या ठिकाणी वाहतूक पोलिसांनी आवर घालावे, अशी मागणी केली जाते आहे.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/२८६/२०२६
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- १७/०३/२०२६

## जाहीरनामा

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार मोहम्मद सलीम शेख इब्राहीम रा. उमरखेड. ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांची बहीण नामे यासमिन बेगम मोहम्मद इब्राहीम जन्म दिनांक-१६/०५/१९७९ मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **जन्मनोंद** आदेश देणेबाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक २०/०४/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कायालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा.
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

# महात्मा फुले अभ्यासिकेत फुले जयंती उत्साहात साजरी



**जनमाध्यम प्रतिनिधी**

वणी - संजय खाडे फाउंडेशन संचालित स्व. रामचंद्र खाडे स्मृतीशेष महात्मा फुले अभ्यासिकेत महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. दिनांक 11 एप्रिल 2026 रोजी सकाळी 11 वाजता आयोजित कार्यक्रमाला अभ्यासिकेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व महात्मा फुले व सावित्रिबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी संजय खाडे व वैभव ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तर ईश्वर खाडे व धनंजय खाडे यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती होती.

मार्गदर्शन करताना संजय खाडे म्हणाले, “महात्मा फुले यांनी शिक्षणाचा दीप प्रज्वलित करून समाजाला नवा मार्ग दाखवला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा वारसा जपत शिक्षणाच्या बळावर समाजातील विषमता दूर करण्यासाठी पुढे यावे.” तसेच वैभव ठाकरे यांनी सांगितले, “फुले यांनी स्त्री-शिक्षणाला दिलेले महत्त्व आजही तितकेच प्रेरणादायी आहे.प्रत्येक विद्यार्थ्याने जबाबदार नागरिक बनण्याचा संकल्प करावा.फुले यांचे विचार हेच आपले खरे मार्गदर्शक आहेत.” यावेळी अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अभ्यासिकेच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# विजेच्या धक्क्याने युवकाचा मृत्यू



**जनमाध्यम प्रतिनिधी**

दारव्हा - घराच्या सुरु असलेल्या बांधकामादरम्यान युवकाला विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. ही घटना दारव्हा तालुक्यातील मुंडळ (हादगाव ) येथे शनिवारी सायंकाळी ८. ३० वाजता घडली.

युग झोलेश धादोड (१७) रा. मुंडळ (हादगाव) असे मृतक युवकाचे नाव आहे. त्याने नुकतीच शिवाजी सायन्स कॉलेज, दारव्हा येथून 11 वी सायन्सची परीक्षा दिली होती. महाविद्यालयात हुशार विद्यार्थी, शांत, प्रेमळ, नम्र, प्रामाणिक विद्यार्थी म्हणून त्याचे नावलौकिक होते . त्यांचे वडील प्रगतशील शेतकरी आहे. घराचे बांधकाम चालू असताना शनिवार, ११ एप्रिलला सायंकाळी ८. ३० वाजता त्याला अचानक विजेचा जबर धक्का बसला. दरम्यान त्याला त्याला वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात उपचारार्थ भरती करण्यात आले होते. डॉक्टरच्या शर्थीच्या प्रयत्नानंतरही उपचाराला साथ न मिळाल्याने त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेने गावात हळहळ व्यक्त होत आहे. तरुण मुलगा गेल्याने धादोड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेची माहिती दारव्हा पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह पोलिसांनी उत्तरीय तपासणी साठी पाठविण्यात आला. उत्तरीय तपासणीनंतर पोलिसांनी मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन केला. त्याच्या पार्थिवावर रविवारी मुंडळ येथील मोक्षधामात करण्यात आला.

# शिवरामजी मोघे महाविद्यालयात फुले जयंती उत्साहात साजरी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पांढरकवडा - येथील शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. अरुण दसोडे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. उल्हास राठोड, प्रा. डॉ. योगेश उगले व प्रा. डॉ. प्रदीप झिलपिलवार उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास व शिक्षणाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा आदर्श घेऊन समाजासाठी योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले. जयंतीनिमित्त निबंध व वकृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. “आधुनिक भारतातील समाज सुधारक आणि शिक्षण – महात्मा ज्योतिबा फुले यांचे योगदान” हा स्पर्धेचा विषय होता. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे संचालन कु. लक्ष्मी मेश्राम यांनी केले. प्रास्ताविक डॉ. अमर वंजारी यांनी केले, तर अहवाल सादरीकरण डॉ. उषा राखुंडे यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना (NSS) चे कार्यक्रम अधिकारी डॉ. अमर वंजारी व डॉ. उषा राखुंडे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

# ऐनवेळी परीक्षा केंद्र बदलल्याने विद्यार्थ्यांचा संताप

## मनसेच्या हस्तक्षेपानंतर आंदोलन मागे



**अमरावती/का.प्र.**

विक्रमशिला तंत्रनिकेतन, दारापूर येथे ऐनवेळी परीक्षा केंद्र बदलल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला असून, या विरोधात मनसे व विद्यार्थ्यांनी एकत्र येत आंदोलन छेडले. या आंदोलनानंतर प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या मागण्यांना मान्यता दिल्याने आंदोलन मागे घेण्यात आले.

दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टद्वारे संचालित विक्रमशिला तंत्रनिकेतनमध्ये गेल्या काही दिवसांपासून प्रॅक्टिकल लॅब, प्रसाधनगृह व पाण्याची व्यवस्था पूर्णपणे बंद ठेवण्यात आली होती. तसेच प्रवेशद्वारावर सुरक्षारक्षक नेमून विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश नाकारण्यात येत असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला.दरम्यान, प्राचार्यांनी एमएसबीटीईकडे परीक्षा केंद्र रद्द करण्यासाठी पत्रव्यवहार केला. एमएसबीटीईने त्याच केंद्रावर परीक्षा घेण्याचे निर्देश दिले असतानाही पुन्हा केंद्र रद्द करण्याची मागणी करण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रॅक्टिकल वेळेत होऊ शकले नाहीत आणि ऐनवेळी केंद्र बदलल्यामुळे त्यांना मोठा त्रास सहन करावा लागला.

विद्यार्थ्यांना हॉल तिकीट, प्रॅक्टिकल व परीक्षेसंदर्भात अनेक अडचणी निर्माण झाल्याने त्यांनी मनसेकडे धाव घेतली. मनसे विद्यार्थी सेनेचे तालुका अध्यक्ष प्रथमेश राऊत यांनी ही बाब मनसे तालुकाध्यक्ष मनोज तायडे यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर पक्षाचे नेते अमित राज ठाकरे, सरचिटणीस संतोष गांगुर्डे व अॅड. स्नेहल आढळकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात विद्यार्थ्यांसोबत आंदोलन करण्यात आले.

आंदोलनादरम्यान प्राचार्य डी. टी. इंगोले यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत लेखी आश्वासन दिले. यामध्ये प्रॅक्टिकल परीक्षा पूर्ण करून घेणे, विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर जाण्यासाठी मोफत बस सुविधा उपलब्ध करून देणे, दूरवरून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राहण्याची व्यवस्था करणे, तसेच हॉल तिकीट वेळेत देणे आणि परीक्षेदरम्यान कोणताही त्रास होऊ न देण्याचे आश्वासन देण्यात आले.या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. विद्यार्थ्यांना न्याय मिळवून दिल्याबद्दल विद्यार्थ्यांनी मनसेचे नेते अमित ठाकरे, संतोष गांगुर्डे, अॅड. स्नेहल आढळकर, तालुकाध्यक्ष मनोज तायडे, विद्यार्थी सेना तालुका अध्यक्ष प्रथमेश राऊत व सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

## मुंबई–अमरावती एक्स्प्रेसच्या वेळेत बदल

**अमरावती/का.प्र.**



भुसावळ विभागातील रेल्वे वाहतुकीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने मध्य रेल्वेने निवडक मेल/एक्स्प्रेस गाड्यांच्या वेळापत्रकात व्यापक बदल जाहीर केले आहेत. १४ एप्रिल पासून टप्प्याटप्प्याने लागू होणाऱ्या या बदलांमुळे अनेक महत्त्वाच्या गाड्यांच्या आगमन व प्रस्थान वेळांमध्ये फेरबदल करण्यात आल्याने भुसावळसह जळगाव, बडनेरा, अकोला, मूर्तिजापूर यांसारख्या प्रमुख स्थानकांवरील सध्याच्या वेळापत्रकावर त्याचा थेट परिणाम होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते अमरावती दरम्यान धावणारी १२१११ क्रमांकाची एक्स्प्रेस उत्तर महाराष्ट्रासह विदर्भातील प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या गाडीच्या वेळापत्रकात मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आले असून, नाशिकरोड येथे आता तिचे पहाटे ००.१५ वाजता आगमन असेल. पुढे जळगाव येथे ०३.१३, भुसावळ येथे ०३.४०, मलकापूर येथे ०४.३८, नांदुरा येथे ०४.५८, शेगाव येथे ०५.१८, अकोला येथे ०६.१०, मूर्तिजापूर येथे ०६.४८, बडनेरा येथे ०७.५७ आणि अखेरीस अमरावती येथे ०८.३५ वाजता आगमन, असे नवीन वेळापत्रक १४ एप्रिलपासून लागू होणार आहे. नवीन वेळापत्रकानुसार, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस–अमरावती एक्स्प्रेसचे जळगाव स्थानकावर साधारणपणे ३३ मिनिटे तर भुसावळ स्थानकावर २० मिनिटे उशिरा यापुढील काळात आगमन होईल.

## मनपाच्या शहर सुधार समितीच्या पदग्रहणाचा समारंभ

**अमरावती/का.प्र.**



महानगरपालिकेच्या शहर सुधार समितीच्या सभापतीपदी राधा कुरील आणि उपसभापतीपदी सुमती ढोके यांचा पदग्रहण समारंभ आज मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात पार पडला.

[illegible] महानगरपालिकेचे पदाधिकारी, नगरसेवक, विविध विभागांचे अधिकारी तसेच स्थानिक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपमहापौर सचिन भेंडे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शहर सुधार समितीच्या सभापती राधा कुरील आणि उपसभापती सुमती ढोके यांचे पुष्पगुच्छ देऊन आणि शुभेच्छा देत सत्कार करण्यात आले.समारंभात उपस्थित मान्यवरांनी नवीन पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत शहराच्या विकासासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज अधोरेखित केली.कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने करण्यात आला. पदग्रहण समारंभामुळे शहरात नव्या नेतृत्वाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी मागास वर्गीय आयोग सदस्य किरण महल्ले, किरण पातुरकर, सभागृह नेते चेतन गावंडे, गटनेते राजेंद्र तायडे, शिक्षण समिती सभापती प्रीती रेवणे, उपसभापती वंदना मडघे, नगरसेवक आशिष अतकरे, बंडु हिवसे, दिपक सम्राट, संजय गव्हाळे, संजय शिरभाते, नगरसेविका पद्मजा कौंडण्य, कल्याणी तायडे, लविना हर्षे, माजी नगरसेवक सुनिल काळे, सचिन रासने, ललीत समदूरकर, माजी नगरसेविका कुसुम साहु, संगीता बुरंगे, गंगा खारकर, सुधा तिवारी, ज्योती सौदिसे, डॉ.मालपे, डॉ.तानकर, नंदकिशोर राठी, प्रकाश देशमुख, नगरसेवक व नगरसेविका तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री संत गजानन महाराज चरित्र कथा सप्ताह



**अमरावती-**गण गण गणात बोते च्या गजरात श्री संत गजानन महाराज चरित्र कथा सप्ताहाचे आयोजन श्री मारुती व विठ्ठल मंदिर संस्थान कुष्टा तालुका अचलपूर येथे आयोजन करण्यात आले आहे.सप्ताहाची सुरुवात सुरू झाली असून कार्यक्रमाची सांगता १४ एप्रिल रोजी करण्यात येणार आहे.या सप्ताहात गजानन महाराज चरित्र ह.भ.प. श्री १०८ स्वामी सुरेश्वरानंदजी महाराज कृष्णाई गौरक्षण अंबोडा तालुका अकोट जिल्हा अकोला यांच्या अध्यात्मिक मार्गदर्शनाचा लाभ भाविक भक्त घेत आहे. टाळ मृदंगाच्या गजरात आरती,भूपाळी, तसेच विविध अध्यात्मिक कार्यक्रम दररोज सुरू असून गावकरी तसेच समस्त भाविक मंडळी श्री संत गजानन महाराज चरित्र कथेचा लाभ घेत आहे.

## शकुंतला बालपांडे यांचे निधन



**शिरजगाव मोझरी-**येथील श्री रामरावजी बालपांडे यांची बहीण स्व. शकुंतला राजारामजी बालपांडे यांचे वयाच्या ९० व्या वर्षी अल्पशा आजाराने शनिवारी, ११ एप्रिल २०२६ रोजी निधन झाले.त्यांच्या पश्चात भाऊ, भावजय, भाचा, सून, नातू-नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.स्व. शकुंतला बालपांडे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार रविवारी, १२ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजता हिंदू स्मशानभूमीत करण्यात आले.यावेळी जनसमुदाय उपस्थीत होता.

## डॉ. भाऊसाहेब देशमुख यांच्या विचार व कार्यातच सामाजिकता-डॉ. स्वप्निल अरसड

### विद्यापीठात सामाजिक सप्ताहनिमित्त व्याख्यान

**अमरावती/का.प्र.**



डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या विचार व कार्यातच सामाजिक समता ठासून भरली होती आणि त्यासाठी ते आयुष्यभर कार्य करीत राहिले, असे प्रतिपादन श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचे भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. स्वप्निल अरसड यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने समता सप्ताह समारोह-२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने १० एप्रिल रोजी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचा सामाजिक समतेचा विचार व कार्य' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रा. प्रफुल्ल कडू, डॉ. पंजाबराव देशमुख अर्थनियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे, विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख अतिथी प्रा. प्रफुल्ल कडू, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण करतांना महामानवांनी समाजासाठी केलेले कार्य अपूर्व असून त्यांच्या विचार व कार्याची सर्वांनी प्रेरणा घ्यावी, तेव्हाच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असेही प्र-कुलगुरू डॉ. ढोरे म्हणाले. डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व मेणबत्ती प्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. याप्रसंगी डॉ. स्वप्निल अरसड यांच्या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. शाल, श्रीफळ व पुस्तक देवून पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकातून डॉ. महेंद्र मेटे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली व पाहुण्यांचा परिचर करुन दिला. सूत्रसंचालन डॉ. संतोष बनसोड यांनी, तर आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी मानले.

व्याख्यान कार्यक्रमाला आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, आजीवन अध्ययन चे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, रा.से.यो. संचालक डॉ. निलेश कडू, सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख डॉ. नितीन फिरके, बायोटेक विभागप्रमुख डॉ. अनिता पाटील, डॉ. प्रेमानंद तिडके तसेच विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, अमरावती शहरातील गणमान्य नागरिक, महिला, पुरुष, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

## आशा भोसले यांना विद्यापीठातर्फे श्रद्धांजली




**अमरावती-**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या तृतीय दीक्षांत समारंभ १९८७ साली संपन्न झाला. या दीक्षांत समारंभामध्ये सुप्रसिद्ध गायिका श्रीमती आशा भोसले यांना डिलीट उपाधीने विद्यापीठाने सन्मानित केले. विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. के.जी. देशमुख यांनी ही उपाधी प्रदान केली.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# डॉ. नीता कचवे, प्राचार्य शारदा गणोरकर, प्रा. पल्लवी यादगिरे वैद्ये सन्मानित

**अमरावती/का.प्र.**



सर्जनशील शब्दवेल साहित्य संघ, पनवेल आणि सर्जनशील पब्लिकेशन, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्व. जिजाबाई प्रभाकरराव चरडे समर्पित राज्यस्तरीय नारीशक्ती सन्मान सोहळा-२०२६ मोठ्या उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला. हा सोहळा पुण्यातील निर्माण अजिंक्यतारा सोसायटी सभागृह, सिंहगड कॉलेजजवळ, वडगाव बुद्रुक पुणे येथे पार पडला.या राज्यस्तरीय सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवर महिलांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये बांधिलकी प्रतिष्ठानच्या अध्यक्ष डॉ. नीता प्रफुल कचवे (अमरावती), प्राचार्या शारदा अरुण गणोरकर (परतवाडा), प्रा.पल्लवी यादगीरे वैद्य(अमरावती) यांना 'सर्जनशील शब्दवेल नारीशक्ती सन्मान २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक आणि स्त्रीशक्ती सक्षमीकरण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. त्याचप्रमाणे बांधिलकी प्रतिष्ठानच्या शिलेदार सुप्रसिद्ध कवयित्री वृषाली वानखडे (अम.)आरती नागपुरे (अम.), वृषाली चोरे (मोर्शी) यांच्या कवितेची निवड करून त्यांचे उत्कृष्ट सादरीकरण करण्यात आले

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. प्रतिभा सराफ तर कार्याध्यक्ष म्हणून अश्विनी निलेश अतकरे उपस्थित होत्या. उद्घाटन म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. मंदा नांदुरकर विशेष अतिथी म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक पुष्पराज गावंडे, तसेच प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक अॅड. नीता प्रफुल्ल कचवे, प्रभाकर चरडे,अक्षरक्रांती फाउंडेशन नागपूर अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध साहित्यिक शंकर घोरसे यांची उपस्थिती लाभली.यावेळी कवयित्री नलिनी विजय पवार यांच्या 'निसर्गछाया' आणि कवी देवेंद्र शं. इंगळेकर यांच्या 'हलूल बेटावरून' या कवितासंग्रहांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच 'मेमसाहब' या स्त्री विषयक कवितांचे विशेष अभिवाचन निरंजन मार्कंडेयवार यांनी सादर करून उपस्थितांची मने जिंकली.यानंतर झालेल्या राज्यस्तरीय कविसंमेलनात महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेल्या कवींनी स्त्रीशक्ती, समाज, निसर्ग आणि समकालीन विषयांवरील कविता सादर केल्या. उपस्थित काव्यरसिकांनी कवितांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सर्जनशील शब्दवेल पनवेल चे संस्थापक अध्यक्ष प्रवीण बोपुलकर तसेच संपूर्ण टीम यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे सोहळा पार पडला.

## संक्षिप्त

### पदव्युत्तर प्राणिशास्त्र विभागातील विद्यार्थीनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत



**अमरावती-**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर प्राणिशास्त्र विभागातील सिया विलास चव्हाण व दिया विलास चव्हाण या जुळ्या भगिनींनी अनुक्रमे ८.८६ आणि ८.८० पॉईंट घेऊन विद्यापीठाच्या उन्हाळी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एस. एस्सी. भाग-२ प्राणिशास्त्र परीक्षेत उत्तीर्ण होऊन गुणवत्ता यादीत अनुक्रमे पाचव्या आणि सहाव्या क्रमांकाने येण्याचा मान मिळविला आहे.यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हेमलता नांदूरकर तसेच शिक्षक विनोद नागले, डॉ. शितल काळे, डॉ. रजनी तायडे, अंकिता पानसरे, अर्पित इंगळे, संपदा जोशी, रचना धुरे, विनय झटाले यांनी अभिनंदन केले आहे. विद्यार्थिनी आपल्या यशाचे श्रेय आईवडील व शिक्षकवृंदांना देतात.

### महात्मा ज्योतिबा फुले जयंती




**लेहगाव-**विद्यानिकेतन इंग्लिश स्कूल,नेरपिंगळाई येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मा.सिद्धांत म. दाभेकर सर व प्रमुख अतिथी म्हणून पायल नंदरधने मॅडम होत्या.तसेच ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त वर्ग १ ते ८ साठी प्रश्नमंजूषा घेण्यात आली त्या मध्ये क्रमांक पटकविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन निकिता संभे यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन रोशनी भालेराव मॅडम यांनी केले तसेच प्रिया झोडगे,श्रध्दा पांडे, अनुराधा मोरस्कर ,सायली इंगळे , मयुरी बुरंगे ,शितल काकस आणि सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच शिर्ला उपरीकर, सुवर्णा पातुरकर उपस्थित होत्या. अशाप्रकारे या कार्यक्रमाला सर्व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### डॉ. पंजाबराव देशमुख यांना अभिवादन



**अमरावती-**पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय येथे शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. तेजस्विनी कबाडे व अर्पिता नीलखन यांनी केले. महाविद्यालयातील प्रथम सत्राचे विद्यार्थी देव वानखडे आणि गायत्री इंगळे यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनावर सविस्तर रूपरेषा सादर केली. त्यांच्या कार्याचा आढावा घेत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुण्यतिथी निमित्त सर्वांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजसेवेचा मार्ग स्वीकारावा असे उदबोधन कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी ध्रुव मोहोड यांनी आभार प्रदर्शन केले.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे, उपप्राचार्य नितेश चौधरी, प्राध्यापकवर्ग तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान सर्वांनी एकत्रितपणे डॉ. पंजाबराव देशमुख यांना विनम्र अभिवादन केले.

### सरस्वती विद्यानिकेतन खानापूर येथे पक्षी संवर्धन प्रदर्शन



**मोर्शी-**खानापूर येथील सरस्वती विद्यानिकेतन शाळेत चिमणी संवर्धनाच्या जनजागृतीसाठी विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.या प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी पक्ष्यांसाठी आकर्षक घरटी व जलपात्रे तयार करून पर्यावरणाबाबतची आपली जाणीव आणि सर्जनशीलता प्रदर्शित केली.या प्रदर्शनाचे उद्घाटन पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे सचिव अशोकराव निमजे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास शाळा समितीचे अध्यक्ष शैलेंद्रजी कानफाडे, सदस्य रमेशचंद्र बंग, सुभाषराव लांडे, मुख्याध्यापक प्रवीण राऊत तसेच सोसायटीचे सदस्य, शिक्षक-शिक्षिका व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रदर्शनामध्ये सुमारे ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून विविध प्रकारची घरटी व जलपात्रे तयार केली. यावेळी इयत्ता नववी 'ब' च्या विद्यार्थिनी कु. हिमानी टाकोडे,आनंदी ठाकरे,श्रेयानी शिरोळे व मानवी गायकवाड यांनी पक्षी संवर्धनाचे महत्त्व स्पष्ट केले.पक्षी कीटकांचे नियंत्रण करून पिकांचे नुकसान कमी करतात,बियांचा प्रसार करून वनस्पतींची वाढ घडवून आणतात,तसेच काही पक्षी परागीकरणात मदत करतात.त्यामुळे पक्षी हे पर्यावरणीय संतुलनाचे महत्त्वाचे द्योतक असल्याचे त्यांनी सांगितले.स्पर्धेत विद्या उईके, नैतिक भोयर,सिद्धांत पाटील,आयुश्री धाकडे, आराध्या खेतखडे, अनन्या गांजरे,परी चिखले,परी बागडे, अनुष्का वानखडे,पूर्वी भोयर,प्रतीक महाले, आनंदी सावरकर, आराध्य गावंडे, अधिवेश वानखडे, धनश्री भगत,समृद्धी अकोलकर,आरुषी चढूकर,शिव सोनवणे, मोहित ताकोडे,सक्षम रेखाते,चैताली वगारे, अनुष्का कडुकर,मयुरी बोराळकर,दुर्गेश्वरी अमरबंशी आदी विद्यार्थ्यांनी आकर्षक नमुने सादर केले.या प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राची राऊत व राधिका भडांगे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.




# 'सूरसम्राज्ञी' आशा भोसले

**भारतीय संगीत क्षेत्रातील 'सूरसम्राज्ञी' आशा भोसले यांचे आज निधन झाले. वयाच्या ९३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आशाताईंची प्रकृती खालावल्यामुळे त्यांना मुंबईतील प्रसिद्ध ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.आज त्यांनी जगाचा निरोप घेतला. आशा भोसले या भारतातील सर्वात लोकप्रिय आणि अष्टपैलू पार्श्वगायिका आहेत. त्यांनी ७ दशकांहून अधिक काळ हिंदी, मराठीसह २० हून अधिक भाषांत १२,००० हून अधिक गाणी गायली आहेत. लता मंगेशकर यांच्या धाकट्या बहीण असलेल्या आशा भोसले यांनी चित्रपट संगीत, गझल, भजन आणि पॉप गाण्यांनी भारतीय संगीतात मोलाची भर घातली आहे.**

## जीवन परिचय:-

आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगली येथे प्रसिद्ध शास्त्रीय गायक आणि अभिनेते पंडित दीनानाथ मंगेशकर यांच्या घरी झाला. लहानपणापासूनच त्यांना संगीताचा वारसा मिळाला.

गायन कारकीर्द: वयाच्या १० व्या वर्षी त्यांनी गायनास सुरुवात केली. १९४८ मध्ये 'चुनरिया' चित्रपटातील गाण्याने पार्श्वगायनात पदार्पण केले. ओपी नय्यर, आर.डी. बर्मन, बप्पी लाहिरी यांच्यासोबत त्यांनी अनेक अविस्मरणीय गाणी दिली.

अष्टपैलू आवाज: शास्त्रीय संगीतापासून ते कॅबरे, गझल आणि पॉप गाण्यांपर्यंत सर्व प्रकारच्या गाण्यांवर त्यांचे प्रभुत्व आहे.

वैयक्तिक जीवन: आशा भोसले यांनी गणपतराव भोसले यांच्याशी लग्न केले होते, त्यानंतर त्यांनी आर.डी. बर्मन यांच्याशी दुसरे लग्न केले.

विशेष माहिती:

माई (चित्रपट): २०१३ मध्ये 'माई' या मराठी चित्रपटातून त्यांनी अभिनय क्षेत्रात पदार्पण केले.

विक्रमी गाणी: अनेकदा त्यांनी आपल्या कारकिर्दीत सर्वाधिक गाणी रेकॉर्ड केल्याचे सांगण्यात येते.

## पुरस्कार आणि सन्मान:-

त्यांना पद्मविभूषण (२००८), दादासाहेब फाळके पुरस्कार (२०००) यांसारख्या अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना अनेक फिल्मफेअर पुरस्कारही मिळाले आहेत.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार (२०२१): महाराष्ट्र सरकारचा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मार्च २०२३ मध्ये प्रदान करण्यात आला.

पद्मविभूषण (२००८): भारत सरकारकडून कला क्षेत्रातील योगदानासाठी देशाचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान.

दादासाहेब फाळके पुरस्कार (२०००): भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मान.

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार (National Awards): 'उमराव जान' (१९८१) आणि 'इजाजत' (१९८६) या चित्रपटांसाठी सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका पुरस्कार.

फिल्मफेअर पुरस्कार (Filmfare Awards): त्यांना आतापर्यंत ७ वेळा फिल्मफेअर पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. तसेच त्यांना फिल्मफेअर जीवनगौरव पुरस्कारही (Life-time Achievement Award) मिळाला आहे.

यश चोप्रा मेमोरियल अवॉर्ड (२०१८): हिंदी चित्रपटसृष्टीतील योगदानासाठी ५ वा यश चोप्रा मेमोरियल अवॉर्ड.

'लता मंगेशकर पुरस्कार: मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र सरकारकडून.

गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड (२०११): सर्वाधिक गाणी (११,००० हून अधिक) गायल्याबद्दल.

Grammy Award Nomination (१९९७): 'Legacy' या अल्बमसाठी नामांकित.

आशा भोसले यांचा आवाज आजही तरुण पिढीला भुरळ घालतो. त्यांच्या अद्वितीय आवाजासाठी आणि गायकीसाठी त्या नेहमीच स्मरणात राहतील. याव्यतिरिक्त, त्यांना अनेक राज्यस्तरीय पुरस्कार, स्क्रीन पुरस्कार आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही सन्मानित करण्यात आले आहे.



# आधुनिक भारताचा आवाज

आठ दशकांहून अधिक काळ चाललेल्या आपल्या असाधारण कारकिर्दीत, भोसले यांनी २० हून अधिक भाषांमध्ये १२,००० हून अधिक गाणी ध्वनिमुद्रित केली आहेत; यामुळे त्या इतिहासातील सर्वाधिक गाणी ध्वनिमुद्रित करणाऱ्या कलाकारांपैकी एक ठरल्या आहेत. तिच्या सुरुवातीच्या काही वर्षांत, तिने कमी बजेटच्या चित्रपटांसाठी गाणी गायली. परंतु आपल्या चिकाटीच्या जोरावर १९५० च्या दशकात त्यांना मोठे यश मिळाले. संगीतकार ओ. पी. नय्यर यांच्यासोबत त्यांनी 'उडे जब जब जुल्फ़ें तेरी' आणि 'आईये मेहरबाँ' यांसारखी गाजलेली गाणी दिली.

१९६० आणि ७० च्या दशकात, आर. डी. बर्मन (ज्यांच्याशी त्यांनी नंतर विवाह केला) यांच्यासोबतच्या अविस्मरणीय सहकार्यामुळे त्यांचे स्थान अधिकच भक्कम झाले. 'दम मारो दम' आणि 'चुरा लिया है तुमने' यांसारख्या कालातीत गाण्यांमधून त्यांच्या गायनातील ही अष्टपैलुत्व स्पष्टपणे दिसून येते. 'पिया तू अब तो आजा' सारख्या गाण्यांपासून ते पॉप, जॅझ आणि डिस्को शैलीतील प्रायोगिक गाण्यांपर्यंतच्या प्रवासात, त्यांना सुरुवातीला 'कॅबरे गायिका' म्हणून एकाच साच्यात (typecast) अडकवले गेले ज्यांचा संबंध अनेकदा पाश्चात्य शैलीशी किंवा 'व्हॅम्प' (नकारात्मक) भूमिकांशी जोडला जात असे. मात्र, पुढे जाऊन त्यांनी 'उमराव जान' चित्रपटातील 'दिल चीज़ क्या




है' या गाण्याद्वारे आपल्या शास्त्रीय गायनातील खोलीने समीक्षकांनाही थक्क केले (यासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला). १९९० च्या दशकात ए. आर. रहमान यांच्यासोबत मोठ्या प्रमाणावर काम करत आणि 'रंगीला रे' सारख्या गाण्यांतून त्यांनी पुन्हा एकदा स्वतःचे नव्याने पुनरुज्जीवन केले. 'इन आँखों की मस्ती' आणि 'ये मेरा दिल' यांसारखी गाणी आजही भारतीय लोकप्रिय संस्कृतीचा अविभाज्य भाग बनून राहिली आहेत.



तरीही, त्यांचा हा प्रवास वादांपासून पूर्णपणे अलिप्त नव्हता. त्यांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात, त्यांची बहीण लता मंगेशकर यांच्याशी होणारी तुलना आणि त्यांच्यात कथित स्पर्धा असल्याचा समज या गोष्टींनी प्रसारमाध्यमांच्या बातम्यांमध्ये अनेकदा वर्चस्व गाजवले; तरीही या दोघींनीही सार्वजनिक स्तरावर एकमेकींबद्दल नेहमीच आदरभाव जपला. तरुण वयातच घर सोडून विवाह करणे (elopement) आणि त्यानंतर झालेला घटस्फोट या घटनांमुळे त्या काळातील रूढिवादी समाजात त्यांच्यावर बरीच चर्चा आणि टीका झाली. पुढे जाऊन, आर. डी. बर्मन यांच्यासोबतची त्यांची वैयक्तिक आणि व्यावसायिक भागीदारीही चर्चेचा विषय ठरली, विशेषतः चित्रपटसृष्टीतील अंतर्गत राजकारणाच्या (industry politics) पार्श्वभूमीवर.

आशा भोसले या आजही कलात्मक लवचिकतेचे प्रतीक म्हणून ओळखल्या जातात.त्यांनी शास्त्रीय परंपरा, बॉलिवूडचे ग्लॅमर आणि जागतिक संगीताचा संगम (fusion) यांच्यात एक दुवा साधला आहे. त्यांचा आवाज केवळ भारतीय चित्रपटसृष्टीला साथ देणारा नव्हता; तर त्याने भारतीय चित्रपटसृष्टीची भावनिक आणि सांगीतिक ओळख घडवण्यात मोलाची भूमिका बजावली.





# संगीतासोबतच खाद्यविश्वातही ठसा

भारतीय संगीत क्षेत्रातील देदीप्यमान तारा आणि कोट्यवधी रसिकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले. काल रात्री त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. केवळ



एक दिग्गज गायिका म्हणूनच नव्हे, तर एक यशस्वी उद्योजिका म्हणूनही त्यांनी जागतिक स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली होती.

### जगभरातील १० देशांत पसरले आहे रेस्टॉरंटचे जाळे

आशा भोसले यांना गायनाइतकीच स्वयंपाकाची आणि नवनवीन पदार्थांची प्रचंड आवड होती. त्यांच्या या आवडीचे रूपांतर पुढे एका यशस्वी व्यवसायात झाले. त्यांनी जगभरातील विविध १० देशांमध्ये 'आशाज' (Asha's) या नावाने भारतीय खाद्यपदार्थांची रेस्टॉरंट्स सुरू केली. या रेस्टॉरंट्सच्या माध्यमातून त्यांनी भारतीय चवीला सातासमुद्रापार पोहोचवले.

एका मुलाखतीदरम्यान आपल्या या प्रवासाचा उलगडा करताना त्यांनी सांगितले होते की, दुबई, लंडन आणि मँचेस्टरमध्ये त्यांचे प्रत्येकी एक रेस्टॉरंट आहे, तर बर्मिंगहॅममध्ये दोन आणि कुवैतमध्ये तब्बल पाच रेस्टॉरंट्स कार्यरत आहेत. याशिवाय दोहा, कतर, बहरीन आणि अबू धाबी यांसारख्या मध्यपूर्वेतील देशांमध्येही त्यांच्या रेस्टॉरंट्सनी खवय्यांच्या मनात स्थान मिळवले आहे.

### मुलाचे स्वप्न आणि मातेचे कौशल्य

आशाजींनी हॉटेल व्यवसायात पाऊल ठेवण्यामागे एक भावनिक कथा दडली आहे. त्यांचा मुलगा आनंद भोसले जेव्हा लहान होता, तेव्हा कामावरून परतल्यावर आशाजी स्वहस्ते त्याच्यासाठी पदार्थ बनवत असत. आईच्या हाताच्या चवीने भारावून गेलेल्या आनंदने तेव्हाच शब्द दिला होता की, 'आई, मी मोठा झाल्यावर तुझ्या नावाने रेस्टॉरंट सुरू करेन आणि तिथे तुझ्या रेसिपीनुसार बनवलेले पदार्थ मिळतील.' मुलाने दिलेला हा शब्द पुढे सत्यात उतरला. आशाजींना 'शेफ कोट' परिधान करण्याची विशेष हौस होती; हा कोट घातल्यावर एखाद्या महागड्या पेहरावापेक्षाही अधिक आनंद मिळतो, असे त्या अभिमानाने सांगत असत.



# 'माईकसमोर गायला उभी राहिले की सगळी दुःखे नाहीशी होतात!'

जगभरातील लोकप्रिय भारतीय गायकांमध्ये आशा भोसले यांचं नाव सर्वात वरती आहे आणि येणारी कित्येक वर्षं ते तसंच असेल ही रसिकांना खात्री आहे.'आशा भोसले: अ लाईफ इन म्युझिक' हे रम्या सरमा लिखित चारित्रपर पुस्तक मंजुल पब्लिशिंग हाऊसच्या अमरिलिसने प्रकाशित केले आहे.आशा भोसले यांचे संगीत आणि गाण्याशी असलेल्या नात्याविषयी,त्यांच्या गृहिणी असण्याविषयी सांगणारा हा सारांश त्यातून घेतला आहे.

आपल्या पुस्तकात रम्या शर्मा म्हणतात,'आशा भोसले जेव्हा घरी असतात - बहुतेकदा स्वयंपाकघरातच जादू करताना दिसतात, स्वयंपाक करताना गाणी म्हणत, तेव्हा त्या टिपिकल मराठी गृहिणी आणि आजी असू शकतात. 'मला माझ्या घराचा अभिमान आहे. मी गाताना कोणीही मला त्रास द्यायला येत नाही, पण त्यानंतर काही गोष्टी करायच्या असतात, जसे की घरी जेवणाचा मेनू प्लॅन करणे.' त्यांनी एकदा म्हटले होते की, त्यांना कामाची प्रेरणा अनेकदा स्वतःच्या घरातून आणि कुटुंबातून मिळते.'

एक कथा अशी आहे की जेव्हा त्या सचिन देव बर्मन यांच्या 'पेइंग गेस्ट' (१९५६) या गाण्यासाठी 'छोड दो आँचल' गाण्याचे रेकॉर्डिंग करत होत्या, तेव्हा 'या गाण्यात मला योग्य भाव व्यक्त करता येत नव्हता. म्हणून सचिन दादांनी मला कल्पना करायला सांगितले की माझा नवरा माझी साडी ओढत आहे आणि मी त्यावर कशी प्रतिक्रिया देईन. त्यामुळे मला लगेचच योग्य भाव सापडला!'

ज्या सहजतेने त्या पडद्यावर गायलेल्या पात्राशी स्वतःचा स्वर जुळवून घेऊ शकल्या, त्यामुळे त्या एक जणू काही संगीतमय गिरगिट बनल्या ! रफ गाईड टू वर्ल्ड म्युझिकचे योगदानकर्ते केन हंट यांनी लिहिले आहे की, त्यांच्या आवाजाचा रंग बदलण्याच्या तिच्या विलक्षण क्षमतेमुळे त्यांचे यश स्पष्ट होते. त्या एक बुद्धिमान, एक मातृभाषा असलेली स्त्री किंवा विचित्रपणे मागे वळून पाहणारी वृद्ध महिला म्हणून पटवून देते.

सुरुवातीला ज्या मातृभाषेत त्या शिकल्या, ती मराठी भाषा सोडून हिंदी भाषेत बदलण्यात त्या यशस्वी झाल्या. गाण्याच्या आनंदासाठी त्यांनी पुरेसे तमिळ आत्मसात केले, 'लिसन अँड लर्न' पुस्तके आणि टेप्समधून इंग्रजी शिकले आणि सत्तरीच्या दशकात असताना गिटार कसे वाजवायचे हे शिकण्यास सुरुवात केली. 'जर तुम्ही दृढनिश्चयी असाल तर तुम्ही कोणत्याही वयात काहीही करू शकता,' असे त्या म्हणतात.

पण चित्रपटसृष्टीत त्यांचे स्थान निर्माण करताना, त्या काळातील धोकादायक गाण्यांच्या पायावर त्यांचे पाय घट्टपणे उभे असताना,अस्वस्थतेचा स्पर्श झाला, असे त्यांनी कबूल केले आहे. 'जेव्हा बोल चांगल्या अर्थाचे नसायचे तेव्हा मला अस्वस्थ वाटायचे. पण सुरांबद्दल नाही, कधीच नाही. शेवटी गाणे हे गाणेच असते. जर मी तवाईफ (गणिका) गाणे गायले तर याचा अर्थ असा नाही की मी ती बनते, बरोबर?'

आणि जेव्हा त्या असे म्हणतात, तेव्हा एक विजयी भावना दिसून येते, 'जे लोक तेव्हा माझ्यावर टीका करायचे तेच लोक आता म्हणतात की मी चांगले गाणे गाते.' आश्चर्याची गोष्ट म्हणजे, 'ज्यांना माझे संगीत तेव्हा आवडले ते माझे रेकॉर्ड खरेदी करण्यासाठी खूप लहान होते. आज ते मोठे झाले आहेत आणि त्यांची मुले ते संगीत ऐकत आहेत आणि मी अजूनही गात आहे!'



### परिस्थितीशी जुळवून घेण्याची अनुकूलता

आशा भोसले यांचा आवाज वगळता, परिस्थितीशी जुळवून घेण्याची अनुकूलता हा नेहमीच त्यांचा सर्वात मोठा प्लस पॉइंट राहिला आहे. जीवन काय देऊ शकते याची जाणीव असल्याने ती येते, असे त्यांचे मत आहे. 'माझी आई म्हणायची की माणूस विहिरीतल्या बेडकासारखा नसावा. जग हे एक विशाल ठिकाण आहे आणि मी स्वतःला नेहमीच त्याची आठवण करून देते.'

आशा एक प्रोफेशनल गायिका.एका मुलाखतकाराला त्यांनी सांगितल्याप्रमाणे, कुटुंबाला आधार देण्यासाठी गाण्याव्यतिरिक्त त्या फार काही करू शकत नव्हत्या. 'मी अभ्यास केलेला नाही, म्हणून मी लेखिका होऊ शकली नाही. मी सुंदर नाही, म्हणून मी अभिनेत्री होऊ शकले नाही. पण मी गाऊ शकते - मी काहीही गाऊ शकते.आणि जेव्हा मी मायक्रोफोनसमोर असते,तेव्हा माझे सर्व दुःख नाहीसे होते. संगीत हा माझा आवडता साथीदार आहे; तो मला कधीही निराश करत नाही. मी सुरुवात केली तेव्हा मी कदाचित खूप भोळी होते आणि हा उद्योग कसा चालतो हे समजणे कठीण होते. पण वाट्याला आलेल्या नकार आणि उपहासामुळे मला पुढे जाण्यास भाग पाडले आणि शेवटी मला यश मिळाले.

### गाण्यांच्या बोलांकडे अधिक लक्ष द्यावे

आशा भोसले यांचे संगीत आता अशा स्वरूपात ऐकायला मिळत आहे ज्याची त्यांना कधीच अपेक्षा नव्हती. रीमिक्स लाटेने संगीतातील सुसंवाद आणि गेयता काढून टाकली आहे; कारण ती आधीच तयार केली गेली होती आणि ती सर्व लय आणि नृत्याच्या मजल्यावरील वातावरणात बदलली आहे. 'रिमिक्स करण्यापासून कोणीही कोणालाही रोखू शकत नाही,' आशा काही वर्षांपूर्वी म्हणाल्या होत्या. 'पण जर तुम्ही रिमिक्स करत असाल तर मूळ गाण्याबद्दल विचारशील रहा; आजकाल लोक गाणी खूप बदलत आहेत. काही रिमिक्स चांगले असतात. व्हिडिओ अनेकदा अश्लील असतात आणि गाण्याचा मूळ अर्थ बदलू शकतात.' पण तेही ठीक आहे. पण मला वाटते की दिग्दर्शकांनी गाण्यांच्या बोलांकडे अधिक लक्ष द्यावे, जेणेकरून ते दृश्यमानतेला आधार देतील. उदाहरणार्थ,मी माझ्या गाण्याचे एक रिमिक्स पाहिले, 'छोड दो आंचल': मुली पँट-शर्टमध्ये होत्या आणि आंचल दिसत नव्हता!'(साभार-म.टा)

**प्राची कुलकर्णी-गरुड**

# सलग १२ तास अभ्यास करून विद्यार्थ्यांची बाबासाहेबांना मानवंदना

## -तक्षशिला महाविद्यालयात आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अंतर्गत दरवर्षीप्रमाणे यंदाही १० एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत महामानव पर्व या भव्य वैचारिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय अमरावती, तक्षशिला महाविद्यालय अमरावती तसेच तक्षशिला महाविद्यालय दारापूर च्या वतीने विविध कार्यक्रम घेण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून रविवार १२ एप्रिल रोजी तक्षशिला महाविद्यालय श्याम नगर येथे आदिवासी फासे पारधी समाजातील विद्यार्थ्यांनी सकाळी ७ ते सायंकाळी ७ या वेळेत सलग १२ तास अभ्यास करून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनोख्या पद्धतीने मानवंदना दिली. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, बहुजन एम्पलॉइज फेडरेशन ऑफ इंडिया, श्री संत तुकडोजी महाराज बहुउद्देशीय शिक्षण संस्था, वाचाल तर वाचाल बहुउद्देशीय विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने बारा तास अभ्यास व रोजगार



व स्वयंरोजगार मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला. या उपक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष कीर्ती अर्जुन, संस्थेचे सचिव डॉ. कमलाकर पायस, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. पी आर एस राव, तक्षशिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माधुरी फुले, उप प्राचार्य प्रा. प्रितेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते कैलास सोनोने, यश इंगोले, प्रा. चरणदास सोळंके , प्रा. दीपक धुरंधर, चंद्रदीप चौधरी, डॉ.रविकांत महिंदकर आदी मान्यवरांनी भेट दिली. यावेळी सहभागी विद्यार्थ्यांशी मान्यवरांनी संवाद साधला. त्यांचे शिक्षणाबद्दलचे प्रेम, भावना, आपुलकी बघून समाधान व्यक्त केले. यावेळी संस्थेच्या अध्यक्ष कीर्ती अर्जुन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की, आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर स्वतःला सिद्ध करावे. शिक्षणासोबतच रोजगारांकडेही लक्ष केंद्रित करावे. स्वयंरोजगार करून नाव मोठे करावे. स्मार्ट वर्क, हार्ड वर्क याचा अवलंब करावा. असे आवाहन त्यांनी केले.

या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रस्टचे सचिव डॉ. कमलाकर पायस, प्रशासकीय अधिकारी डॉ. सचिन पंडित आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. पी. आर. एस. राव यांच्यासह प्राचार्य डॉ.माधुरी फुले, प्राचार्य डॉ. मल्लू पडवळ, डॉ. शुद्धोधन कांबळे, प्राध्यापक प्रितेश पाटील, डॉ. शितलबाबू तायडे, प्राध्यापक गंगाधर पांडे, डॉ.रेखा पर्वतकर, डॉ.रजनी गेडाम, डॉ. प्रकाश मस्के, डॉ. प्रवीण वानखडे, डॉ. यशवंत हरणे, डॉ.नवल पाटील, प्रा. खेमानंद फुलझेले यांच्यासह महाविद्यालयातील पाली विभाग, बुद्धिस्ट स्टडी सेंटर आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत.

# राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना निरोप समारंभ उत्साहात संपन्न

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील राज्यशास्त्र विभागाच्या एम.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या वतीने एम.ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन ६ एप्रिल २०२६ रोजी रमण महर्षी सभागृह तथा डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख सेमिनार हॉल येथे करण्यात आले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास कुलट होते, तर प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. महेंद्र मेटे उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. अंबादास कुलट यांनी विद्यार्थ्यांनी दीपस्तंभाप्रमाणे स्वतः प्रकाशित होत आदर्श नागरिक म्हणून भविष्य घडवावे, असे प्रतिपादन केले. प्रमुख अतिथी डॉ. महेंद्र मेटे यांनी राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांना आयआयटीमधील संशोधन, सोशल सायन्स स्टडीज आदी विविध क्षेत्रांतही उज्ज्वल संधी उपलब्ध



असल्याचे सांगून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संगीता भुयार यांनी केले.

त्यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे योग्य नियोजन करून शैक्षणिक वाटचालीत सातत्य राखावे व महाविद्यालयाच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान द्यावे, असे सांगितले. यावेळी एम.ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी राज्यशास्त्र विभागाला सप्रेम भेट म्हणून स्पर्धा परीक्षा संदर्भातील महत्त्वपूर्ण पुस्तके तसेच साऊंड सिस्टिम प्रदान केली. कार्यक्रमाला राज्यशास्त्र विभागातील डॉ. सचिन पडघम, प्रा. रोषणा उगले तसेच प्रा. अंकुश कडू उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीक्षा डोंगरे यांनी केले. विवेक धाकडे व कादंबरी सरदार यांनी मनोगत व्यक्त केले, तर संस्कृती आंदेव यांनी आभार व्यक्त केले.

एम.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट नियोजनातून हा निरोप समारंभ संस्मरणीय केला.

# सुरक्षा रक्षक व कंत्राटी कर्मचारी सेनेचा मोर्शीत विभागीय मेळावा

**लेहेगाव/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक व कंत्राटी कर्मचारी सेना मोर्शी विभागीय मेळावा दि.१० एप्रिल २०२६ ला श्री साई मंदिर देवस्थान वरुड नगरी मध्ये सपन्न झाला.

कार्यक्रमाला राज्य सचिव रामकृष्ण चिखलकर ,राज्य कार्याध्यक्ष मोहम्मद वासिक, राज्य सदस्य पंकज सोनटक्के,पंकज शिंदे, दिपक वघाळे, मंगेश घुलक्षे, अनिरुद्ध चंदेल, विशाल दाभाडे,अजय पाटील,शैलेश पाटील, अमोल राऊत,सुभाष चौधरी, अनिल गुढधे, अजय राऊत, पंकज



ठाकरे,भुषण शिरभाते, नरेश ढोके, श्रावण काठे, मोहम्मद शारीक,नरेंद्र मसाने,आशिष मानकर, अनिल आमले, संचित फरतोडे, परिक्षीत यावले, मनोज सुर्यवंशी, ज्ञानेश्वर गुंजरकर, निखिल कविटकर, गणेश मोहोड,राहुल राऊत, गजानन कदम, दिनेश कोठे, राजेन्द्र अंतुरकर, रमेश मालपे, राजेन्द्र बेले व इतर सुरक्षा रक्षक कार्यक्रमाला उपस्थित होते. पगार वाढ,पीफ,इसआय बद्दल माहिती व कंत्राटी कामगार व सुरक्षा रक्षक यांच्या हितसंबंधाबद्दल विषयांवर चर्चा करण्यात आली.

# नांदगावात महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी

## -उत्सव समितीने राबविले विविध उपक्रम

**नांदगाव खांडेश्वर/प्रतिनिधीः-** महात्मा ज्योतिबा फुले उत्सव समितीचे अध्यक्ष माजी नगराध्यक्ष अक्षय पारसकर व उत्सव समिती यांच्या वतीने नांदगाव खंडेश्वर येथील माळी पुरा येथे महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव सोहळा विविध कार्यक्रमाच्या आयोजनाने उत्साहात पार पडला. या सोहळ्यात ह भ प श्यामसुंदर महाराज सोन्नर यांचे समाज प्रबोधन पर किर्तन तसेच तालुक्यातील शासकीय सेवेत निवड होऊन विविध विभागात रुजू झालेले विद्यार्थी यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी सर्वप्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष माजी नगराध्यक्ष अक्षय पारसकर, नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर,रावसाहेब रोठे, विठ्ठलराव चांदणे,उमेश महाराज जाधव, चंद्रशेखर महाराज वैद्य, देविदास सुने,माजी नगराध्यक्ष संजय पोफळे, नगरपंचायत गटनेते प्रकाश मारोटकर, आयोजक अभिषेक पारसकर व मित्रपरिवार, योगेश



चवाळे, अविनाश ब्राह्मणवाडे, ओंकार ठाकरे, वासुदेव लोखंडे,रंजीत खंडाळकर, राजेश पाठक, डॉ. भूषण पोतदार, नितीन टाले, आशा पारसकर, कांताबाई लोमटे, शीला वाडेकर, रेखा मारोटकर, विजया लायबर, मंगला जेवडे, वनमला खडसे, रेवती परसनकर, आरती तरेकर,चित्रा गतपणे व महात्मा ज्योतिबा फुले उत्सव उत्सव समिती चे कार्यकर्ते व नागरिकांची उपस्थिती होती.

# भाकप कार्यालयात महात्मा फुले अभिवादन सभा

**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** भारतीय कम्युनिस्ट पक्ष कार्यालय लक्ष्मीकांत मुळे भवन येथे महात्मा फुलेंना ११एप्रिल रोजी अभिवादन करण्यात आले.



महात्मा फुलेंचे द्विशताब्दी जयंती वर्ष असून त्यांनी शेती क्षेत्रातील सावकार शाही ,गुलामगिरीवर प्रचंड प्रहार केला. माणसा माणसांमध्ये दरी निर्माण करणारी जातिव्यवस्था तोडण्याकरीता, जनतेमध्ये जाऊन अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत प्रत्यक्ष कार्य केले. शिक्षणात कोणीही मागे राहू नये ,कोणीही वंचित राहू नये, कोणालाही मज्जाव होऊ नये यासाठी समाज प्रबोधन केले . म्हणून समाज त्यांना महात्मा, समाज सुधारक, आद्य क्रांतिकारक, क्रांतीसुर्य, आद्य शिक्षक या शब्दाने महती सांगतो. अशी माहिती अक्षय नारळे यांनी सदर अभिवादन सभेत दिली. सभेचे सूत्रसंचालन शाखा सचिव देवेंद्र बावणे यांनी केले.

सदर कार्यक्रमाला सिद्धेश तिंतुरकर, ऋषिकेश निंबरते ,राजाभाऊ बाभुळकर, अशोकराव दोंदलकर, आदित्य तिरमारे, भावेश काळबांडे ,दर्शन काळकर, आदित्य ठाकरे ,ओमसिंग चांमरे, प्रसाद काळकर ,पियुष टागोर, वेदांत अंबाडकर, रवींद्र नारळे आदींची उपस्थिती होती.

# 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या अर्जात दुरुस्तीसाठी ३० एप्रिलपर्यंत संधी

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी आणि त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभार्थी महिलांना योजनेच्या अर्जात दुरुस्तीसाठी संधी देण्यात आली आहे. ज्या पात्र महिलांनी अर्ज भरताना कुटुंबातील सदस्यांच्या नोकरी किंवा निवृत्तीवेतनाबाबत नजरचुकीने चुकीची माहिती निवडली होती, त्यांना आता ही चूक सुधारण्यासाठी ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. योजनेच्या निकषानुसार, कुटुंबातील कोणताही सदस्य सरकारी कर्मचारी (नियमित किंवा कंत्राटी) नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेणारा नसावा, अशी अट आहे. मात्र, ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करताना अनेक लाभार्थ्यांकडून या पर्यायाबाबत चुकीची नोंद झाली होती. अशा लाभार्थी महिलांसाठी ऑनलाइन ई-केवायसी मध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील ज्या पात्र महिलांच्या अर्जामध्ये अशा तांत्रिक त्रुटी आहेत, त्यांनी विहित मुदतीत म्हणजे ३० एप्रिल २०२६ पर्यंत आपली माहिती ऑनलाइन पोर्टलवर जाऊन अपडेट करावी. या दुरुस्तीमुळे पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळण्यात येणारे अडथळे दूर होणार असून, कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका अधिक मजबूत होण्यास मदत होईल.

# अंजनगावसुर्जीच्या महिला होणार आत्मनिर्भर

## -जिल्हाधिकाऱ्यांनी साधला प्रशिक्षणार्थ्यांशी थेट संवाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती मार्फत आणि जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या किमान कौशल्य विकास कार्यक्रम (२०२५-२६)अंतर्गत सुरू असलेल्या 'फॅशन डिझायनर' या अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षण बॅचला आज जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी भेट दिली. अंजनगाव सुर्जी येथील रोशनी महिला विकास संस्थेद्वारे संचालित या प्रशिक्षणार्थींसोबत त्यांनी थेट संवाद साधला आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रशिक्षणातून स्वावलंबी होण्याचा मार्ग प्राप्त होतो असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केलेत.

या भेटीदरम्यान जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले की, 'या योजनेचा उद्देश केवळ प्रशिक्षण पूर्ण करणे हा उद्देश नसून, प्राप्त कौशल्याचा वापर करून आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे महत्त्वाचे आहे. रोशनी रेडीमेड गारमेंट फाउंडेशन, एमआयडीसी, अंजनगाव सुर्जी येथे कार्यान्वित करण्यात आलेल्या फेब्रिक क्लस्टरमध्ये प्रशिक्षणार्थ्यांनी रोजगाराच्या संधी मिळवाव्यात आणि स्वतःच्या पायावर उभे होवून सक्षम व्हावे, असा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.

महिलांनी केवळ वस्तूंची निर्मिती करून न थांबता, त्यांच्या मार्केटिंगवर विशेष लक्ष केंद्रित करावे. व्यवसायाचे विस्तारीकरण करण्यासाठी बाजारपेठेची मागणी ओळखून नाविन्यपूर्ण प्रयत्न करणे



आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थींनी केवळ प्रशिक्षणापुरते मर्यादित न राहता, उद्योग उभारणीसाठी पुढाकार घ्यावा. विविध शासकीय योजनांतर्गत उपलब्ध असलेल्या निधीचा आणि सवलतीच्या कर्ज योजनांचा लाभ घेऊन स्वतःचे छोटे-मोठे उद्योग सुरू करावेत व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे, जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले.या विशेष प्रशिक्षण उपक्रमात अल्पसंख्यांक समाजातील महिलांनी नोंदवलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी समाधान व्यक्त केले. समाजातील सर्व स्तरांतील महिला मुख्य प्रवाहात येत असल्याबद्दल त्यांनी कौतुक केले.

हा प्रशिक्षण कार्यक्रम जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून पूर्णतः मोफत राबविला जात आहे. जिल्हा उद्योग केंद्र,अमरावती यांचे निधीतून उभे राहिलेल्या स्थानिक एमआयडीसीमधील फेब्रिक क्लस्टरमध्ये किमान कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना रोजगारासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे.फॅशन डिझायनिंग सारख्या रोजगाराभिमुख कोर्सेसमुळे ग्रामीण भागातील महिलांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. . जिल्हा प्रशासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे अंजनगाव सुर्जी परिसरातील गरजू तरुणांना आणि महिलांना स्थानिक पातळीवरच रोजगाराच्या दर्जेदार संधी उपलब्ध होणार आहेत.

या प्रसंगी जिल्हा कौशल्य विकास विभागाच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर, उपविभागीय अधिकारी राजेश्वर हांडे ,तहसीलदार पुष्पा दाबेराव, संस्थेच्या संचालिका शोभा सुने, आशिष सुने, केंद्रातील प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थी आदी उपस्थित होते.

# मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढवण्यासाठी संपत्ती कर वसुलीवर जोर

## स्वच्छतेसह मूलभूत सुविधांना प्राथमिकता- मनपा आयुक्त वर्षा लड्डा

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेच्या नवनियुक्त आयुक्त वर्षा लड्डा यांनी रविवारी सुट्टीच्या दिवशी आपला पदभार स्वीकारला. त्यानंतर आज सोमवार ६ एप्रिल रोजी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढवण्यासाठी संपत्ती कर वसुलीवर भर दिला जाईल. तसेच स्वच्छता आणि शहरातील मूलभूत समस्यांचे निवारण करण्यासाठी कार्य करण्यात येणार आहे. त्यांनी सांगितले की, सर्वात आधी शहराच्या वस्तूस्थितीचे अध्ययन केले जाईल, त्यानंतर स्वच्छता आणि इतर समस्यांना प्राथमिकता देऊन त्यांचे निवारण करण्यासाठी कार्य करणार आहे. कचऱ्याची विल्हेवाट लावणे ही फक्त मनपाची जबाबदारी नाही. यामध्ये नागरिकांनाही सहकार्य करणे गरजेचे आहे. सोमवारी पहिल्याच दिवशी त्यांनी लोकशाही दिवसामध्ये उपस्थित राहून सर्वांच्या समस्या ऐकल्या. यामध्ये अतिक्रमणाच्या तक्रारी अधिक होत्या. यावर लवकरच निर्णय घेतला जाईल. पत्रकारांनी शहरात वाढणारे अतिक्रमण स्वच्छता, पार्किंग, मनपा संकुल लीज, सुकळी बायोमायनिंग प्रकल्पासह इतर विषयांकडे आयुक्तांचे लक्ष केंद्रित केले. आयुक्तांनी स्पष्ट सांगितले की आधी त्या शहरातील सर्व समस्या जाणून घेतील. त्यानंतर त्या समस्यांचे निकाली काढण्यासाठी काय करायचे आहे ते बघीतले जाईल. महानगरपालिकेचे आर्थिक स्तोत्र वाढवण्यासाठी त्यांचे प्रयत्न राहणार आहे. शहरातील मोठे मॉल ,रुग्णालय यांच्यावर लाखो रुपयांचा संपत्ती कर बाकी आहे. त्यांच्या विरोधात सक्त कार्यवाही करणार आहे. बायोमायनिंग आणि विवाहित निविदा संदर्भात त्यांनी सांगितले की त्या पूर्ण फाईल पाहणार आहेत. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अनुशासनामध्ये राहण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. शहराला प्रदूषणमुक्त करण्यासाठी प्रयत्न करणार असेही त्या म्हणाल्या.

पर्यावरण कडे देणार लक्ष-

त्यांनी सांगितले की, पर्यावरणामध्ये त्यांना जास्त रस आहे. यामुळे पर्यावरणाकडे त्यांचे लक्ष राहणार आहे. पर्यावरण पूरक अमरावती बनविण्यासाठी प्रयत्न केले जाईल, असेही त्यांनी सांगितले. त्यांची पहिली पोस्टिंग उपजिल्हाधिकारी म्हणून झाली होती. यानंतर त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी विविध पदावर कार्य केले. आता अमरावतीमध्ये आयुक्त म्हणून त्यांना जबाबदारी देण्यात आली आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २१५
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांची आज समाजाला खरी गरज-माजी आ. वीरेंद्र जगताप

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** अखंड भारताचे आराध्य दैवत आणि शिक्षणाची दारे खुली करणारे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती आज चांदूर रेल्वे येथे आई सावित्री जयंती उत्सव समिती व शिव, शाहू, फुले, आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने अत्यंत उत्साहात आणि गौरवपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

स्थानिक जुना बस स्टॉप परिसरात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या मूर्तीची स्थापना करून हा सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी आमदार वीरेंद्र जगताप, सुनील मालखेडे व डॉ सागर वाघ,यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी 'महात्मा फुले यांचा विजय असो', 'सत्यशोधक समाजाचा विजय असो' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. 'महात्मा ज्योतिबा फुले यांनी विषमतेविरुद्ध लढा देऊन बहुजन समाजाला शिक्षणाचा अधिकार मिळवून दिला. त्यांनी मांडलेले सत्यशोधक विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत.



केवळ जयंती साजरी न करता, त्यांचे विचार आचरणात आणणे हीच त्यांना खरे अभिवादन ठरेल. असे विचार सावित्रीआई जयंती उत्सव समितीतर्फे ॲड. विशाल भोयर यांनी मांडले.

'त्यानंतर शिरा व मठ्ठा वाटप उत्सव समितीच्या वतीने उपस्थित नागरिक, विद्यार्थी आणि प्रवाशांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाचे शहरात सर्वत्र कौतुक होत आहे. समितीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सामाजिक सलोखा राखत हा जयंती उत्सव मोठ्या थाटात पार पाडला.

या प्रसंगी सावित्रीआई जयंती उत्सव समिती व शिव, शाहू, फुले, आंबेडकर जयंती उत्सव समितीचे सर्व प्रमुख पदाधिकारी, शहरातील प्रतिष्ठित नागरिक, विविध संघटनांचे प्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनील मालखेडे, दिनकरराव पवार, विशाल भोयर, प्रभाकरराव वाघ, जगदीश भाऊ आरेकर, अमोल होले, प्रफुल कोकाटे, परीक्षित जगताप, शिट्टु सूर्यवंशी,अतुल चांडक, हर्षल वाघ, तिखे बापू, रावसाहेब शेळके, श्रीनिवास सूर्यवंशी, अनिस सौदागर, संजय कोल्हे, दत्ता भुयार, राजू लांजेवार, रुपेश पुडके, अमोल ठाकरे, पंकज चर्जन, डॉ कोठेकर,भीमराव पवार, स्वप्निल मानकर, सारंग देशमुख, रितेश शेळके, दीपक दादा सोळंके, जीवन शेळके, अमोल वानखडे, सुनील तांडेकर, विक्रम भैसे,आशिष गावंडे, लखन शेळके, सोनू पंकज मेश्राम, शरद घासले, सक्षम वानखडे, शेख, पवार सर, विनोद भाऊ भोयर व समितीच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# साफल्य विद्यालयात नियतकालिक मूल्यांकन चाचणी परीक्षेला प्रारंभ



**लेहेगाव/प्रतिनिधीः-** साफल्य विद्यालय सावरखेड येथे ११एप्रिल २०२६ ला इयत्ता आठवीचा PAT अंतर्गत मराठी विषयाचा पेपर घेण्यात आला. तसेच इयत्ता नववीचा द्वितीय सत्र परीक्षा अंतर्गत भाषेचा पेपर घेण्यात आला. यावेळी अखिल भारतीय मोर्शी तालुका ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष कैलाशसिंग ठाकूर यांनी परीक्षा केंद्राला अचानक भेट देऊन परीक्षार्थी विद्यार्थी विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांना परीक्षा सुरळीत चालू असल्याचे निदर्शनास आले. परीक्षा केंद्राला भेट दिल्याबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत आजनकर यांनी पुष्पगुच्छ देऊन पत्रकार कैलाससिंग ठाकूर यांचे आभार मानले.

# भल्या पहाटे एसपी अर्चित चांडक यांची गोवंश तस्करांवर थेट 'सर्जिकल स्ट्राईक'

## » ३२ गोवंशांची सुटका, १३.७७ लाखांचा मुद्देमाल जप्त; अकोल्यात खळबळ





" अकोला शहरात गोवंश तस्करी किंवा कत्तलीसाठी वाहतूक करणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. अशा प्रत्येक प्रकरणात कठोर कायदेशीर कारवाई करून गोवंश तस्करीचे संपूर्ण जाळे मुळापासून उध्वस्त केले जाईल.

**- अर्चित चांडक,**
पोलिस अधीक्षक अकोला

• अकोला | प्रतिनिधी •

शहरातील गोवंश तस्करी व अवैध कत्तलीच्या साखळीला चिरडून टाकण्यासाठी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी अक्षरशः रणांगणात उतरून भल्या पहाटेच सर्जिकल स्ट्राईक केला. 'ऑपरेशन प्रहार'च्या नावाखाली राबविण्यात आलेल्या या कारवाईने अकोल्यातील गोवंश तस्करांचे धाबे दणाणले असून, पोलिसांच्या या आक्रमक भूमिकेमुळे संपूर्ण यंत्रणा एकदम सतर्क झाली आहे.

रामदास पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर गोवंश कत्तलीसाठी जनावरे आणली जात असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच एसपी अर्चित चांडक यांनी कोणतीही दिरंगाई न करता स्वतः कारवाईची सूत्रे हाती घेतली. त्यांनी अकोला शहर उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख पोलीस निरीक्षक शंकर शेळके, रामदास पेठचे पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांची विशेष पथके तयार करून थेट घटनास्थळी धडक दिली.

पहाटेच्या सुमारास मच्छी मार्केट कत्तलखाना परिसरासह सात ठिकाणी एकाच वेळी छापे टाकत पोलिसांनी गोवंश तस्करांना अक्षरशः गाफील पकडले. निर्दयतेने बांधून ठेवलेले गाय, गो-हे व कालवड असे एकूण ३२ गोवंश जनावरे पोलिसांनी ताब्यात घेत त्यांची सुटका केली. या जनावरांची किंमत तब्बल १३ लाख ७७ हजार रुपये इतकी आहे.

या कारवाईत आरोपी अब्दुल रहीम कुरेशी (५ गोवंश - २.३६ लाख), जावेद खान कुरेशी (५ गोवंश - २.७० लाख), मोहम्मद मोसीन (५ गोवंश - २.१५ लाख), फिरोज कुरेशी (२ गोवंश - १.०५ लाख), शहजाद उर्फ सज्जु कुरेशी (५ गोवंश - १.७४ लाख), शेख फैयाज (५ गोवंश - २.१५ लाख) आणि शेख मोबीन (५ गोवंश - १.६२ लाख) यांना लक्ष्य करण्यात आले. त्यांच्या ताब्यातील जागांवरून जनावरे जप्त करून रामदास पेठ पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

एसपी अर्चित चांडक यांनी स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून प्रत्येक पथकाला दिशा दिली, हालचालींवर बारकाईने नजर ठेवली आणि कारवाईची प्रत्येक कडी स्वतः सांभाळली. त्यांच्या नेतृत्वाखालील या आक्रमक धाडीमुळे पोलिसांची कार्यक्षमता पुन्हा अधोरेखित झाली आहे.

या संपूर्ण ऑपरेशनमध्ये अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, पोलीस निरीक्षक शंकर शेळके (स्थानिक गुन्हे शाखा), पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे (रामदास पेठ), सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक गोपाल जाधव, माजिद पठाण, विष्णु बोडखे, रत्नदीप पळसपगार, निलेश गायकवाड, प्रदीप जोगदंड यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखा, रामदास पेठ पोलीस ठाण्याचे अधिकारी-कर्मचारी आणि आरसीपी पथकाने सहभाग नोंदविला. सुटका करण्यात आलेल्या सर्व गोवंश जनावरांना तत्काळ म्हैसपूर येथील आदर्श गौसेवा संस्थेत दाखल करून त्यांच्यावर उपचार व देखभाल सुरू करण्यात आली आहे.

या धडाकेबाज कारवाईमुळे अकोल्यातील गोवंश तस्करांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांच्या या 'प्रहार'ने अवैध धंद्यांना जबर धक्का बसल्याचे चित्र आहे.

# आयपीएल क्रिकेट सट्ट्यावर पोलिसांचा कारवाई !



## » दोन जुगाऱ्यांना अटक
## » ३४ हजारांचा मुद्देमाल जप्त
## » फरार बुकींचा शोध सुरू

• अकोला | प्रतिनिधी •

आयपीएल क्रिकेट सामन्यांवर ऑनलाईन सट्टा लावणाऱ्यांवर अकोला पोलिसांनी 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत कारवाई करत दोन जणांना रंगेहाथ अटक केली. या कारवाईत पोलिसांनी तब्बल ३४ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून फरार बुकींचा शोध सुरू आहे.

पोलीस स्टेशन रामदासपेठ येथील तपास पथकाला ११ एप्रिल रोजी गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार रात्री सुमारे ८.३० वाजताच्या सुमारास देशमुख फैल परिसरातील एफ.सी.आय. गोडावूनलगत मोकळ्या जागेत छापा टाकण्यात आला. यावेळी आरोपी शुभम कैलास थोरात (वय ३०, रा. बाबा रायटर चाळ, अकोला) व शिवमोहन उर्फ भोला हरीमोहन यादव (वय ३६, मूळ रा. वरवट बकाळ, जि. बुलढाणा, सध्या रा. अकोला) हे मोबाईलच्या माध्यमातून व्हॉट्सअॅपवर आयपीएल सामन्यावर (CSK विरुद्ध DD) ऑनलाईन सट्टा खेळताना आढळून आले.

पोलिसांनी तात्काळ दोघांना ताब्यात घेत त्यांच्या जवळून दोन मोबाईल फोन व रोख रक्कम असा एकूण ३४,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. चौकशीत आरोपींनी सट्टा व्यवहाराशी संबंधित मोहित शर्मा व हर्षल चाळसे (दोघेही रा. अकोला) यांची नावे उघड केली असून ते सध्या फरार आहेत.

या प्रकरणी रामदासपेठ पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार अधिनियमाच्या कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा क्रमांक ३१४/२६ दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. पी. रेड्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे यांच्या नेतृत्वात पार पडली. या मोहिमेत प्रदीप जोगदंड, निलेश गायकवाड, दादाराव टापरे, श्याम मोहळे, अनिल थनभर, इमाम चौधरी, माधुरी लाहोळे, अभिजित इंगळे, प्रेम नांदोकार आदींचा सहभाग होता.

### सट्टेबाजावंर पोलिसांची करडी नजर

अकोल्यात आयपीएल दरम्यान सट्टेबाजीला ऊत आला असून पोलिसांनी 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत मोहीम अधिक तीव्र केली आहे. ऑनलाईन सट्टा खेळणाऱ्यांवर पोलिस प्रशासनाची करडी नजर असून सटोडीयांवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# कचरा शुल्कावरून अकोल्यात विरोधकांचा हल्लाबोल

## » घंटागाडी सेवेत त्रुटींचा आरोप » ६०० रुपयांच्या प्रस्तावाविरोधात नगरसेवकांचे घरपोच आंदोलन



• अकोला | प्रतिनिधी •

अकोला महानगरपालिकेकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या कचरा घंटागाडी शुल्काविरोधात शहरातील विरोधकांनी आक्रमक भूमिका घेत सत्ताधाऱ्यांविरोधात जोरदार आंदोलन छेडले. प्रत्येकी ६०० रुपये शुल्क लादण्याच्या निर्णयाविरोधात काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी आणि शिवसेना (उबाठा) पक्षाच्या नगरसेवकांनी थेट सत्ताधारी नगरसेवकांच्या घरांवर जाऊन निषेध नोंदविला.

या आंदोलनात काँग्रेस गटनेते डॉ. जिशान हुसेन, वंचित बहुजन आघाडीचे गटनेते निलेश देव, शिवसेना (उबाठा) गटनेते विजय इंगळे यांच्यासह प्रिया अश्विन शिरसाट, जैनब बी शेख इब्राहिम, मोईन खान, शेख अब्दुल्ला, निलोफर खान, सोहेल खान, आकाश कवडे, आजाद खान, शंकर लंगोटे, मोहम्मद शारिक, शेख शमशू, गुड्डू पठाण, पराग गवई, जयश्री बहादुरकर, उज्वला पाटोळे आदी नगरसेवक सहभागी झाले होते. त्यांनी महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती तसेच भाजपच्या नगरसेवकांच्या घरांवर जाऊन निवेदनांच्या प्रती दिल्या. शहरातील कचरा व्यवस्थापन पूर्णपणे कोलमडले असून घंटागाड्या वेळेवर येत नाहीत, रस्त्यांवर कचरा साचत आहे आणि नागरिक त्रस्त आहेत, अशी टीका विरोधकांनी केली. अशा परिस्थितीत नागरिकांकडून ६०० रुपयांची सक्तीने वसुली करणे म्हणजे जनतेची लूट असल्याचा आरोपही करण्यात आला. सेवा आधी द्या, नंतरच शुल्क घ्या, अन्यथा एक रुपयाही देणार नाही, असा इशारा विरोधकांनी दिला. राज्यातील इतर महानगरपालिकांमध्ये अशी सक्ती नसताना अकोल्यातील नागरिकांवरच आर्थिक बोजा टाकण्याचा प्रयत्न होत असल्याचा सवालही उपस्थित करण्यात आला.

दरम्यान, १३ एप्रिल रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव मंजूर करण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही विरोधी पक्षांनी दिला. जनतेवर अन्याय केल्यास प्रत्येक घरासमोर आंदोलन करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# 'स्टार्टअप मॅनेजमेंट' या विषयावर अतिथी व्याख्यान संपन्न




• नांदुरा रेल्वे | प्रतिनिधी •

स्थानिक श्री पुंडलीक महाराज महाविद्यालय नांदुरा रेल्वे जि. बुलढाणा येथील वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेच्या वतीने प्राचार्य डॉ. करमसिंह राजपूत व विभाग प्रमुख प्रा. राहुल माहुरे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्टार्टअप मॅनेजमेंट' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील जेष्ठ प्राध्यापक इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. दादाराव गायकवाड होते. तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. एच. एन. सिन्हा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. रोनिल आहाळे होते. याप्रसंगी विचार पिठावर मराठी भाषा विभाग प्रमुख प्रा. अनंता लाहुडकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परियच प्रा. राहुल माहुरे यांनी करुन दिला.

प्रमुख वक्ते म्हणुन बोलतांना डॉ. रोनिल आहाळे यांनी सांगीतले की, आजच्या युगात 'स्टार्टअप' हा शब्द आपल्या चांगलाच परिचयाचा आहे. कुणी मोबाइल अॅप सुरू केले, कुणी ऑनलाइन सेवा सुरू केली, कुणी नाविन्यपूर्ण उत्पादन बाजारात आणले. असे आपण नेहमी ऐकतो पण स्टार्टअप म्हणजे फक्त एक चांगली कल्पना नव्हे तर ती कल्पना व्यवस्थापनाच्या चौकटीत बसवून तिचे यशस्वी व्यवसायात रूपांतर करण्याची कला म्हणजे स्टार्टअप होय.

स्टार्टअप मॅनेजमेंटचे चार स्तंभ आहेत योग्य कल्पना आणि समस्येची ओळख, मर्यादित संसाधने, टिम व्यवस्थापन आणि ग्राहकांचा फिडबॅक विद्यार्थी म्हणून तुमच्याकडे सर्वात मोठी संपत्ती आहे ती म्हणजे वेळ, उर्जा आणि नवीन शिकण्याची तयारी. स्टार्टअप मॅनेजमेंट ही कोणतीही कठीण संकल्पना नाही तर शिस्तबद्ध प्रयोगशीलता, ग्राहक केंद्रितता आणि संघभावना यांचा मेळ आहे. तुमची एक लहानशी कल्पना योग्य व्यवस्थापनाच्या जोरावर उद्याचा मोठा ब्रँड बनू शकते. फक्त सुरुवात करा. लहान पाऊल टाका, पण टाका.आपण सर्वजण 'नोकरी शोधणारे' न राहता 'रोजगार निर्मिती करणारे' बनूया. असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. राम ढोरे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. विनोद वेरुळकर यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# कोटींचा महसूल देणारा वीटभट्टी उद्योग तेल्हाऱ्यात उपेक्षितच!

## » खारपाणपट्ट्यातील शेतकऱ्यांचा जोडधंदा अडचणीत; शासनाच्या दुर्लक्षावर संताप



" "वीट उत्पादकांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी लवकरच शिष्टमंडळासह महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेणार आहोत. उद्योगाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू हेत,"

**— प्रशांत मेहेंगे,**
प्रदेश सचिव, भाजयुमो महाराष्ट्र



**वीट उत्पादकांच्या प्रमुख मागण्या**

- वीटभट्टी उद्योगासाठी विमा संरक्षण योजना लागू करावी
- मजुरांकडून होणाऱ्या फसवणुकीविरोधात कठोर कायदा करावा
- महसूल देणाऱ्या उद्योगाच्या समस्या तातडीने सोडवाव्यात
- सुलभ कर्ज सुविधा बँकांमार्फत उपलब्ध करून द्यावी



" उद्योजकांची भावना
"कोटींचा महसूल देऊनही शासनाकडून कोणतीही मदत मिळत नाही. उद्योग टिकवण्यासाठी सुरक्षा कवच व आर्थिक सहाय्य अत्यावश्यक आहे,"

**— दयाल सिंह बलोदे,**
वीट उत्पादक, मनात्री

• तेल्हारा | प्रतिनिधी •

तेल्हारा तालुक्यातील मनात्री, अडसूळ, पंचगाव, सांगवी, उमरी, अकोट मार्ग, दापूरा ते निंबोळी फाटा परिसर हा खारपाणपट्ट्यात मोडत असल्याने शेतीसाठी मर्यादित साधने उपलब्ध आहेत. परिणामी, शेतकऱ्यांना वर्षातून एकच पीक घेता येत असल्याने उत्पन्नाचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. या परिस्थितीत अनेक शेतकऱ्यांनी पर्याय म्हणून वीटभट्टी उद्योग उभारला. मात्र, आज हा उद्योगच विविध अडचणींच्या विळख्यात सापडला असून शासनाच्या दुर्लक्षामुळे उद्योजकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

तेल्हारा तालुक्यातील वीटभट्ट्यांमधून महसूल विभागाला दरवर्षी कोटींच्या घरात उत्पन्न मिळत असतानाही या उद्योगाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. शासनाकडून कोणतेही ठोस धोरण, संरक्षण किंवा सुविधा उपलब्ध नसल्याने उद्योग चालवणे कठीण होत चालले आहे. वीटभट्टी व्यवसायामुळे स्थानिकांसह मध्यप्रदेशातून येणाऱ्या मजुरांना तसेच आदिवासी बांधवांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध झाला आहे. यासोबतच वाहतूक व्यवसायालाही चालना मिळाली आहे. असे असतानाही या उद्योगाला कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत, विमा संरक्षण किंवा सुलभ बँकिंग सुविधा मिळत नसल्याने व्यावसायिक हवालदिल झाले आहेत.

नैसर्गिक आपत्ती, अवेळी पाऊस, बदलते हवामान आणि प्रशासनाचा वाढता दबाव यामुळे वीटभट्टी उद्योग दिवसेंदिवस तोट्यात जात असल्याचे चित्र आहे. शासनाकडून ना मदत, ना संरक्षण—अशा परिस्थितीत हा उद्योग टिकवणे अवघड बनले आहे.

विशेष म्हणजे, वीटभट्टी धारक केवळ व्यवसायापुरते मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांमध्ये पुढाकार घेतात. मंदिर बांधकामासाठी वीट पुरवठा करणे, सामाजिक कार्यात आर्थिक मदत करणे अशा माध्यमातून ते समाजाशी नाते जपतात. तरीही शासनाकडून या उद्योगाला अपेक्षित मान्यता व पाठबळ मिळत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

वीटभट्टी उद्योगाला योग्य संरक्षण व सुविधा मिळाल्यास केवळ उद्योगच नव्हे, तर शासनाचा महसूलही वाढण्यास मदत होईल. त्यामुळे शासनाने या उद्योगाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# शेतकऱ्यांच्या वाटेवर बुलडोझरचा घाला!



## » मोराळी–हिवरखेड शिवार रस्ता बंद
## » प्रशासनाची पाहणीच सुरू

• हिवरखेड | प्रतिनिधी •

मोराळी ते हिवरखेड शिवारातील महत्त्वाचा शेतरस्ता जेसीबीने खोदून बंद केल्याच्या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. वर्षानुवर्षे वापरात असलेली ही वहिवाट अचानकपणे अडवण्यात आल्याने शेतीकामावर थेट परिणाम होत असून प्रशासनाकडून केवळ पाहण्या आणि बैठकींचाच 'देखावा' सुरू असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

राजेश गोपाळराव गावंडे यांच्या सर्वे क्रमांक १६ मधील शेताकडे जाणारी ही पारंपरिक वाट अनेक वर्षांपासून कोणत्याही वादाविना सुरू होती. मात्र काही दिवसांपूर्वी एका शेतकऱ्याने मनमानी करत जेसीबीच्या सहाय्याने रस्ता खोदून टाकत पूर्णपणे बंद केला. परिणामी, गावंडे यांच्यासह इतर शेतकऱ्यांना शेतात जाणे अशक्य झाले असून उन्हाळी पिकांच्या कामावर मोठा परिणाम झाला आहे.

या प्रकाराविरोधात संतप्त झालेल्या गावंडे यांनी २७ मार्च २०२६ रोजी गळफास आंदोलनाचा इशारा दिला होता. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत तेल्हारा तहसील प्रशासनाने हस्तक्षेप करत आंदोलन तात्पुरते मागे घेण्यास भाग पाडले. तसेच १ एप्रिल रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून न्याय देण्याचे आश्वासन देण्यात आले. निर्धारित दिवशी तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, तक्रारदार व विरोधी पक्षकार यांच्या उपस्थितीत शेतात पाहणी करण्यात आली. दोन्ही बाजूंची मते ऐकून संबंधितांना तहसील कार्यालयात समज देण्यात आली. मात्र, या सर्व प्रक्रियेनंतरही प्रत्यक्षात रस्ता अद्याप मोकळा करण्यात आलेला नाही.

शेतात जाण्याचा एकमेव मार्ग बंद असल्याने शेतकरी अक्षरशः हवालदिल झाले असून शेती धोक्यात आली आहे. प्रशासनाच्या विलंबामुळे परिस्थिती आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अधिकृत सूत्रांकडून "लवकरच प्रश्न मार्गी लागेल" असे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात ठोस कारवाईचा अभाव असल्याने शेतकऱ्यांचा संताप वाढत आहे.

दरम्यान, "पाहणीपुरतीच कारवाई आणि न्यायाचा केवळ दिखावा" असा सवाल आता शेतकरी उघडपणे विचारू लागले आहेत. शेतकऱ्यांच्या हक्काच्या वाटेवर बुलडोझर चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई कधी होणार? तहसील प्रशासन केवळ आश्वासनांपुरतेच मर्यादित राहणार का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. हिवरखेड परिसरात हा मुद्दा चांगलाच तापला असून, प्रशासनाने तात्काळ ठोस निर्णय घेतला नाही, तर पुन्हा तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा शेतकऱ्यांकडून देण्यात येत आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र.४१,४२, श्रीकांत नगर, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला -४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १२९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय : अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन : ९८२३०१६३०० | ९४२२९५६२६८
email : atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# शेतकऱ्यांच्या धान्याला फक्त हमी भाव द्या !

## भारत कृषक समाजाची भाऊसाहेबांच्या पुण्यतिथी निमित्त शासनाकडे मागणी



• अकोला | प्रतिनिधी •

गेल्या अनेक वर्षापासून शेतकऱ्यांसाठी राज्य सरकार, केंद्र सरकार अनेक योजनांची घोषणा करते. हजारो कोटीच्या वेगवेगळया कामांना मंजूरी देते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या नाही पाहिजे म्हणून बऱ्याच उपाययोजना आखल्या जातात परंतु शेतकऱ्यांसाठी सर्वात महत्वाची असलेली हमी भावाची मागणी याबद्दल कोणीच काही बोलत नाही शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी लागणाऱ्या प्रत्येक वस्तुच, मजुरीची किंमत दरवेळेस वाढत असते परंतु त्या दृष्टीने शेतकऱ्यांच्या मालाला कधीच वाढीव भाव मिळत नाही त्याला आपला माल कमी किंमतीत विकावा लागतो. त्याला या बाबतीत कुठल्याही सरकारचे संरक्षण मिळत नाही. हमी भावाबद्दल कोणीच काही बोलत नाही. वर्षानुवर्षे शेतकरी घाटयातच शेती करीत आहे. म्हणून आता सरकारने शेतकऱ्यांसाठी त्यांच्या प्रत्येक पिकाला हमी भावाची गॅरंटी द्यावी अशी मागणी पंजाबराव देशमुख त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त्य आयोजित भारत कृषक समाज महाराष्ट्राच्या बैठकीत उपस्थित सदस्यांनी केली तेव्हा चेअरमन डॉ.प्रकाश मानकर यां याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री, महसुल मंत्री व कृषी मंत्री यांना पाठवून त्याचा पाठपुरावा करण्याचे अश्वासन दिले. तेव्हा उपस्थित सदस्य शेषराव पाटील चिखलीकर, राजेन्द्र माहोरे, डॉ. सुधीश पाटील, डॉ. किरण ठाकरे, दिलीप पाटील, अनिल चतरकर, श्रीकृष्ण गावंडे, वासुदेव गावंडे, माधव भारसाकळे, सारंग बढे, या सर्वांनी भाऊसाहेबांच्या फोटोला हारार्पण करून अभिवादन केले.

# प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांचे निधन

**मुंबई जनमाध्यम :** भारतीय संगीत क्षेत्रातील दिग्गज व बहुमुखी प्रतिभेच्या धनी असलेल्या गायिका आशा भोसले यांचे निधन झाले आहे. वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने संगीतविश्वावर शोककळा पसरली आहे.



शनिवारी संध्याकाळी त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने मुंबईतील ब्रीच कँडी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांकडून उपचार सुरू असतानाही प्रकृतीत सुधारणा झाली नाही. अखेर अवयव निकामी झाल्याने त्यांचे निधन झाले. भारतरत्न लता मंगेशकर यांच्या समवेत आशा भोसले यांनी भारतीय संगीतसृष्टीला सुवर्णकाळ दिला. हिंदी, मराठीसह विविध भाषांमध्ये त्यांनी हजारो गाणी गाऊन रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. त्यांच्या आवाजातील बहार, लयबद्धता आणि अभिव्यक्ती ही त्यांची खास ओळख होती. त्यांचे पार्थिव आज सकाळी ११ वाजल्यापासून लोअर परळ येथील निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. दुपारी ४ वाजता शिवाजी पार्क येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. दरम्यान, त्यांचे सुपुत्र आनंद भोसले यांनी आईच्या निधनाची माहिती दिली असून, संगीत क्षेत्रातील या महान व्यक्तिमत्त्वाला अखेरचा निरोप देण्यासाठी चाहत्यांनी मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

---

ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांच्या निधनाची बातमी समजताच देशभरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या जाण्याने भारतीय संगीतसृष्टीतील एक सुवर्णपान कायमचे हरपले, अशी भावना खासदार अमर काळे यांनी व्यक्त केली. आशा भोसले यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि बहारदार आवाजाने अनेक दशकं रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. हिंदी, मराठीसह विविध भाषांमध्ये त्यांनी साकारलेली गीते आजही श्रोत्यांच्या मनात घर करून आहेत. त्यांच्या प्रत्येक गाण्यातील भावस्पर्शी अभिव्यक्ती ही त्यांच्या कलेची खरी ओळख होती, असेही काळे म्हणाले. त्यांच्या निधनामुळे संगीतविश्वाची मोठी हानी झाली असून, ही पोकळी कधीही भरून न निघणारी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, अशी प्रार्थना करत त्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

**खा.अमर काळे,** वर्धा लोकसभा

# किशोरवयीन मुलीचे आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी शासनाचा प्रयत्न

## एचपीव्ही लसीकरणातून गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचा धोळा टळणार

**वर्धा/जनमाध्यम**

अलीकडील काळात महिलांमध्ये मुख गर्भाशयाच्या कर्करोगाच्या प्रमाणात मोठी वाढ दिसून येत आहे. या आजारावर नियंत्रण आणण्यासाठी एचपीव्ही लस हा प्रतिबंधात्मक उपाय आहे. यासाठी जिल्ह्यातील १४ वर्ष पुर्ण झालेल्या व १५ वर्ष पुर्ण केलेली नाहीत, अशा मुलींना एचपीव्ही लस देण्याची मोहिम सुरु करण्यात आली आहे. यामुळे किशोरवयीन मुलींना गर्भाशय कर्करोगांपासुन मुक्ती मिळणार आहे.

आजच्या किशोरवयीन मुली उद्याच्या प्रगत भारताच्या सशक्त महिला म्हणून पुढे येणार आहेत. सुरक्षित मातृत्व, माता व बाल मृत्यू रोखणे या हेतूने शासन विविध योजनाही राबवित आहे. सद्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगाला वेळीच आळा घालण्यासाठी व महिलांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याकरिता आरोग्य विभागाच्यावतीने 'लस आपल्या लेकीची, सुरक्षा तिच्या भविष्याची' या मोहिमेंतर्गत एचपीव्ही लसीकरण उपक्रम राबविला जात आहे. एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ जिल्हा सामान्य रुग्णालय येथे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ यांच्या हस्ते महिला दिनाचे औचित्य साधून करण्यात आला.

जिल्ह्यातील सुमारे ९ हजार ८३३ किशोरवयीन मुलींना संबंधित लस देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. शिवाय किशोरवयीन मुलींनी स्वयंस्फूर्तीने ही लस घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले आहे. आतापर्यंत ४७२ मुलींनी लस घेतली आहे. एचपीव्ही लसीकरण मोहिमेदरम्यान १४ वर्ष पुर्ण झालेल्या; मात्र १५ वर्ष पुर्ण न झालेल्या किशोरवयीन मुलींना गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण देण्यासाठी एचपीव्हीचे मोफत लसीकरण केले जात आहे.



### लसीकरणाचे फायदे काय

गर्भाशय मुखाचा कर्करोग हा भारतातील महिलांमध्ये आढणारा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात सामान्य कर्करोग आहे. एचपीव्ही लस या आजाराला प्रतिबंध करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. शिवाय लस ९० टक्क्यांहून अधिक संरक्षण प्रदान करते. ही लस सर्व शासकीय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि जिल्हा सामान्य रुग्णालयात पुर्णपणे मोफत उपलब्ध आहे. ही लस जागतिक आरोग्य संघटनेद्वारे प्रमाणित असून पुर्णपणे सुरक्षित आहे. लसीकरणानंतर काही मुलींना सौम्य ताप किंवा इंजेक्शनच्या जागी सूज येऊ शकते. ही सूज दोन ते तीन दिवसांत बरी होते.

### लसीकरणासाठी पात्रता

ज्या मुलींनी वयाची १४ वर्षे पुर्ण केली आहेत परंतु १५ वर्ष पूर्ण केली नाहीत, अशा सर्व मुली लसीकरणास पात्र आहे. लसीकरणासाठी पालकांनी आपल्या मुलींची नोंदणी केंद्र सरकारच्या यू-विन पोर्टलवर किंवा जवळच्या आरोग्य केंद्रात जाऊन करावी. किशोरवयीन मुलीस लसीकरणासाठी पालकांची संमती आवश्यक आहे.

### जिल्ह्यात ९८३३ लसीकरणाचे उद्दिष्ट

जिल्ह्यात ९ हजार ८३३ पात्र मुलींचे एचपीव्ही लसीकरण करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी आतापर्यंत ४७२ मुलींचे लसीकरण करण्यात आले आहे. त्यात आर्वी तालुक्यात ८८ मुलींचे, आष्टी ४९ मुली, देवळी ६२ मुली, हिंगणघाट ४६ मुली, कारंजा ३४ मुली, समुद्रपुर ३८ मुली, सेलू ३७ मुली तर वर्धा तालुक्यातील ११८ मुलींचे एचपीव्ही लसीकरण करण्यात आले आहे.

# वर्धा येथून हावडा-कुर्ला एक्स्प्रेसमधून २३ किलो गांजा जप्त



**वर्धा/जनमाध्यम**

रेल्वेच्या वेगवान धावत्या रेषांवरून सुरू असलेल्या अमली पदार्थांच्या काळ्या खेळाला अखेर पोलिसांनी जबर धक्का दिला आहे. हावडा-कुर्ला एक्स्प्रेसमधून तब्बल २३ किलो ५१० ग्रॅम गांजा जप्त करत रेल्वे पोलिसांनी मोठा भंडाफोड केला. या अमली पदार्थाची अंदाजे किंमत ३ लाख ४८ हजार २६० रुपये इतकी असल्याचे समोर आले आहे.

लोहमार्ग नागपूर पोलीस नियंत्रण कक्षाकडून मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही धडक कारवाई करण्यात आली. एक्स्प्रेसच्या ए-१ कोचमधील बर्थ क्रमांक ४३ आणि ४५ खाली संशयास्पद स्थितीत दोन बेवारस ट्रॉली बॅगा आढळल्या. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत तपासणी केली असता, त्या बॅगमध्ये १० ते १२ पॅकेट्समध्ये नीट पॅक केलेला गांजा सापडला. पंचनाम्यावेळी नायब तहसीलदार अजय धर्माधिकारी, रेल्वे पोलीस निरीक्षक पंकज ढोके, उपनिरीक्षक अंगद कोतवाड, नितीन कुमार जाधव यांच्यासह पोलीस कर्मचारी व पंच उपस्थित होते. संपूर्ण कारवाईत एक ग्रे-सिल्व्हर आणि एक गडद हिरव्या रंगाची ट्रॉली बॅग जप्त करण्यात आली.या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथक रवाना करण्यात आले आहे. लवकरच आरोपीला अटक केली जाईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. ही कारवाई लोहमार्ग नागपूरचे पोलीस अधीक्षक मंगेश शिंदे, अपर पोलीस अधीक्षक दत्ताराम राठोड आणि डीवायएसपी पांडुरंग सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यापूर्वीही रेल्वे मार्गावरून अमली पदार्थांची वाहतूक उघडकीस आणण्यात आली असली, तरी यंदाच्या वर्षातील ही सर्वात मोठी कारवाई ठरली आहे.

# विद्यार्थ्यांना अभ्यासाची सोय गावातच उपलब्ध व्हावी

## 'गाव तिथे अभ्यासिका तयार करा', खा. अमर काळे यांची सामाजिक न्यायमंत्री यांचेकडे मागणी

**हिंगणघाट/जनमाध्यम**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत स्वप्नं मोठीष्ठ पण हातात साधनांची कमतरता! शिक्षणासाठी गाव सोडून शहराच्या दारात भटकंती करण्याची वेळ आजही कायम आहे. ही वेदना थांबवण्यासाठी गाव तिथे अभ्यासिका ही संकल्पना राबवावी, अशी ठाम आणि भावनिक मागणी खासदार अमर काळे यांनी केली.



हिंगणघाट शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसराच्या सौंदर्यीकरणाच्या लोकार्पण सोहळ्यात त्यांनी व्यासपीठावरून जणू विद्यार्थ्यांच्या वेदनांनाच आवाज दिला. सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाट यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले गावात अभ्यासिका नसल्यामुळे मुलांना शहरात जावं लागतं, ही आपल्या व्यवस्थेची शोकांतिका आहे. आजही अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे. अशा परिस्थितीत मुलांना शिक्षणासाठी शहरात पाठवणं म्हणजे पालकांच्या खांद्यावर प्रचंड ओझं. भाड्याच्या खोल्या, जेवणाचा खर्च, आणि त्यात अभ्यासासाठी योग्य वातावरणाचा अभाव या सगळ्याशी झुंज देत विद्यार्थ्यांची स्वप्नं अनेकदा अर्धवट राहतात. एमपीएससी, युपीएससी, नेट-सेटसारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शांत, अभ्यासपूर्ण वातावरणाची गरज असते.

मात्र, गावात अशी कोणतीही सुविधा नसल्याने त्यांच्या जिद्दीला अडथळे निर्माण होतात. विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील स्वप्नं मरू देऊ नका त्यांना गावातच अभ्यासाची संधी द्या, असा सूर खासदार अमर काळे यांनी व्यक्त केला. जर खरंच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन करायचं असेल, तर प्रत्येक गावात अभ्यासिका उभारली पाहिजे. हीच खरी बाबासाहेबांना आदरांजली ठरेल, असेही ते ठामपणे म्हणाले. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आता केवळ चर्चेपुरता न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याची गरज आहे. 'गाव तिथे अभ्यासिका' ही मागणी आता विद्यार्थ्यांच्या आशेची किरण बनली आहे.

# स्वाक्षरीची प्रतिकृती व चौकाला 'संविधाननिर्माते' नाव देण्याची मागणी

**वर्धा/जनमाध्यम**

संविधान निर्माते, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला अभिवादन म्हणून त्यांच्या स्वाक्षरीची प्रतिकृती सिव्हील लाईन परिसरातील चौदारतळे प्रतिकृतीसमोर ॲक्रेलिकमध्ये उभारावी, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकाला संविधाननिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक असे नाव देण्यात यावे, अशी मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती, वर्धा शहरतर्फे करण्यात आली आहे. यासंदर्भात समितीने नगराध्यक्ष सुधीर पांगुळ व मुख्याधिकारी विजय देशमुख यांना निवेदन दिले. शहरातील ऐतिहासिक व सामाजिक स्थळांना बाबासाहेबांच्या कार्याशी जोडण्याची ही योग्य वेळ असल्याचे समितीचे मत आहे. दरम्यान डॉ बाबासाहेब आंबेडकर, यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ११ ते १४ एप्रिलदरम्यान भीमजयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विविध प्रबोधनपर व सांस्कृतिक कार्यक्रमांची आखणी करण्यात आली असून, नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे शहरात आंबेडकरी विचारांची जपणूक व सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# सेलूमध्ये राजेश वरटकर पत्रकारावर प्राणघातक हल्ला

## पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह, मुख्यमंत्री,गृहमंत्री व जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन

**सेलू/ जनमाध्यम**

लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारितेवर सेलूत पुन्हा एकदा हल्ला झाला असून, घोराड येथील पत्रकार राजेश वरटकर यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी सेलू पोलीस ठाण्याचे ठाणेदार देवेंद्र ठाकूर यांनी आरोपींना पाठीशी घातल्याचा गंभीर आरोप पत्रकार संघाने केला असून, आरोपींवर 'पत्रकार संरक्षण कायद्या' अंतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



घोराड येथील विठ्ठल रुक्मिणी देवस्थान संदर्भात राजेश वरटकर यांनी काही बातम्या प्रसिद्ध केल्या होत्या. या बातम्यांचा राग मनात धरून माजी उपसरपंच रामेश्वर घंगारे व माजी सरपंच ज्योती घंगारे यांनी ९ एप्रिल रोजी वरटकर यांना अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली होती. या धमकीनंतर वरटकर यांनी तातडीने पोलीस ठाणे गाठून संरक्षणाची मागणी केली होती. मात्र, पोलिसांनी याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. पोलिसांच्या या ढिसाळ कारभारामुळे आरोपींचे मनोबल वाढले आणि १० एप्रिल रोजी सकाळी ठाणेदारांच्या क्वार्टर समोरच वरटकर यांना भररस्त्यात बेदम मारहाण करण्यात आल्याने डोळ्याला, डोक्याला व कानाला इजा झाल्याचे बोलले जात आहे. या घटनेनंतर सेलू तालुक्यातील पत्रकारांनी आक्रमक पवित्रा घेतला असून पोलीस या प्रकरणातील सहाही आरोपींवर तात्काळ 'पत्रकार संरक्षण कायद्या'अंतर्गत गुन्हे दाखल व्हावेत. ठाणेदार देवेंद्र ठाकूर यांनी कर्तव्यात कसूर केल्याचा आणि आरोपींशी संगनमत केल्याचा आरोप असल्याने त्यांची उच्चस्तरीय चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी. वारंवार होणाऱ्या अशा हल्ल्यांमुळे पत्रकारांच्या जीविताला धोका निर्माण झाला असून प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

या घटनेची तक्रार मुख्यमंत्री, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी सहा जणांवर गुन्हे दाखल केले असले तरी, मूळ सूत्रधारांना अद्याप कठोर शिक्षा न मिळाल्याने पत्रकार वर्गात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

एकीकडे सरकार पत्रकारांच्या संरक्षणाचे दावे करते, तर दुसरीकडे पोलीस संरक्षणाची मागणी करूनही ठाणेदारांच्या क्वार्टर समोरच पत्रकारावर हल्ला होतो. हे पोलीस आणि गुन्हेगारांच्या अभद्र युतीचे लक्षण आहे. या प्राणघातक घटनेमुळे तालुक्यातील पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, आता गृहखाते यावर काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पैशांच्या वादातून भावाने भावास मारहाण

**देवळी-** पैशांच्या किरकोळ कारणावरून भावानेच भावास मारहाण केल्याची घटना शहरात घडली आहे. याप्रकरणी देवळी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी शंकर महाजन यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, पांडू महाजन याने त्यांच्याकडे खर्चा घेण्यासाठी पैसे मागितले. त्यावेळी पैसे नसल्याचे सांगितल्याने संतापलेल्या पांडूने शिवीगाळ करत मारहाण केली. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. स्थानिकांच्या हस्तक्षेपानंतर वाद निवळला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी कारवाई करत आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला. पुढील तपास देवळी पोलिस करत असून नागरिकांनी किरकोळ कारणांवरून वाद टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### वादातून इसमास मारहाण

देवळी-शहरातील बसस्थानक परिसरात किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका इसमास मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी देवळी पोलिसांनी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी दिनेश येळणे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार,वैभव खेलकर व त्याच्या एका साथीदाराने वाद घालत त्यांना मारहाण केली. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. जखमीस प्राथमिक उपचार देण्यात आले. या प्रकरणी आरोपींविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास देवळी पोलीस करत आहेत.

### चारचाकीची बैलगाडीला धडक; एक जखमी

सेलू-तालुक्यातील जयपूर शिवारात चारचाकी वाहनाने बैलगाडीला धडक दिल्याने एक जण जखमी झाल्याची घटना घडली. या अपघातात गुणवंत नागोगराव वैद्य (६२) रा. तुळजापूर (वघाळा) हे जखमी झाले आहेत. ते शेतातून बैलगाडीने परत येत असताना मागून आलेल्या वाहनाने त्यांच्या बैलगाडीला जोरदार धडक दिली. धडकेमुळे ते रस्त्यावर कोसळून जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करून त्यांना उपचारासाठी हलवले. या घटनेची नोंद सेलू पोलिस ठाण्यात करण्यात आली असून संबंधित वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघाताचे नेमके कारण काय, याचा तपास पोलीस करत आहेत.

# घरबसल्या मोबाईलवरच करा गॅस ई-केवायसी

**वर्धा जनमाध्यम**

गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यातील विविध गॅस एजन्सींवर ई-केवायसीसाठी ग्राहकांची मोठी गर्दी होत असून, तासनतास रांगेत उभे राहण्याची वेळ नागरिकांवर येत आहे. मात्र, आता या त्रासातून सुटका होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. एलपीजी गॅस कनेक्शनसाठीची ई-केवायसी प्रक्रिया ग्राहकांना घरबसल्या मोबाईलच्या माध्यमातून करता येणार असल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

गॅस कंपन्यांनी ग्राहकांसाठी ही प्रक्रिया अत्यंत सोपी केली असून, आधुनिक फेस ऑथेंटिकेशन (चेहरा पडताळणी) तंत्रज्ञानाचा वापर करून ई-केवायसी काही मिनिटांत पूर्ण करता येते. यासाठी ग्राहकांनी आपल्या गॅस कंपनीचे अधिकृत मोबाईल ॲप डाउनलोड करणे आवश्यक आहे. भारत पेट्रोलियमच्या ग्राहकांसाठी पत्त्द ँइण्थ हे ॲप उपलब्ध आहे. तसेच आधार पडताळणीसाठी ईमिंः हे ॲप इन्स्टॉल करणे अनिवार्य आहे.

ई-केवायसी प्रक्रियेसाठी ग्राहकांनी प्रथम ॲपमध्ये लॉगिन

## रांगेत उभे राहण्यापासून सुटका




करून कंझ्युमर नंबर किंवा नोंदणीकृत मोबाईल नंबर टाकावा लागतो.

त्यानंतर मोबाईलवर आलेला ओटीपी प्रविष्ट करून पडताळणी पूर्ण केली जाते. पुढील टप्प्यात फेस ऑथेंटिकेशन पर्याय निवडून संबंधित व्यक्तीचा चेहरा कॅमेऱ्यासमोर ठेवावा लागतो. डोळ्यांची उघडझाप केल्यानंतर प्रणाली फोटो कॅप्चर करून पडताळणी पूर्ण करते.

प्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर 'eKYC Successful' असा संदेश स्क्रीनवर दिसतो.

दरम्यान, तांत्रिक अडचणी किंवा माहितीअभावी अनेक ग्राहक अजूनही एजन्सीवर गर्दी करत असल्याचे चित्र आहे. प्रशासन व गॅस कंपन्यांनी याबाबत जनजागृती वाढविण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

### महत्त्वाच्या सूचना

फेस स्कॅन करताना पुरेसा प्रकाश असणे आवश्यक असून, गॅस कनेक्शन ज्या व्यक्तीच्या नावावर आहे, त्याचाच चेहरा स्कॅन करणे बंधनकारक आहे. तसेच मोबाईल क्रमांक आधार व गॅस कनेक्शनशी लिंक असणे आवश्यक आहे. एकूणच, घरबसल्या ई-केवायसीची सुविधा उपलब्ध झाल्याने नागरिकांचा वेळ वाचणार असून, गॅस एजन्सींवरील गर्दी कमी होण्यास मदत होणार आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १३६**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**आसेगाव पूर्णा-** छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा येथील रासेयो पथकाच्या वतीने सामाजिक समता सप्ताहानिमित्त डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची ६१ वी पुण्यतिथी व बी.ए. भाग ३ च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक प्रा. भारत कल्याणकर यांनी बोलताना डॉ. पंजाबराव देशमुख हे महाराष्ट्रातील महान समाजसुधारक, कृषीतज्ञ व शिक्षणमहर्षी होते, असे सांगितले. शेतकऱ्यांसाठी त्यांनी राबविलेल्या विविध योजना, आधुनिक शेतीसाठी केलेले प्रयत्न, कर्ज व तंत्रज्ञानाची उपलब्धता, तसेच सिंचन व संशोधनावर दिलेला भर यामुळे त्यांना ‘कृषी क्रांतीचे जनक’ म्हटले जाते, असे त्यांनी नमूद केले. तसेच विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रविंद्र इचे होते. त्यांनीही डॉ. देशमुख यांच्या कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. सदार, डॉ. जवंजाळ, प्रा. लिल्हारे, प्रा. चऱ्हाटे, प्रा. भुसारी, निभोरकर वल शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनीही मनोगत व्यक्त केले.संचालन पूनम यांनी केले, प्रास्ताविक डॉ. हरीश काळे यांनी मांडले तर आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष काळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



### पदवी वितरण समारंभ उत्साहात

**अमरावती-** पी. आर. पोटे एज्युकेशनल ग्रुपद्वारे संचालित पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती येथे नुकताच उन्हाळी – २०२५ सत्रातील औषधनिर्माण शास्त्र पदवीधर विद्यार्थ्यांचा पदवी वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. हा समारंभ समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त विशेष महत्त्वाने साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयीन आठवणींना उजाळा देत भावनिक क्षण अनुभवले.समारंभाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. दिप्ती बी. रुईकर मॅडम उपस्थित होत्या. तसेच उपप्राचार्य प्रा. प्रशांत जे. बुरंगे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.संचालन श्रेया ठाकरे यांनीतर आभार प्रदर्शन प्रा. दिप्ती बोंडे यांनी केले. समारंभाला पदवीधर विद्यार्थी, सध्याचे विद्यार्थी, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काऊच पफीमध्ये विवाह महोत्सवला ग्राहकांचा जबरदस्त प्रतिसाद

**अमरावती/का.प्र.**

सध्या सगळीकडे लग्न सराईची धूमधाम आहे. महाराष्ट्रातील अत्यंत लोकप्रिय असलेला सण ’अक्षय तृतीया’ अगदी जवळ आला आहे. खरेदी करण्यासाठी ग्राहक वर्षभर या मुहूर्ताची वाट पाहत असतात. या दिवशी लोक नवीन वस्तूंची खरेदी करणे अत्यंत शुभ मानतात. सध्या काऊच पफी शोरूम मध्ये या मुहूर्तावर खरेदी करण्यासाठी व सवलतीचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांनी प्रचंड गर्दी केली आहे पुन्हा एक आनंदाची बातमी महाराजा सोफा घेणे आता सामान्य ग्राहकालाही घेणे शक्य ते म्हणजे केवळ ७९९००/- पासून उपलब्ध आहे. अनेक ग्राहकांनी यासाठी ॲडव्हान्स बुकिंग करून ठेवले आहे. लग्नसराईत आहेरात देण्यासाठी वधूपक्ष व वर पक्षातले लोक कपाटे, डायनिंग टेबल, सोफा सेट, टीव्ही युनिट, बेडरूम सेट खास करून देत असतात यामध्ये बेडरूम सेट या प्रकारात ५०




हून जास्त व्हेरायटी उपलब्ध आहेत. काऊच पफी (१ लाख १० हजार स्केअर फुट भव्य शोरूम) या प्रकारच्या फर्निचरच्या शोरूममध्ये शेकडो व्हेरायटी उपलब्ध आहेत. त्यातच काऊच पफी ने यंदा लग्नसराई निमित्त पालकांसाठी विवाह स्पेशल कॉम्बो पॅक जाहीर केला आहे. या पॅक चे वैशिष्ट्य असे आहे की अत्यंत माफक दरात म्हणजे केवळ एक लाख ३९ हजारात कॉर्नर सोफा सेट, डायनिंग टेबल संपूर्ण बेडरूम सेट ज्यामध्ये बेड, आलमारी, ड्रेसिंग टेबल, स्टूल हे सगळ काही असेल या कॉम्बो पॅक ऑफरला ग्राहकांनी जबरदस्त प्रतिसाद दिला आहे. येथील आणखीन वैशिष्ट्य म्हणजे गिफ्ट आर्टिकल व शोभिवंत एक वस्तू घर, ऑफिस, बंगला, हॉटेल्स, फार्म हाऊस या सगळ्यासाठी लागणाऱ्या सजावटीच्या वस्तू जसे भिंतीवरील विविध घडाळे आकाराची व प्रकारची डेकोरेटिव्ह आकर्षक अप्रतिम कलर कॉम्बिनेशनच्या फ्रेम्स वॉल हैंगिंग मुर्त्यांमध्ये अनेक डिझाइन्स श्री. शिवाजी महाराज, श्री. गजानन महाराज, श्री साईबाबा, डॉ. आंबेडकर, श्रीराम-लक्ष्मण सीता, बालाजी ाशा विविध प्रकारच्या धातूंच्या मूर्ती व पितळेच्या मूर्ती येथे उपलब्ध आहेत. असंख्य प्रकारचे कॅण्डल लाईट डिनर साठी डेकोरेटिव्ह कॅण्डल स्टॅन्ड येथे उपलब्ध आहेत हॉलमधील सजावटी करता सिरॅमिकचे मोठे असल्यामुळे वॉटर फॉल्स तर ग्रीन लव्हर साठी लहान मोठ्या प्रसाइजमध्ये फ्लॉवर विविध आकाराचे व विविध प्रकारातील ग्रीन प्लांट्स याचे भरपूर कलेक्शन रेडी स्टॉक मध्ये उपलब्ध आहे ॲंटिक प्रेमींसाठी देखील येथे शेकडो वस्तू असून वूडन व मेटल दोन्ही प्रकारात खूप व्हेरायटी आहे. काही निवडक वस्तूंवर संचालकांनी १५ टक्के सूट दिलेली आहे. मात्र ही सूट मर्यादित काळा करीता आहे. काऊच पफीमध्ये आणखीन एक वैशिष्ट्य नुकताच सुरु झालेला मॉल ऑफिस फर्निचर ची गरज लक्षात घेऊन काऊच पफी ने स्पेशल ऑफिस फर्निचर मॉल उघडला आहे. येथे विविध प्रकारची ऑफिस टेबल, व्हिजिटर चेअर्स, एक्झिक्यूटिव्ह बॉस चेअर्स विविध प्रकारची कपाटे, लायब्ररी बुक सेल्फ ऑफिसेस तसेच सरकारी व खाजगी ऑफिस करता सर्व प्रकारच्या चेअर्स टेबल्स क्वांटिटी मध्ये उपलब्ध आहे. तसेच सेंटर टेबल व शू रॅक व टीव्ही युनिट यामध्ये भरपूर व्हेरायटी उपलब्ध आहे. गार्डन फर्निचर मध्ये लागणाऱ्या सर्व प्रकारचे फर्निचर रेडी स्टॉक मध्ये नेहमीच उपलब्ध असते. त्यामुळे आता ग्राहकांना कुठेही बाहेर जायची गरज नाही. असे संचालकाने अभिमानाने सांगितलं याचबरोबर आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे ग्राहकांच्या गरजेनुसार कस्टमाइज फर्निचर बनवून देणे ही देखील सुविधा आहे. त्यामुळे ग्राहकांना त्यांच्या जागेनुसार व आवडीनुसार फर्निचर तयार करून मिळते. सुट्टीच्या दिवशी व रविवारी देखील शोरूम संपूर्ण दिवसभर सुरू असते तसेच ग्राहकांसाठी काऊच पफी ने १ चेअर वर १ चेअर फ्री व १ ऑफिस टेबल वर १ चेअर फ्री आहे तसेच ग्राहकांच्या सोयीसाठी बजाज फायनान्स देखील उपलब्ध आहे. त्यामुळे ग्राहकांना येणे जाणे व खरेदी करणे सोपे जाते. ग्राहकांनी या सर्व गोष्टी लक्षात घेता एकदा जरूर व्हिजिट करावी व आपल्या आवडी नुसार वस्तू खरेदी करावी असे आवाहन संचालक अनिल अग्रवाल, अमित अग्रवाल व किरण अग्रवाल यांनी केले आहे.

# राज्यात ८० उपजिल्हाधिकारी पदे रिक्त

## महसूल मंत्र्यांच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र शासनातील विविध विभागांमध्ये सुमारे ८० उपजिल्हाधिकारी पदे रिक्त असल्याची माहिती समोर आली असून, या पदांमुळे अनेक महत्त्वाची कामे व प्रकल्प रखडले आहेत. नगर विकास, गृहनिर्माण, अन्न व नागरी पुरवठा तसेच इतर विभागांकडून या पदांसाठी अधिकाऱ्यांची अतिरिक्त मागणी करण्यात असून महसूल मंत्र्यांच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शासनातील विविध विभागांमध्ये सुमारे ८० उपजिल्हाधिकारी पदे रिक्त



असल्याने अनेक कामे प्रलंबित पडली आहे. यामुळे विकास कामांचा खोळंबा झाला असून शासकीय कामातही अडचणी येत आहेत. याबाबत वरिष्ठांकडे वेळोवेळी निवेदनादवारे मागणी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्णयाकडे सर्व विभागांचे लक्ष लागले आहे. या रिक्त पदांची पूर्तता झाल्यास विकास प्रकल्पांना चालना मिळेल प्रशासन अधिक कार्यक्षम होईल. राज्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या निर्णयाबाबत लवकरच सकारात्मक घडामोडी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. याबाबत कोणता निर्णय होईल याकडे लक्ष्य लागले आहे.



### मेळघाटातील जंगल सुंदरता

बहावा (अमलतास) अमरावती मधील रस्त्यांची सुंदरता वाढवीत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख चौक ते राष्ट्रमाता जिजाऊ चौक रस्त्यावरील हा पूर्णपणे फुललेला पिवळा धमक अमलतास जाता येता सर्वांचे लक्ष वेधून घेतो.या रस्त्यावर असलेली विविध फुलझाडे नेहमीच नैसर्गिक रंग उधळण करीत असते. तेव्हा या रस्त्याला ‘फुलांचा रस्ता ’ म्हणायला हरकत नाही. शहराचे सौंदर्य वाढविण्यासाठी अशाच फुलांच्या, फळांच्या रस्त्यांची आवश्यकता नक्कीच आहे.

**मोबाईल क्लिक-अभि. प्रदीप अंधारे,अमरावती.**

# मान्सूनपूर्व देखभाल- दुरूस्तीच्या कामांची जिल्ह्यात सुरुवात

**अमरावती/का.प्र.**

पावसाळ्यात वादळी वारा, मुसळधार पाऊस आणि विजांच्या कडकडाटामुळे विद्युत पुरवठ्यात निर्माण होणारा व्यत्यय टाळण्यासाठी अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांच्या मार्गदर्शनात महावितरणच्या मान्सूनपूर्व देखभाल दुरूस्तीच्या कामांना जिल्ह्यात सुरुवात करण्यात आली आहे. अचलपूर विभागात ‘एक वितरण केंद्र – एक उच्च दाब विद्युत वाहिनीची दुरूस्ती’ यानुसार कामाचे नियोजन करण्यात आले आणि एकाच दिवसात अचलपुर विभागांतर्गत अचलपुर, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, चांदूर बाजार, चिखलदरा आणि धारणी या तालुक्यांतील प्रत्येक वितरण केंद्रामधील एक उच्च दाब वाहिनी याप्रमाणे ४० वितरण केंद्रातील ४० उच्चदाब वाहिन्यांची देखभाल दुरूस्ती करण्यात आली. देखभाल दुरूस्तीच्या कामांतर्गत विद्युत वाहिनीजवळील



धोकादायक झाडांच्या फांद्या छाटणे, नादुरुस्त जंपर्सची पुनर्जोडणी करणे, सैल तारा ताणून योग्य स्थितीत आणणे आदी महत्त्वाची कामे करण्यात आली. या कामासाठी कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन सुरू असलेल्या कामांची पाहणी केली व आवश्यक सूचनाही दिल्या. मान्सूनपूर्व देखभाल दुरूस्तीच्या कामामुळे पावसाळ्यातील संभाव्य विद्युत व्यत्यय कमी होऊन ग्राहकांना अधिक विश्वासार्ह व अखंड वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार असल्याचे महावितरणने सांगितले आहे.


# इयत्ता २ री ते ४ थी शिक्षकांसाठी नवीन अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण

**अमरावती/का.प्र.**

सन २०२५-२६ पासून राज्यात नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येत आहे. त्यानुसार राज्यातील इ. २ री, ३ री, ४ थी वर्गांना शिकविणाऱ्या शिक्षकांना नवीन अभ्यासक्रम अंमलबजावणीच्या अनुषंगाने प्रशिक्षण देणे प्रस्तावित आहे. त्या नुसार शिक्षकांना जनगणना, मतदार नोंदणी बरोबर आता उन्हाळी सुटित शिक्षकांना नविन अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामुळे शिक्षकांच्या उन्हाळी सुटिवर गंडातर आले आहे.

शैक्षणिक वर्ष १५ जून २०२६ पासून सुरु होणार असल्यामुळे त्यापुर्वी नवीन अभ्यासक्रम लागू होणाऱ्या वर्गाच्या शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण होणे आवश्यक आहे. इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी च्या सर्व शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी राज्यस्तर, जिल्हास्तर व तालुकास्तर प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत शिक्षक प्रशिक्षण मराठी, उर्दू माध्यमाच्या शिक्षकांसाठी स्वतंत्रपणे आयोजित करण्यात येईल. अन्य माध्यमांना मराठी माध्यमांसोबत सामावून घेतले जाईल. उर्दू माध्यमासाठी राज्यस्तर व जिल्हा स्तर असे दोनच स्तर असतील तर मराठीसोबत अन्य माध्यमांसाठी प्रशिक्षण राज्यस्तर, जिल्हास्तर व तालुकास्तर अशा क्रमाने आयोजित करण्यात यावे. प्रत्येक वर्गात अपेक्षित विषयांच्या निर्धारित तासिका पूर्ण होण्यासाठी दुसरीसाठी ०३ दिवसांचा आणि तिसरी व चौथीसाठी ०४ दिवसांचा प्रशिक्षण कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. ४ ते ७ मे २०२६,३ जिल्हास्तर-मराठी व अन्य ११ ते १४ मे २०२६, तालुकास्तर प्रशिक्षण मराठी व अन्य-१८ ते ३० मे २०२६,राज्यस्तर उर्दू-४ ते ७ मे २०२६, जिल्हास्तर प्रशिक्षणउर्दू-११ ते ३० मे २०२६इ.२ री साठी एक दिवसाचा कालावधी कमी असला तरी प्रशिक्षण सुरु



होण्याची दिनांक समान राहील. इ.२ री साठी प्रशिक्षण समाप्ती एक दिवस अगोदर होईल. प्रशिक्षक / सुलभक यांचेसाठी मराठी माध्यमाचे प्रशिक्षण घटकसंच जिल्हा स्तरापर्यंत (जिल्हा मुख्यालयाच्या तालुका वाहतूकीसोबत) वितरित करण्यात येतील. उर्दू माध्यमाचे घटकसंच राज्यस्तर ऊध्ऊ वेळी वितरित करण्यात येतील. वाचन साहित्य म्हणून पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम २०२४ (भाग-१ व भाग-२) यांच्या प्रती सन २०२५-२६ मध्ये शाळांना पुरविण्यात आलेल्या आहेत. शालेय शिक्षण अभ्यासक्रम व पाठ्यक्रम इयत्ता तिसरी (भाग-१ व भाग-२) तसेच इयत्ता चौथी (भाग-१ व भाग-२) प्रत्येक शाळेसाठी एक संच तालुका स्तरापर्यंत पोच करण्यात येत आहे. त्याचे वितरण शाळा स्तरापर्यंत होईल याची दक्षता घ्यावी व प्रशिक्षणास येताना त्याची प्रत सोबत आणणेबाबत प्रशिक्षणार्थी यांना कळवावे. मराठी माध्यमातील अभ्यासक्रमाची प्रत सर्व माध्यमाच्या शाळांना पुरविण्यात येईल. अभ्यासक्रमाचा एक संच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था स्तरावर ठेवण्यासाठी जिल्हा मुख्यालयाच्या तालुका वाहतूकीसोबत पाठविण्यात येईल.

जिल्हास्तर व तालुकास्तर प्रशिक्षण आयोजनाची जबाबदारी संबंधित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अ्ध्ऊ यांची राहील. माध्यमनिहाय प्रशिक्षणार्थी संख्या व तपशीलवार नियोजन आहे.प्रशिक्षण घेणाऱ्या शिक्षकांच्या एकूण संख्येनुसार ६० प्रशिक्षणार्थ्यांचा एक वर्ग याप्रमाणे आवश्यक बॅचेस तयार करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार प्रशिक्षण स्थळ व तज्ज्ञांची निवड करावी व अन्य पूर्वतयारी करावी.उर्दू माध्यमांसाठी तालुकास्तरावर वर्गासाठी पुरेशी संख्या होऊ शकत नसल्याने त्यांचेसाठी राज्यस्तर व जिल्हास्तर असे दोनच टप्पे असतील. संख्येनुसार वर्ग पूर्ण होण्यासाठी काही ठिकाणी एकापेक्षा अधिक जिल्ह्याचे प्रशिक्षण नियोजन एकत्र दिलेले आहे. सदर प्रशिक्षण ज्या जिल्ह्यात असेल त्या अ्ध्ऊ मार्फत सदर प्रशिक्षणाचे आयोजन होईल. प्रशिक्षणार्थी संख्या, उपलब्ध सुलभक संख्या यांनुसार एकापेक्षा जास्त टपप्यांमध्ये प्रशिक्षण पूर्ण करुन घ्यावे. शिक्षकांना जनगणना, मतदार नोंदणी इत्यादी राष्ट्रीय कामकाज सोपविलेले असल्यास त्याचा विचार करुन प्रशिक्षणाचे एक अथवा अधिक टप्प्यांमध्ये नियोजन करावे. तथापि दिलेल्या कालमर्यादित सर्व शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.राज्यस्तर तज्ज्ांचा जिल्हास्तर व तालुकास्तर प्रशिक्षणासाठी आवश्यकतेनुसार उपयोग करुन घेता येईल. विभागातील प्रशिक्षण परिणामकारक व नियोजनानुसार होत असलेबाबत क्षेत्रीय विद्या प्राधिकरण व यांनी समन्वय साधावा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांनी सर्व सहभागी प्रशिक्षणासाठी वेळेत उपस्थित राहतील याबाबत आवश्यक सूचना निर्गमित कराव्यात.राज्यातील शासकीय व खाजगी अनुदानित शाळांतील शिक्षक प्रशिक्षणासाठी निधीची उपलब्धता झाल्यानंतर कळविण्यात येईल. खाजगी विना अनुदानित व स्वयंअर्थसहायित शाळांतील शिक्षकांसाठी सदर प्रशिक्षण स्वतंत्रपणे आयोजित करता येईल त्यासाठी कोणतीही आर्थिक तरतूद उपलब्ध असणार नाही. प्रशिक्षणासाठी प्रशासकीय व आर्थिक तरतूदीबाबत सूचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील. त्याचप्रमाणे इ.६वी प्रशिक्षणाबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.असे डॉ. कमलादेवी आवटे, सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी कळविले आहे.

# आयुक्त वर्षा लड्डा यांची स्वच्छता निरीक्षकांसोबत आढावा बैठक

**अमरावती/का.प्र.**

शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम, शिस्तबद्ध आणि परिणामकारक करण्याच्या उद्देशाने अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी स्वच्छता विभागातील सर्व स्वच्छता निरीक्षकांची विशेष आढावा बैठक घेतली. या बैठकीत शहरातील विविध भागांतील स्वच्छता स्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

ही बैठक महानगरपालिका मुख्यालयात पार पडली. बैठकीदरम्यान शहरातील कचरा संकलन व्यवस्था, दैनंदिन स्वच्छता मोहीम, नाल्यांची साफसफाई तसेच सार्वजनिक शौचालयांची स्थिती याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.आयुक्त वर्षा लड्डा यांनी प्रत्येक प्रभागातील स्वच्छतेची जबाबदारी निश्चित करून कामकाजात पारदर्शकता व नियमितता आणण्याचे निर्देश दिले.



कचरा संकलन वेळेत पूर्ण होणे, रस्त्यांवर कचरा साचू न देणे तसेच नागरिकांच्या तक्रारींचे त्वरित निराकरण करणे यावर विशेष भर देण्यात आला.यावेळी स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवर नियंत्रण ठेवणे, यंत्रणेमधील त्रुटी दूर करणे तसेच आवश्यक ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शहरातील स्वच्छता अभियान अधिक प्रभावी करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचेही आवाहन करण्यात आले.

बैठकीत स्वच्छता निरीक्षकांनी आपल्या-आपल्या विभागातील अडचणी व आव्हाने मांडली. काही भागांत कचरा संकलन वाहनांची कमतरता तर काही ठिकाणी नागरिकांच्या असहकार्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर चर्चा झाली. या समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.यावेळी आयुक्तांनी स्पष्ट केले की, शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रशासनाबरोबरच नागरिकांचा सहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष मोहिमा राबविण्याचे निर्देश देण्यात आले.

# १६ मोठ्या नाल्यांच्या स्वच्छतेसाठी विशेष मोहीम

**अमरावती/का.प्र.**

शहरातील नाले स्वच्छतेला गती देत अमरावती महानगर पालिकेकडून १६ प्रमुख नाल्यांच्या साफसफाईसाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्या निर्देशानुसार ही मोहीम युद्धपातळीवर राबविण्यात येत असून, नाल्यांमधील गाळ व कचरा हटवून पाण्याचा प्रवाह सुरळीत करण्यावर भर देण्यात आला आहे.या मोहिमेत भाजीबाजार परिसरातील ताजनगर, वडाळीपासून सुरू होणारा आंबानाला, महादेव खोरी परिसरातील नाला तसेच मोशी कॉलनी आणि मशानगंज येथील



नाल्यांचा समावेश आहे. या सर्व नाल्यांची प्रभावी साफसफाई करून पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पाणी तुंबण्याच्या समस्यांवर नियंत्रण मिळवण्याचा उद्देश आहे.

सध्या या कामासाठी २ मनपाच्या आणि ४ भाड्याने आणलेल्या पोकलेन मशीन तैनात करण्यात आल्या असून, नाल्यात साचलेला गाळ, प्लास्टिक कचरा, झाडाझुडपांचे अवशेष आणि इतर अडथळे काढण्याचे काम वेगाने सुरू आहे. विशेषतः ताजनगर नाला हा महत्त्वाचा जलवाहिनीचा भाग असल्याने त्याच्या स्वच्छतेला प्राधान्य दिले जात आहे. गेल्या काही वर्षांपासून नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्यामुळे पावसाळ्यात पाणी तुंबणे, रस्त्यांवर पाणी येणे, दुर्गंधी निर्माण होणे आणि आरोग्यविषयक समस्या वाढणे अशा अडचणी निर्माण होत होत्या. भाजीबाजार परिसरातील व्यापारी आणि रहिवाशांनी याबाबत वारंवार तक्रारी केल्या होत्या.या पार्श्वभूमीवर आयुक्त वर्षा लड्डा यांनी तातडीने कारवाईचे निर्देश दिल्यानंतर प्रशासनाच्या देखरेखीखाली नियोजनबद्ध पद्धतीने नालेसफाई सुरू करण्यात आली आहे. पोकलेन मशीनच्या साहाय्याने संपूर्ण नाल्याची टप्प्याटप्प्याने साफसफाई केली जात असून, पाण्याचा प्रवाह मोकळा करण्यावर भर दिला जात आहे.

# धरणाच्या कुशीत बेकायदेशीर 'ब्लास्टिंग'चा कहर

## गाजीपूर व रुदाळी परिसरात कथित खनन माफियांचा उच्छाद

### उदरनिर्वाहाच्या शेतजमिनी उद्ध्वस्त, आदिवासी भयभीत; पोपटखेड धरणाची सुरक्षा धोक्यात, प्रशासन मात्र मौनव्रतावर

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोट** : तालुक्यातील गाजीपूर व रुदाळी परिसराचा काही भाग सध्या बेकायदेशीर खननाच्या विळख्यात सापडला असून त्यामुळे संपूर्ण भागात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. नरनाळा अभयारण्याच्या वन परिक्षेत्राला लागून असलेला हा संवेदनशील भाग आणि अगदी नजिकच्या अंतरावर असलेले पोपटखेड धरण या दोन्हींच्या सान्निध्यात सुरू असलेले बेछूट खाणकाम, ब्लास्टिंग आता गंभीर पर्यावरणीय आणि मानवी संकटाचे रूप धारण करत आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही वर्षांपासून अकोट तालुक्यातील गाजीपूर व रुदाळी या आदिवासी बहुल परिसरात मोठ्या प्रमाणावर स्टोन क्रशर आणि खदानी सुरू आहेत. दिवस-रात्र सुरू असलेल्या या कामांमध्ये जिलेटीन व डिटोनेटर या महाशक्तीशाली स्फोटकांचा वापर करून सर्रासपणे बेकायदेशीर ब्लास्टिंग केली जात आहे. विशेष म्हणजे, अनेक ठिकाणी ब्लास्टिंगच्या माध्यमातून उत्खनन करताना डिजिएमएस, कार्यालय नागपूर यांच्या सुचनेनुसार अर्हताप्राप्त प्रबंधक व ब्लास्टर यांची नेमणूक न करता धोकादायक उत्खननाच्या प्रक्रिया सुरू आहेत. परिणामी, प्रत्येकवेळी होणाऱ्या ब्लास्टिंगच्या माध्यमातून संपूर्ण परिसर हादरतो, जमिनी कंप पावतात आणि नागरिकांच्या अंगावर अक्षरशः काटा येतो, अशी आपबिती नागरिकांनी स्वतः बोलून दाखविली आहे.

या सततच्या कंपनांमुळे शेतजमिनींची रचना बदलू लागली असून, सुपीक मातीची धूप वाढली आहे. शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. काही ठिकाणी विहिरींमधील तसेच विंधनविहिरी मधील भूगर्भाच्या पाणीपातळी बदलल्याच्या तक्रारीही ग्रामस्थांकडून पुढे येत आहेत.

या परिसरात आदिवासी बांधवांचे मोठ्या प्रमाणावर वास्तव्य आहे. त्यांच्या उपजीविकेचा मुख्य आधार असलेल्या शेतजमिनीच आता धोक्यात आल्या आहेत. मात्र, शिक्षण आणि माहितीअभावी या बांधवांचा गैरफायदा घेत तथाकथित गौण खनिज माफिया प्रशासनातील काही आतील हातांशी हातमिळवणी करून मनमानी करत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. त्यामुळे 'आमच्या डोळ्यांसमोर आमची जमीन उद्ध्वस्त होतेय, पण आम्ही काहीच करू शकत नाही,' अशी हळहळ अनेक आदिवासी समाजबांधवांच्या वारसांनी व्यक्त केली आहे.

या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे, अनेक खदानधारकांकडे आवश्यक पर्यावरणीय मंजुरी (ऍं) नसतानाही मोठ्या प्रमाणावर उत्खनन सुरू असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून समोर आली आहे. यामुळे संपूर्ण खनन प्रक्रिया बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट होत आहे. दुसरीकडे, प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिल्या जाणाऱ्या परवानग्यांचे नूतनीकरण प्रत्यक्ष स्थळ निरीक्षणाशिवायच केवळ कागदोपत्री करण्यात आले असल्याचा गंभीर आरोप होत आहे. यामुळे संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

विशेष म्हणजे, या सर्व घडामोडींचा थेट परिणाम पोपटखेड धरण यांच्या सुरक्षिततेवर होऊ शकतो. सततच्या ब्लास्टिंगमुळे निर्माण होणाऱ्या कंपनांमुळे धरणाच्या संरचनेवर ताण येऊ शकतो. भूगर्भीय अस्थिरता वाढल्यास भविष्यात धरणाला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तर भिंतीला सुद्धा तडे जाण्याची दाट शक्यता अनेकांनी बोलताना व्यक्त केली आहे. अशा स्थितीत पोपटखेड, गजानन महाराज विहिरीजवळील वस्ती, अकोलखेड, अंबोडा, मोहाला नवीन वस्ती, अकोली जहागीर आणि अकोटच्या काही भागातील वास्तव्यास असलेल्या हजारो नागरिकांच्या जीविताचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, ही बाब अधिकच चिंताजनक असल्याची खेदजनक प्रतिक्रिया जलसंपदा विभागातील एका अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर दिली.

दरम्यान, एवढ्या गंभीर प्रकारानंतरही महसूल, वन विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि स्थानिक प्रशासन यांची भूमिका संशयास्पद शांततेचीच दिसून येत आहे. वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संताप वाढत आहे. 'प्रशासनाचे आशीर्वाद नसते तर एवढा मोठा अवाढव्य कारभार शक्यच नव्हता,' असा थेट आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.

गाजीपूर परिसरातील या खननाविरोधात आता स्थानिक नागरिक, शेतकरी आणि सामाजिक संघटना एकवटत असून लवकरच तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा देण्यात आला आहे.

#### पोपटखेड-रुदाळी पुलावर 'मृत्यूची वाहतूक'

पोपटखेड-रुदाळी मार्गावरून खदानधारकांची जड वाहने पुलाच्या क्षमतेपेक्षा अधिक गौण खनिज वाहनात भरून वाहतूक करत आहेत. दररोज १५० ते २०० ट्रक व हायवा या मार्गावरून धावतात. त्यामुळे पुलाची संरचना धोक्यात आली असून तो कोसळल्यास पोपटखेड पलीकडील गावांचा अकोटशी संपर्क तुटण्याची भीती व्यक्त होत आहे. स्थानिकांनी अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप होत असून, जड वाहनांवर तात्काळ बंदी घालण्याची मागणी जोर धरत आहे.

#### आदिवासी जमिनींचा 'भाडेपट्टा' घोटाळा उघड?

गाजीपूर परिसरातील खनन प्रकरणात आणखी गंभीर बाबी समोर आल्या आहेत. आदिवासी बांधवांच्या जमिनी शासनाची आवश्यक परवानगी न घेता गैर आदिवासी यांनी दीर्घकाळ ( ९९ वर्षांकरिता ) भाडेपट्ट्यावर घेतल्या असल्याचे धक्कादायक वास्तव तत्कालीन अधिकाऱ्याने लक्षवेधीला दिलेल्या जबाबातून समोर आले आहे . या जमिनींवर स्टोन क्रशर उभारून खननासाठी मायनिंग प्लॅनही मंजूर करण्यात आल्याचे कागदपत्रांमधून स्पष्ट होत आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणात अतिरिक्त उत्खनन (ओव्हर एक्स्ट्रॅक्शन) केल्याबद्दल संबंधितांवर दंडात्मक कारवाईही करण्यात आली होती. मात्र, दंड न भरताच ' नोटीस, अपील, पुनः नोटीस अन् पुन्हा अपील' यामध्ये खननकाम, स्टोन क्रशर 'जैसे थे' सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे कारवाई केवळ कागदोपत्रीच मर्यादित राहते की काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. स्थानिकांच्या मते, आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेत त्यांच्या जमिनी कमी मोबदल्यात भाडेपट्ट्यावर घेतल्या जात आहेत. शासनाच्या नियमांना धाब्यावर बसवून खनन सुरू ठेवले जात असल्याने हा प्रकार 'संरक्षित जमिनींची लूट' असल्याचा आरोप केला जात आहे.

या संपूर्ण प्रकरणाची विशेष एसआयटी नेमून सखोल चौकशी करीत कठोर कारवाई करावी, तसेच आदिवासी बांधवांना न्याय द्यावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# कपिलवस्तु नगरात तरुणाचा खून

### पाच जण पोलिसांच्या ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील कपिलवस्तु नगर परिसरात जुन्या वैमनस्यातून २० वर्षीय तरुणाची चाकूने भोसकून निर्घृण हत्या करण्यात आल्याची खळबळजनक घटना शनिवारी (दि.११) मध्यरात्री घडली. या प्रकरणात गाडगेनगर पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली असून तीन अल्पवयीनांना ताब्यात घेतले आहे. संतोष उर्फ संत्या राजू बन (वय २०, रा. कपिलवस्तु नगर) असे मृत तरुणाचे नाव आहे. साहिल मावसकर (वय २०) आणि प्रतीक चव्हाण (वय २०, दोघे रा. जयश्रीराम नगर) अशी आरोपींची नावे आहेत.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष आणि आरोपी यांच्यात काही महिन्यांपूर्वी किरकोळ वाद झाला होता. त्या वादाचे रूपांतर द्वेषात होऊन आरोपींनी सूड उगवण्याची संधी साधली. शनिवारी रात्री सुमारे १.३० ते २ वाजण्याच्या सुमारास दोन मोटारसायकलींवरून आलेल्या पाच ते सहा जणांनी संतोषवर अचानक हल्ला चढवला. चाकूने वार करत त्याला गंभीर जखमी करून आरोपींनी घटनास्थळा वरून पळ ☞(पान २ वर)

# पंक्चर दुरुस्तीच्या दुकानात किरकोळ वादातून मारहाण

**सिंदी (रेल्वे)/प्रतिनिधीः-** येथील हनुमान मंदिराजवळ असलेल्या पंक्चर दुरुस्तीच्या दुकानात किरकोळ वादातून मारहाणीची गंभीर घटना घडली आहे. या प्रकरणी सिंदी (रेल्वे) पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मोहम्मद सहजाद अन्सारी (वय २३) हे पंक्चर दुरुस्तीचे काम करतात. दिनांक ११ एप्रिल रोजी दुपारी सुमारास आरोपी अमोल बंजारी, प्रफुल्ल धोबे ☞(पान २ वर)

# ३८ वर्षांपूर्वी आशा भोसले यांना मिळाली होती अमरावती विद्यापीठाची डी. लिट

**अमरावती/प्रतिनिधीः-** ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे रविवारी (दि.१२) मुंबई येथील रुग्णालयात निधन झाले. आपल्या जादुई आवाजाने सगळ्या जगाला भुरळ घालणाऱ्या आशा भोसले या काळाच्या पडद्याआड गेल्या. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने सुमारे ३८ वर्षांपूर्वी त्यांना डी. लिट मानद उपाधीने सन्मानित केले होते.




अमरावती विद्यापीठाची स्थापना १ मे १९८३ रोजी झाली. सुरूवातीच्या काळात विद्यापीठाचे कामकाज त्यावेळच्या विदर्भ महाविद्यालयाच्या परिसरात चालत होते. ज्येष्ठ नेते माजी विधान परिषद सदस्य प्रा. बी.टी. देशमुख, माजी आमदार डॉ. देविसिंह शेखावत, प्राचार्य डॅडी देशमुख हे विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेवर होते. डॅडी देशमुख यांचे चित्रपट सृष्टीशी आणि मंगेशकर कुटुंबीयांशी संबंध होते. आशा ☞(पान २ वर)

# कारची ट्रकला धडक; महिलेचा मृत्यू, दोघे गंभीर

### समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

**धामणगाव रेल्वे/ प्रतिनिधीः-** समृद्धी महामार्गावर रविवारी (दि.१२) पहाटे साडेसहा वाजण्याच्या सुमारास भरधाव कार ट्रकच्या मागील बाजुस धडकल्याने एका महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले. मृत महिलेचे नाव सरोज लक्ष्मीनारायण मल्हा (वय ४१, रा. भांडूप वेस्ट, मुंबई) असे आहे.





माहितीनुसार, एमएच ०३/ ईआर ३७६१ क्रमांकाची कार उत्तर प्रदेशहून मुंबईकडे येत होती. यावेळी चालक चंदन लक्ष्मीनारायण मल्हा (वय २५) यांना अचानक डुलकी लागल्याने कारवरील नियंत्रण सुटले आणि पुढील अज्ञात ट्रकला कारने जोरदार ☞(पान २ वर)

# 'पोलिस' बनून लाखोंची लूट

## दोघांकडून २७.५६ लाख उकळले

### फ्रेजरपुरा हद्दीत फसवणुकीचा प्रकार उघड; तीन महिलांविरुद्ध गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात पोलिस असल्याचे भासवून नागरिकांना जाळ्यात ओढणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला असून, दोन जणांकडून तब्बल २७ लाख ५६ हजार ५०० रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी तीन महिलांविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.



मुदलियार नगर येथील रहिवासी हरिभाऊ शंकरराव काळे (वय ७९) यांनी यासंदर्भात तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, आरोपी महिलांनी स्वतःला पोलिस कर्मचारी असल्याचे सांगत कायदेशीर कारवाईची भीती दाखवली. सुरुवातीला त्यांनी काळे यांच्याकडून ५ लाख ९० हजार ५०० रुपये उकळले. यानंतर बदनामीची भीती आणि गुन्हा दाखल होण्याचा धाक दाखवत, काळे तसेच त्यांचे परिचित अशोक मेश्राम यांच्याकडून टप्प्याटप्प्याने एकूण २७ लाख ५६ हजार ५०० रुपये उकळण्यात आले. या घटनेमुळे घाबरलेल्या काळे यांनी सुरुवातीला पोलिसांकडे धाव घेतली नव्हती. मात्र, नंतर धैर्य एकवटून ☞(पान २ वर)

# नाफेड केंद्रावरील बारदाना संपणे हा सरकारचा नाकर्तेपणा

### तीन दिवसात खरेदी सुरू करा अन्यथा शेतकऱ्यासह तहसीलवर धडकणार

#### उबाठा चे प्रकाश मारोटकर यांचा इशारा

**नांदगाव खांडेश्वर/ प्रतिनिधीः-** बारदाना संपला आहे असे कारण पुढे करून नाफेड मार्फत होत असलेली तुर व चना खरेदी १५ दिवसापासून बंद ठेवणे हा शासकीय यंत्रणेचा नाकर्ते पणा असून शेतकऱ्या सोबत विश्वासघात आहे. बारदाना



उपलब्ध करून तीन दिवसात नाफेडची खरेदी सुरू करा अन्यथा शेतकऱ्यासह तहसील कार्यालयावर धडक देऊन ठिय्या आंदोलन करू असा इशारा शिवसेना ठाकरे गटाचे समन्वयक तथा नगरपंचायतचे गटनेता प्रकाश ☞(पान २ वर)



# १५ वर्षांवरील वाहनांवर 'ग्रीन टॅक्स' आकारणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य शासनाने १५ वर्षे पूर्ण झालेल्या खाजगी वाहन संवर्गातील (BS 4) बीएस फोर वाहनासाठी पर्यावरण कर दुप्पट करण्यात आला आहे.




वाहनांवर 'ग्रीन टॅक्स' पर्यावरण कर (Environmental Tax) आकारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. हा निर्णय महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम अंतर्गत प्रसिद्ध करण्यात आला असून पर्यावरण संरक्षण व वाहनांमुळे होणारे प्रदूषण कमी करण्याच्या उद्देशाने ही उपाययोजना करण्यात आली आहे.

अधिसूचनेनुसार, वाहनाच्या पहिल्या नोंदणीच्या तारखेपासून १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर पुढील प्रत्येक ५ वर्षांसाठी ग्रीन टॅक्स आकारण्यात येणार आहे. वाहनाचा प्रकार आणि उत्सर्जन मानक लक्षात घेऊन कर निश्चित करण्यात येणार आहे.

**वाहनाची कर रचना -**

**दुचाकी वाहने :**

बीएस-६ व त्यावरील उत्सर्जन मानक : २,०००

बीएस-४ व त्याखालील उत्सर्जन ☞(पान २ वर)










# हावडा-कुर्ला एक्स्प्रेसमधून २३ किलो गांजा जप्त

**वर्धा/प्रतिनिधीः-** हावडा-कुर्ला एक्स्प्रेसमधून तब्बल २३ किलो ५१० ग्रॅम गांजा जप्त करत रेल्वे पोलिसांनी मोठा भंडाफोड केला. या अमली पदार्थाची अंदाजे किंमत ३ लाख ४८ हजार २६० रुपये इतकी असल्याचे समोर आले आहे.

लोहमार्ग नागपूर पोलीस नियंत्रण कक्षाकडून मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही धडक कारवाई करण्यात आली.



एक्स्प्रेसच्या ए-१ कोचमधील बर्थ क्रमांक ४३ आणि ४५ खाली संशयास्पद स्थितीत दोन बेवारस ट्रॉली बॅगा आढळल्या. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत तपासणी केली असता, त्या बॅगमध्ये १० ते १२ पॅकेट्समध्ये नीट पॅक केलेला गांजा सापडला.

पंचनाम्यावेळी नायब तहसीलदार अजय धर्माधिकारी, रेल्वे पोलीस निरीक्षक पंकज ढोके, उपनिरीक्षक अंगद कोतवाड, नितीन कुमार जाधव यांच्यासह पोलीस कर्मचारी व पंच उपस्थित होते. संपूर्ण कारवाईत एक ग्रे-सिल्व्हर आणि एक गडद हिरव्या रंगाची ट्रॉली बॅग जप्त करण्यात आली. ☞(पान २ वर)

**कबिर संतोष कोल्हे**



**वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा**

**शुभेच्छुक-**

डॉ. शरद गावंडे,पंकजभाऊ अनासाने( विर बिल्डर्स )गजानन पाटील साखरे, रफत खान(आर. एस. के. पेट्रोलियम), प्रफुलभाऊ गोगटे, मंगेश मलिये,सुधिर तायडे, नागेश रायबोले, दिनेश तायडे, ॲड नरेंद्र देशमुख,सुधिर गावंडे, गणेशराव इंगळे, व समस्त मित्र परिवार, दर्यापूर जि. अमरावती